इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४० ▸ अंक - २ ▸ गुरूवार, ता.३ मे २०२४ ▸ पाने १२+८=२० इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

मिथुन क्लिनिक, इचलकरंजी
मुळव्याध, भगिंदर, फिशर स्पेशालिस्ट
विना ऑपरेशन १०० % इलाज
केले जाईल.
पत्ता- जी.के. नगर, तारदाळ-इचलकरंजी
आर.के. बिस्वास - (B.A.M.S.)
एम.आर. बिस्वास- (B.E.M.S.)
(D.Y.N.D.) (CMS. EDT)
7259442544
वेळ - सकाळी १० ते दु.१ व सायं. ६ ते रात्री ९

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

GAYATRI MOBILES
MI चे अधिकृत विक्रेते | Bajaj Finance Available
SAMSUNG OPPO iPhone
vivo ONEPLUS xiaomi
NOKIA realme
BRANCH NO : 1
एस. टी. स्टँड समोर, इचलकरंजी.
9226872967
BRANCH NO : 2
जनता चौक, येवारे बिल्डिंग, इचलकरंजी
9970605002

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००



इचलकरंजी: थोरात चौक येथे झालेल्या सभेत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी हात उंचावून अभिवादन करताना. यावेळी अमृत भोसले, राजवर्धन निंबाळकर, विठ्ठल चोपडे, श्रीमती निवेदिता माने, सुरेश हाळवणकर, रविंद्र माने, गुलाबराव पाटील, ना. उदय सामंत, धैर्यशिल माने, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खास. धनंजय महाडिक, सदाभाऊ खोत, पुंडलिक जाधव व इतर मान्यवर.(छाया- अनंतसिंग)

# काँग्रेस काळात देशाची अधोगती

## योगी आदित्यनाथ यांचा घणाघात;धैर्यशील मानेंना निवडून द्या

▪ इचलकरंजी,ता.२-

काँग्रेसच्या कार्यकाळात भारताची मोठी अधोगती झाली. देशात दहशतवाद वाढला तर भ्रष्टाचार बोकाळला आणि सन्मान हरवला, अशा शब्दात उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काँग्रेसवर हल्ला चढविला तर गेल्या दहा वर्षामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने 'सबका साथ, सबका विकास' ही विचारधारा घेऊन देशाचा विकास साधला तसेच भारताला जागतिक पातळीवर एका वेगळ्या उंचीवर नेवून पोहचविले आहे. भविष्यात देशाला आणखी प्रगतीप्रथावर नेण्यासाठी मोदींचे हात बळकट करण्यासाठी धैर्यशील माने यांना निवडून द्या, असे आवाहन केले.

हातकणंगले लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ येथील थोरात चौकमध्ये महागर्जना जाहीर सभा आयोजित केली होती. त्या सभेत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ बोलत होते. योगी आदित्यनाथ म्हणाले, देशात काँग्रेसने ७० वर्षे राजवट केली. त्यामध्ये देशाच्या सीमा असुरक्षित होत्या. मोठ्या प्रमाणात आंतकवाद, नक्षलवाद वाढला तर भ्रष्टाचाराची परिसीमा गाठली. मात्र पंतप्रधान (पान २ वर)

### भविष्यात कोणतीही निवडणूक लढणार नाही

पाण्याच्या प्रश्नावर काही मंडळी राजकारण करीत आहेत. मात्र, सामान्य जनतेच्या आशा-अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मला जनतेने निवडून दिले आहे.

इचलकरंजीच्या नागरिकांसाठी पाणी योजना आणण्याचे काम माझे आहे तर भविष्यात पिण्याचे पाणी आणले नाही तर भविष्यात कोणतीही निवडणूक लढणार नाही असा निर्धार खास.धैर्यशील माने यांनी केला.

सविस्तर वृत्त पान २ वर

## महाराष्ट्रात उष्णतेची लाट! | महिला आयोगातील २२३ कर्मचारी हटवले

|| तृतीय पुण्यस्मरण ||



स्व. श्रीमान मदनलालजी बोहरा (शेठजी)
स्वर्गवास - ०३/०५/२०२१



स्व. सौ. गीताबाई मदनलालजी बोहरा
स्वर्गवास - ०२/०५/२०२१

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारूतः ।।

कठोर परिश्रम, सचोटी, व्यापार, धर्मनिष्ठ, सामाजिक विकास व बांधिलकीची जाण, व्यापक लोकसंग्रह आदि वैशिष्ट्यांसह आमच्या परिवाराचे भाग्यविधाते व अनेकांचे मार्गदर्शक, आदरणीय स्व. मदनलालजी बोहरा (शेठजी) व स्व. शेठजींच्या सुख-दुःखात खंबीरपणे सावली बनलेली, गृह कर्तव्यदक्ष, बोहरा परिवाराची धरोहर, वात्सल्यमुर्ती स्व. सौ. गीताबाई मदनलालजी बोहरा या उभयतांच्या स्वर्गवासास तीन वर्ष पूर्ण होत आहेत. आत्मा नित्य, अविनाशी आहे !! शेठजींनी दिलेली प्रेरणा, विचार तसेच आईचे संस्काराचे शिदोरीवरती आम्ही यशस्वी मार्गक्रमण करत आहोत.
स्व. शेठजींच्या व स्व. आईंच्या पवित्र स्मृतीस भावभिनी आदरांजली..!

श्रीनिवास, राजेंद्र, पुरुषोत्तम व समस्त बोहरा कुटुंबीय
स्वदेशी परिवार, इचलकरंजी





इचलकरंजी: थोरात चौक येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेसाठी उपस्थित विशाल जनसमुदाय. (छाया-अनंतसिंग.)

# काँग्रेस काळात देशाची अधोगती

(पान १ वरून)

नरेंद्र मोदी यांच्या गेल्या दहा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचीवर नेवून ठेवले तसेच गोरगरीब जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केला. विविध योजनांच्या लाभार्थींच्या खात्यावर थेट अनुदान सुरू केले. शेतकऱ्यांसाठी योजना, घरकुल आवास, उज्ज्वला गॅस योजना, घर तेथे शौचालय उभारणी केली.त्याचबरोबर देशभर दर्जेदार रस्त्याचे जाळे, मेट्रो ट्रेन, रेल्वेचे जाळे, आय.आय.टी.सेंटर आदींसह सर्वच क्षेत्रात मोठे काम केले आहे.

सध्याच्या काँग्रेस आघाडीच्या जाहीरनाम्यात देशातील संपत्तीचे फेर मुल्यमापन करण्याचे म्हटले आहे तर औरंगजेबने लावलेला 'जिझीया कर' लावण्याची भाषा करीत आहे. मात्र याला एनडीएचा विरोध आहे. तसेच आपल्या संस्कृतीवर घाला घालणाऱ्यांचा नायनाट करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत आहेत. राम मंदिर बनविण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. त्यावेळी विरोधकांनी रक्ताचे पाट वाहतील असे म्हटले परंतु, राम मंदिर उभारून रक्ताचे नव्हे तर रंगांची होळी साजरी केली. विरोधी काँग्रेस पक्षाने कायमपणे खोटी स्वप्ने दाखविली. पंतप्रधान असताना इंदिरा गांधी यांनी गरिबी हटावचा नारा दिला होता, तोच नारा आता त्यांचा नातू राहूल गांधी देत आहेत.

याउलट नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत, विकसित भारत यांचे स्वप्न दाखवत आहे. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही उत्तर प्रदेशमधून ८० जागा जिंकून दाखवू तसेच महाराष्ट्रात महायुतीच्या जागा जास्तीत जास्त जिंकून आणाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

सभेच्या प्रारंभी योगी आदित्यनाथ यांचे मान्यवरांच्या हस्ते तलवार देवून स्वागत करण्यात आले. तसेच खास.धैर्यशील माने यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांची मूर्ती प्रदान करण्यात आली.

यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देवभूमीतून आलेले योगी आदित्यनाथ हे संतभूमीत आले आहेत. त्यांनी उत्तर प्रदेशातील वाढती गुंडगिरी मोडून काढून राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्तापित केली आहे. पंतप्रधान मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी ते प्रयत्न करीत असून धैर्यशील माने यांना विजयी करून पंतप्रधान मोदींना साथ द्यावी,असे आवाहन केले.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, खासदाराने कसे काम करावे हे खास.धैर्यशील माने यांच्याकडून शिकावे. आपल्या मतदार संघात एमआयडीसी उभारण्यासाठी खास.माने सातत्याने माध्यमांशी चर्चा करून मंजुरी मिळवून घेतली. त्यामुळे या मतदार संघामध्ये निश्चितपणे विकास झाल्याशिवाय राहणार नाही, असे त्यांनी सांगितले.

**सभास्थळी मोठा उत्साह**

**इचलकरंजीत प्रथमच उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा आयोजित केली होती. त्यामुळे मोठी उत्सुकता लागून राहिली होती. योगी आदित्यनाथ सभास्थळी हजर होताच उपस्थितांनी मोठा जल्लोष केला. त्यामुळे सभास्थळी मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. सभास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.**

यावेळी खास.धैर्यशील माने म्हणाले, मतदार संघाचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला.त्यामध्ये इचलकरंजीचा पाणी प्रश्न व वस्त्रोद्योगाला नवसंजीवनी देण्यासाठी प्रयत्न केला.सुळकुड पाणी योजना मंजूर करण्याबरोबर १६१ कोटींचा निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला.परंतु विरोधक पाण्यामध्ये राजकारण आणत आहेत.तसेच पंचगंगा नदी प्रदूषणाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी सीईटीपी प्रकल्पासाठी ५३२ कोटी रूपयांचा निधी मंजूर केला असल्याचे सांगितले.

यावेळी खास.धनंजय महाडीक, खास.अनिल बोंडे, माजी आम. सुरेश हाळवणकर, माजी मंत्री सदाभाऊ खोत, विठ्ठल चोपडे, मिश्रीलाल जाजू आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी खास. निवेदिता माने, मंत्री गुलाबराव पाटील, सत्यजीत देशमुख, माजी आम.अमल महाडीक, हिंदूराव शेळके, अरूण इंगवले, रविंद्र माने, अशोक स्वामी, सुरेशदादा पाटील, सुनिल महाजन, अमृत भोसले, राजवर्धन निंबाळकर, पुंडलिक जाधव आदी उपस्थित होते. आभार अनिल डाळ्या यांनी मानले. सभेला महायुती आघाडीतील पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने हजर होते.

## शाहू छत्रपतींच्या आडून नव्या महाराजांचा उदय - पी.जी.शिंदे

■ बाजार भोगाव,ता.२(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्ह्यामध्ये लोकसभा निवडणुकीला एक वेगळी धार चढत आहे. या निवडणूकीत शाहू छत्रपतींच्या आडून नव्या महाराजांचा उदय होत आहे. युवराज काळजी घ्या!. डूख धरून सत्यानाश करणाऱ्या आणि तालुक्याला वेठीस धरणाऱ्या या नव्या महाराजाला वेळीच थांबवा. असा टोला सतेज पाटील यांचे नाव न घेता भाजपचे नेते पी.जी.शिंदे यांनी लगावला.**

वेतवडे (ता. गगनबावडा) येथे महायुतीचे उमेदवार प्रा. संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.अध्यक्षस्थानी पालकमंत्री हसन मुश्रीफ होते.

श्री. शिंदे म्हणाले, ही निवडणूक भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. प्रा.संजय मंडलिक यांच्या रूपाने पंतप्रधान नरेंद्र मोदी या कर्तृत्ववान पंतप्रधानाला देश कार्यामध्ये साथ देण्यासाठी निवडून द्यायचे आहे. गगनबावडा तालुक्यात स्वाभिमानाने ताठ उभे राहायचं असेल तर प्रा. संजय मंडलिक यांना विजयी करूया.

पालकमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, ही लढाई राजा विरूद्ध रयत अशी आहे. रयतेचे प्रतिनिधी म्हणून प्रा. संजय मंडलिक यांना विजयी करून गोरगरिबांची अस्मिता जपूया. प्रा.संजय मंडलिक म्हणाले, विरोधक विकासाच्या मुद्यावर न बोलता हुकूमशाहीची भाषा बोलत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात पॅलेस



वेतवडे येथे प्रा.संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना पी.जी. शिंदे.

पॉलीटिक्स करून जनतेची दिशाभूल करीत आहेत. आम्ही केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विकासगंगा गावागावात पोहचवत विकासाचे हिंदुत्व जपण्याचे काम केले आहे. विरोधकाकडे विकासाचे व्हिजन नसल्याने भावनिकतेचा मुद्दा पुढे करीत आहे. माजी आमदार चंद्रदीप नरके यांचेही भाषण झाले. व्यासपीठावर कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, के. एस. चौगुले, गोकुळचे संचालक अजित नरके, जिल्हा परिषद सदस्य मेघाराणी जाधव, एकनाथ शिंदे, लहू गुरव, तानाजी काटे, स्वप्नील शिंदे, दिलीप पाटील, शिवाजी देसाई, नंदकुमार पोवार, बाबासो पाटील, डॉ. आनंदराव गुरव, राजवीर नरके आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सातशे खिडक्या-आठशे दारं!**

यावेळी श्री. शिंदे म्हणाले, प्रा.संजय मंडलिक हे जनतेला भेटणारे, तुम्हा-आम्हाला उपयुक्त पडणारे नेते आहेत. महाराजांची तुमच्या-आमच्या आयुष्यातसुद्धा भेट नाही. सातशे खिडक्या-आठशे दारं, कुण्या वाटेने गेले हे राजे? असे म्हणण्याची वेळ येऊ देऊ नका.

## रेवन्नाच्या विरोधात 'लूकआऊट' नोटीस

■ बंगळुरू,ता.२-

**माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू आणि जनता दल सेक्युलर (जेडीएस) नेते प्रज्वल रेवन्ना यांच्या विरोधात ग्लोबल लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. सेक्स टेप प्रकरणी एसआयटीने ही नोटीस जारी केली असून जगातील सर्व इमिग्रेशन पॉईंट्सना ही नोटीस पाठवण्यात आली आहे.**

प्रज्वल रेवन्ना यांचे नाव सेक्स सीडी प्रकरणात आल्यानंतर जेडीएस पक्षातून त्यांना काढून टाकण्यात आले आहे. प्रज्वल हे जेडीएसकडून हसन मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. या मतदारसंघात मतदान पार पडले आहे.मतदानानंतर प्रज्वल जर्मनीला निघून गेले. प्रज्वल यांच्या अश्लील व्हिडिओ प्रकरणी एका विशेष टीमची स्थापना करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रात उष्णतेची लाट!

■ मुंबई,ता.२-

**राज्यासह देशाच्या हवामानात गेल्या दोन आठवड्यांपासून मोठा बदल झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून देशासह महाराष्ट्रातील अनेक भागात तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. हवामान विभागाने अनेक भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.भर उन्हात दुपारच्या वेळी घराबाहेर पडताना नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले तर मराठवाडा आणि विदर्भात पुढील २४ तासात अवकाळी पावसाची शक्यता आहे.**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये तुरळक क्षेत्रात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.कोकणातील काही भागात उष्णतेची लाट आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यामध्ये रात्री तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याचा अंदाज आहे. मराठवाडा आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणातील तुरळक भागात उष्ण आणि दमट परिस्थिती राहिल.मुंबई, ठाणेसह कोकणात उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, ४ मे रोजी पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा, महाराष्ट्र, सौराष्ट्र, गुजरात प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकच्या अंतर्गत भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. ३ मे रोजी पुद्दुचेरी आणि कराईकल आणि अंतर्गत कर्नाटकात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे

## वडापमधून पडल्याने एकजण ठार

■ शिराळा,ता.२(वार्ताहर)-

**रेड येथील आरके हॉटेलजवळ टमटममधून पडल्याने कादर शमशुद्दीन नालबंद (वय ४५) हे ठार झाले. याबाबतची वर्दी उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. अनिरुद्ध काकडे यांनी फोनवरुन दिली आहे.**

अज्ञात टमटममधून पाठीमागे बसून प्रवास करीत होते. रेड गावचे हद्दीत रेड ते पेठनाकाकडे जाणारे रोडवर आर के हॉटेलजवळ टमटमधून ते पडले. त्यांच्या डोकीस मार लागला. दवाखान्यात दाखल करण्यात आले मात्र उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले.

## सलमान गोळीबार प्रकरण आरोपीची गळफास लावून आत्महत्या

■ मुंबई,ता.२-

**बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या वांद्रे येथील घरावर गोळीबार करणाऱ्या आरोपींपैकी एक आरोपी असलेल्या अनुज थापन याने तुरुंगात गळफास लावून आत्महत्या केली. पोलिस कोठडीत हाय प्रोफाईल प्रकरणातील आरोपीने आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली होती.**

सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर गोळीबार करणाऱ्या आरोपींना पिस्तुल आणि गोळ्या पुरवल्याच्या आरोपावरून मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने दोन आरोपींना पंजाबमधून अटक केली होती.त्यापैकी एक आरोपी अनुज थापन याने बुधवारी तुरुंगात चादरीने गळफास घेत आत्महत्या केली असल्याचे उघडकीस आले. मुंबईतील पोलिस आयुक्त कार्यालयाच्या आवारात असलेल्या गुन्हे शाखेच्या इमारतीत पहिल्या मजल्यावरील लॉकअपमध्ये आरोपी अनुज थापनला ठेवण्यात आले होते.

बुधवारी एक मे रोजी, अनुज थापन हा बराच वेळ झाला तरी शौचालयातून बाहेर आला नाही. त्याला वारंवार हाका मारुनही प्रतिसाद न आल्याने पोलिसांनी बळजबरीने शौचालयाचा दरवाजा तोडला. त्यावेळी त्याने गळफास घेतला असल्याचे दिसून आले.

# ठाकरे-शिंदेंच्या भांडणात राजकारणाची गटारगंगा-शेट्टी

■ कोडोली,ता.२(प्रतिनिधी) -

**ठाकरे आणि शिंदे यांची भांडणे खुर्चीसाठी आहेत. यांच्या दोघांच्या भांडणामुळे राज्यातील राजकारणाची गटारगंगा झालेली आहे. तुमच्या पक्षातील खुर्चीसाठी जनतेला का वेठीस धरता? असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केला. ते कोडोली ता, पन्हाळा येथे जाहीर सभेत बोलत होते. जनतेच्या प्रश्नासाठी तुमची भांडणे का झाली नाहीत, हा सारा खेळ मुख्यमंत्री पदाच्या लालसेपोटी होत असल्याचे ते म्हणाले.**

यावेळी राजू शेट्टी म्हणाले की, साखर कारखानदारांच्या दबावाला बळी पडून उध्दव ठाकरे यांच्या महाविकास आघाडी सरकारने एफआरपीचे तुकडे केले. त्यावेळी मी प्रचंड विरोध केला होता. पण त्यांनी माझे ऐकले नाही. भूमिअधिग्रहण कायद्यात बदल करण्यासाठी पवारांनी त्यांच्यावर दबाव आणला. त्यावेळी ते दबावाला बळी पडले. जमिनीची नुकसान भरपाई चौपट मिळत होती, ती त्यांनी दुप्पट करून टाकली. त्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान झाले. तो निर्णय त्यांनी बदलेला नाही. एवढे शेतकऱ्यांचे नुकसान करून मग आता मते कशाला मागता. केंद्र सरकार कडूनही शेतकऱ्यांची दिशाभूल सुरू आहे. जीएसटी एवढा वाढवलेला आहे, की त्यांचे येत असलेले दोन दोन हजार रूपये त्यांच्याकडून व्याजासहित वसुली सुरू आहे. यांच्याकडून सोम्या गोम्याचा खेळ सुरू आहे.



कोडोली ता, पन्हाळा येथे जाहीर सभेत बोलताना राजू शेट्टी.

साखर कारखानदारांनी आपला राखणदार या निवडणुकीत उभे केले आहेत. या दोघांना एकच सांगितले आहे. राजू शेट्टींना पाडायचं, कारण त्यांने आम्हाला खूप त्रास दिलेला आहे. त्याला आता रोखले पाहिजे. हे जर निवडून आले तर आमचं अवघड होईल, अशी तंबीच या दोघांना दिलेली आहे. शहरे आणि गाव असा भेदभाव या दोन्ही उमेदवारांकडून होत आहे. राजू शेट्टी फक्त साखरेचे बघतात. उसावरच बोलतात. अशी टिका करतात. मी बोलतो या साखर कारखानदांच्या गैरकारभारावर, हेच या कारखानदारांचे दुखणे आहे. मी आता एकटा लढतोय, कारण मी जिंकलेलो आहे. मी हरलेलो नाही. जोपर्यंत तुम्ही माझ्या पाठीशी आहात, तोपर्यंत मला कुणी पाडणार नाही. मी तुमचा राखणदार आहे. तर हे दोघेही कारखानदारांचे राखणदार आहेत. यांना निवडून येऊन उसावर बोलायचे नाही. शेतकऱ्यांच्यावर बोलायचे नाही. तर एकमेकांची जिरवायची आहे. त्यासाठी ही निवडणूक लढवत आहेत.

यावेळी प्रा. जालंधर पाटील, सावकर मादनाईक, आप्पा पाटील, विक्रम पाटील, विठ्ठल मोरे आदी उपस्थित होते.


## दिल्ली महिला आयोगातील २२३ कर्मचारी हटवले

■ नवी दिल्ली,ता.२

**दिल्ली महिला आयोगातील २२३ कर्मचाऱ्यांना गुरुवारी तडकाफडकी नोकरीवरून काढून टाकण्यात आले आहे. उपराज्यपाल व्ही.के.सक्सेना यांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली आहे.**

महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा स्वाती मालिवाल यांनी नियमबाह्य पध्दतीने विनापरवानगी या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती. पॅनेलमध्ये ४० कर्मचारी मंजूर पदे आहेत. परंतू, उपराज्यपालांच्या परवानगीशिवाय २२३ नवीन पदे निर्माण करण्यात आली होती. तसेच कर्मचाऱ्यांना करारावर घेण्याचा अधिकार नसल्याचेही या आदेशात म्हटले आहे. अशा पध्दतीने भरमसाठ कर्मचाऱ्यांची नेमणूक केल्यास सरकारवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल. यामुळे वित्त विभागाच्या मान्यतेशिवाय कोणतेही पाऊल उचलू नका, असेही राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोगाला कळविण्यात आले होते.

|| प्रथम पुण्यस्मरण ||



श्री. कालुरामजी इनाणी
(३० एप्रिल २०२३)
आपके दिये हुये संस्कार,
आपके आदर्श जीवन के
हर मोडपर हमे मार्गदर्शन
करते है और करते रहेंगे
आपके आशिर्वाद हमेशा
हमपर बना रहे ।

विजय, संजय एवं
समस्त इनाणी परिवार,
इचलकरंजी.

|| तृतीय पुण्यस्मरण ||



कै. विष्णू श्रीपती मेटे
तुमचे चैतन्यरूपी अस्तित्व
आमच्या ह्दयात कायम आहे
तीच आमची शक्ती
ती आमची प्रेरणा आहे.

अनिल मेटे * सचिन मेटे
सतीश मेटे * सुशिल मेटे

तृतीय
॥ पुण्यस्मरण ॥



कर्मयोगी कै. श्रीमान मदनलालजी बोहरा (शेठजी)

श्री.ना.बा. परिवाराचे आधारस्तंभ व वस्त्रनगरी इचलकरंजीच्या उद्योग,
व्यापार, सहकार, शिक्षण क्षेत्रातील विधायक दिशा देणारे, सामाजिक व
धार्मिक क्षेत्रातील दानशूर व्यक्तिमत्व, वस्त्रनगरीचे शेठजी तथा
आमच्या संस्थेचे माजी प्रेसिडेंट
कर्मयोगी कै. श्रीमान मदनलालजी बोहरा (शेठजी)
यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतिस
विनम्र अभिवादन...!

सर्व पदाधिकारी, विश्वस्त, सर्व शाखा प्रमुख, सभासद, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग

श्री नारायणराव बाबासाहेब एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी संचलित
* गोविंदराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज
* श्रीमंत गंगामाई गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज
* श्री व्यंकटेश महाविद्यालय * श्री.ना.बा. बालमंदिर व विद्या मंदिर, इचलकरंजी.

दैनिक महासत्ता इचलकरंजी.
# सहकार वैभव
वर्धापन दिन विशेषांक
३९ वा वर्धापन दिन
शुक्रवार,ता. ३ मे २०२४



# मोदी-शहा यांच्या हुकूमशाहीचा व्हायरस गाडून टाका

## विजय संकल्प सभेत उध्दव ठाकरेंचे आवाहन

इचलकरंजी,ता.२-

**मोठमोठे प्रकल्प, उद्योगधंदे, प्रमुख कार्यालये गुजरातला स्थलांतरित करून महाराष्ट्राला लुटणाऱ्या मोदी-शहा यांच्या हुकूमशाहीचा व्हायरस कायमपणे गाडून टाका. यासाठी भाजपापासून दहा हात लांब रहावे आणि देशाच्या उज्वल भवितव्यासाठी सत्यजित पाटील-सरुडकर यांना विजयी करून पुन्हा एकदा आपल्या विचाराचा खासदार संसदेत पाठवावा, असे आवाहन माजी मुख्यमंत्री आणि उबाठा शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी केले.**

महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील-सरूडकर यांच्या प्रचारार्थ श्रीमंत घोरपडे नाट्यगृह चौकात आयोजित विजय संकल्प सभेत उद्धव ठाकरे बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते शरद पवार यांचेसह इंडिया आघाडीचे नेते उपस्थित होते.

### दोन सभेमुळे शहरातील रस्त्यावर गर्दी

लोकसभा निवडणुक प्रचाराच्या निमित्ताने शहरात एकाचवेळी दोन मोठ्या जाहीर सभा झाल्या. यामुळे दोन्ही ठिकाणी गर्दीचा माहोल पहावयास मिळाला. सभेसाठी बाहेरगावाहून शेकडो कार्यकर्ते तसेच नागरिक आले होते. परिणामी दुचाकीसह चारचाकी वाहनांची मोठी वर्दळ शहरातील सर्वच रस्त्यावर दिसून येत होती. त्यामुळे काहीकाळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

आपल्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला तसेच निवडणूक आयोग आणि लवादाला भाजपचे घरगडी असे संबोधत त्यांचे चांगलेच वाभाडे काढले. ठाकरे म्हणाले की, केंद्र सरकार मधील काही नेत्यांचा पूर्वीपासून महाराष्ट्राबद्दल आकस आहे. हा आकस मोदी आणि शहा यांच्याकडून आजही कायम आहे. पण महाराष्ट्र आमची अस्मिता आहे. त्यामुळे राज्याला नेस्तनाबूत करणाऱ्या गद्दारांना या महाराष्ट्रातच गाडल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही.

ठाकरे म्हणाले कि, ज्यांना कोण जवळ घेत नव्हते त्या भाजपला शिवसेनेने खांद्यावर बसवून संपूर्ण महाराष्ट्र दाखवला. मात्र तेच आता शिवसेना संपवू पाहात आहेत. त्यामुळे तोडफोडीचे राजकारण करुन सत्ता मिळवणाऱ्या या लुटारुंचा सुफडा साफ केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून सतत नकली शिवसेना असा उल्लेख केला जात आहे. वास्तविक न्यायालयाने यावर अद्याप निकाल दिला नाही, तरीसुद्धा मोदींकडून एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयावर दडपण आणले जात आहे. शिवसेना पक्ष काढून घेतला, चिन्ह घेतले पण जनता मात्र आमच्यासोबत आहे, हे राज्यात ठिकठिकाणी सभेप्रसंगी होत असलेल्या गर्दीवरून स्पष्ट होते.



उबाठा शिवसेना गटाचे मशाल चिन्ह हाती घेऊन उपस्थित जनसमुदायाला दाखविताना उध्दव ठाकरे, सत्यजित पाटील तसेच इतर नेते. (छाया.- अनंतसिंग)

शरद पवार म्हणाले की, इचलकरंजीचे अर्थकारण वस्त्रोद्योगावर अवलंबून आहे. मात्र या शहराच्या तसेच उद्योगाच्या प्रश्नांकडे केंद्र सरकार वाकूनही बघत नाही. त्याचा परिणाम सर्वांवर होत आहे. शेतकरी, कामगार यासह सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. अशा परिस्थितीत पंतप्रधान मोदी सातत्याने महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. त्यामुळे ते राज्याचे हित साधू शकणार नाहीत. त्यामुळे हुकुमशाहीला उलथवून टाकून लोकशाही टिकवण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील म्हणाले, नेत्याला सोडायचे नाही, गद्दारी करायची नाही, आपले राजकारण संपले तरी चालेल. त्याचबरोबर जनतेने दिलेली खुर्ची जनतेच्या विकासासाठी वापरायची आणि काम करत राहायचे हे आपले तत्व आहे. त्यामुळे जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मला मोठ्या मताधिक्याने निवडून देऊन संधी द्यावी असे आवाहन केले.

याप्रसंगी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिराळ्याचे आमदार मानसिंग नाईक, माजी आमदार अशोक जांभळे, राजीव आवळे, उल्हास पाटील (शिरोळ), काँग्रेसचे प्रदेश सचिव शशांक बावचकर, प्रताप होगाडे, कॉ. सदा मलाबादे, सयाजी चव्हाण, सुकुमार कांबळे यांची भाषणे झाली. व्यासपीठावर आमदार राजू (बाबा) आवळे, राष्ट्रवादी पवार गटाचे जिल्हाध्यक्ष व्ही.बी.पाटील, माजी आमदार सुजित मिणचेकर, मदन कारंडे, राहूल खंजीरे, गणपतराव पाटील, अरुण दुधवडकर, सागर चाळके, अब्राहम आवळे, संजय चौगुले, उदयसिंग पाटील, भरमा कांबळे यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाविकास आघाडी राज्यात ३५ जागा जिंकणार-पाटील

महाविकास आघाडीला राज्यात सर्वत्र मिळत असलेला प्रतिसाद पहाता ३५ हून अधिक जागा जिंकू असा विश्वास व्यक्त करून आम. जयंत पाटील यांनी भाजपाकडून सतत चारशे पारचा नारा दिला जात होता. तो नारा आता बंद झाल्याने त्यांना २०० सुध्दा जागा मिळणार नाहीत, असा टोला लगावला.

# महादेव गौड यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

इचलकरंजी,ता.२ -



उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या हातकणंगले लोकसभा जिल्हा उपप्रमुखपदी इचलकरंजीचे माजी शहरप्रमुख महेश बोहरा यांची निवड करण्यात आली आहे. उपजिल्हाप्रमुख असलेले महादेव गौड यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने त्यांना पदमुक्त करण्यात आले असल्याची माहिती ठाकरे सेनेचे संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांनी दिली.

शिवसेना कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेनेच्या दोन गटातील राजकीय हालचाली वाढल्या आहेत. इचलकरंजीचे उपजिल्हाप्रमुख महादेव गौड यांनी उद्योगमंत्री उदय सामंत, जिल्हाप्रमुख रवींद्र माने यांच्या उपस्थितीमध्ये शिंदे गटासोबत काम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ठाकरे सेनेचे कोल्हापूर संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांनी तातडीने काही महत्त्वाचे निर्णय घेत रिक्त झालेल्या हातकणंगले लोकसभा उपजिल्हाप्रमुखपदी महेश बोहरा यांची निवड केली आहे.

महेश बोहरा यांनी यापूर्वी इचलकरंजी शहर अध्यक्षपद म्हणून काम पाहिले आहे. ते २००९ ते २०११ या दोन वर्षांमध्ये इचलकरंजी शहराध्यक्ष होते. या काळात त्यांनी सातत्याने आंदोलन करून शिवसेना मजबुत ठेवली होती.

महादेव गौड यांनी ठाकरे सेनेला रामराम केल्याने त्यांच्याबद्दल पक्षांतर्गत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यापूर्वी ठाकरे सेना सोडली तेव्हा महादेव गौड यांनी गद्दार खासदार, आमदार यांच्या विरोधात मोठे आंदोलन केले होते. खरी शिवसेना ही ठाकरेंची असल्याचे ते सातत्याने सांगत होते. प्रकृती ठीक नसते असेही कारण यापूर्वी त्यांनी पक्षाला दिल्याने त्यांच्या प्रकृतीचा विचार करून महत्त्वाची जबाबदारी दिली नव्हती, असेही ठाकरे सेनेतील सूत्रांचे म्हणणे आहे.

* इचलकरंजी,ता.२-

इचलकरंजी परिसरात गुरूवारी दिवसभर सकाळी ९ ते सायं. ५ पर्यंत उष्मा जाणवत होता. उष्म्यामुळे शितपेय दुकानावर गर्दी दिसून येत होती. नागरीक आता वळीव पावसाच्या प्रतिक्षेत आहे.

Daily Mahasatta With Best Compliments From....

Chandrakant Mali
+91 9325137762

Anant Enterprises
Dealers in offset Printing Material
Plot No. 19, Green Park Opp. R.C.C. Builder,
Shivaji Univercity Road, Kolhapur.






























■ संपादकीय ■

## गरज

प्रत्येक देशाच्या दृष्टीने विविध उत्पादनाची आयात आणि निर्यात या संबधीचे धोरण अधिक महत्वाचे असते. जागतिक स्तरावर परराष्ट्र धोरण ठरवत असताना त्यामध्ये विशिष्ठ मालांच्या आयात निर्यातीचा देखील विचार होणे जरुरीचे असते. जागतिक स्तरावर मागील काळ कांही देशांमध्ये युध्दाची परिस्थती निर्माण झाल्याने त्याचा मोठा फटका आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये देखील झाला. अनेक देशांच्या आयात निर्यातीवर देखील परिणाम झाला. भारत हा मागील कांही वर्षात अन्नधान्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण बनला आहे. तथापि, देशात कांही उत्पादनांची आयात करावी लागते. त्याचबरोबर देशातील उत्पादीत मालाचे योग्य नियंत्रण करण्यासाठी किंबहूना अतिरिक्त उत्पादन कांही देशाची गरज व मागणी याचा विचार करुन निर्यात देखील करावी लागते. प्राप्त परिस्थितीमध्ये देशातून होणाऱ्या निर्यातीमध्ये घट झाल्याचे स्पष्ट होत आहे. गरजेनुसार आयात निर्यातीचे धोरण अधिक विचार करुन सरकारच्या माध्यमातून हाताळण्याची जरुरी असते. अर्थात या संबंधीचे धोरण अधिक चांगल्या रितीने राबवण्याची गरज निर्माण झाली आहे. आयात निर्यातीमध्ये घट झाली तर त्याचे कांही परिणाम देखील सहन करावे लागत असतात. त्यामुळे आयात निर्यातीसंबंधी योग्य विचार करुन पाऊले उचलण्याची मोठी गरज आहे. केंद्र सरकारच्या वाणिज्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशाच्या कृषी निर्यातीत ८.८ टक्क्यांनी घट होऊन ती ४३.७ अब्ज डॉलरवर आली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये भारताची कृषी निर्यात ४७.९ अब्ज डॉलरवर गेली होती. 'अपेडा' या केंद्रीय व्यापार खात्याच्या कृषी आणि प्रक्रियायुक्त खाद्य उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणामार्फत देशातून विविध ७१९ प्रकारचा शेतमाल आणि शेती आधारित प्रक्रियाकृत उत्पादनांची निर्यात होते. ती निर्यातही २०२३-२४ या आर्थिक वर्षांच्या शेवटच्या ११ महिन्यांत २२.४ अब्ज डॉलरची निर्यात झाली. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या शेवटच्या ११ महिन्यांत २४ अब्ज डॉलरची निर्यात झाली होती. म्हणजे 'अपेडा'च्या कृषी निर्यातीतही ६.८५ टक्क्यांनी घट झाली आहे. केंद्र सरकारने बिगरबासमती तांदूळ, गहू आणि गव्हाचे उपपदार्थ, साखर, कांदा आदी कृषी उत्पादनावर निर्यातबंदी लादल्याचा फटका सुमारे पाच ते सहा अब्ज डॉलरच्या निर्यातीला बसला. इस्रायल-पॅलेस्टाइन युद्धाचा फारसा परिणाम निर्यातीवर झाला नसल्याचे अधिकारी सांगतात; पण त्या युद्धाने येमेनी बंडखोरांना चेव येऊन लाल समुद्रातून होणारी निर्यात विस्कळीत झाली. त्यामुळे भारतातून अमेरिका, युरोपकडे जाणाऱ्या जहाजांना आफ्रिकेला वळसा घालावा लागतो. परिणामी वेळ आणि वाहतूक खर्चही वाढतो. याचा फटका द्राक्ष निर्यातीला बसला आहे. यंदा राज्यात निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन मुबलक प्रमाणात झाल्याने विक्रमी निर्यातीची संधी होती. पण समुद्रमार्ग अडल्याने हवाई निर्यातीच्या दरातही वाढ झाली. त्यामुळे सरासरी इतकीच द्राक्ष-निर्यात होऊ शकली. कृषी निर्यातीला हवाई वाहतूक कंपन्या निर्यात कोटा देत नाहीत. त्याचा फटका प्रामुख्याने राज्यातून होत असलेल्या आंबा निर्यातीलाही बसला. रशिया-युक्रेन युद्धामुळेही निर्यात विस्कळीत झाली होती. समाधानाची बाब अशी की, अपेडाकडून निर्यात होणाऱ्या २४ प्रमुख कृषी आणि कृषी आधारित उत्पादनांच्या निर्यातीत वाढ दिसून आली. कृषी निर्यातीत घट झाल्यानंतर केंद्रीय वाणिज्य विभागातर्फे बासमती तांदूळ, अल्कोहोलयुक्त पेये, मध, आंबे, केळी आदी परदेशांतून मागणी असलेल्या २० प्रमुख शेतमालाच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी पुढील तीन महिन्यांत एक कार्य योजना तयार केली जाणार आहे. त्यासाठी (अपेडा), राज्य सरकार आणि निर्यातीसंबंधी विविध घटकांशी चर्चा सुरू आहे. जागतिक कृषी निर्यातीत भारताचा वाटा जेमतेम २.५ टक्के आहे, तो चार ते पाच टक्क्यांवर नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. देशातील लोकसंख्येची भूक भागविण्याला सरकारचे प्राधान्य दिसून येते. त्यामुळे देशात अन्नधान्य व शेती आधारित उत्पादनांची उपलब्धता चांगली राहण्यासाठी केंद्र सरकार अनेकदा शेतमालाच्या निर्यातीवर निर्बंध लादते. त्यातूनच केंद्र सरकारने सध्या कांदा, बिगरबासमती तांदूळ, गहू, साखर निर्यातीवर बंदी लादली आहे. त्यामुळे शेतमालाच्या निर्यातीत सातत्य राहत नाही. धोरणातील या धरसोडीमुळे भारतीय शेतमालाला जगातून असलेला हक्काचा ग्राहकही दुरावत आहे. अशीच दूध आणि दुग्धजन्य पदार्थाची बाजारपेठही हातची गेली आहे. भारतीय शेतीमाल आणि शेती आधारित उत्पादन यांचा उत्पादन खर्च जास्त; दर्जाबाबत उपस्थित केले जाणारे प्रश्न, ही अन्य कारणे आहेत. नुकतीच मलेशिया, इंडोनेशियाने भारतीय मसाल्यांच्या दर्जाबाबत शंका उपस्थित केली होती. त्यामुळे निर्यात धोरणात सातत्य ठेवून, जागतिक बाजारातील स्पर्धेत टिकतील अशा दर्जेदार प्रक्रियायुक्त उत्पादनांची निर्मिती आणि निर्यातवृद्धीसाठी दीर्घकालीन निश्चित धोरणांची गरज आहे. केवळ प्राप्त परिस्थितीवर विचार करुन चालणार नाही तर दुरदृष्टीच्या विचाराने आयात निर्याती सबंधीत चांगले धोरण आखण्याची गरज आहे.

# चित्रपटसृष्टीत मोठे योगदान दिलेले कलावंत आणि सामाजिक प्रबोधनासाठी योगदान दिलेले व्यक्तीमत्व



भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणाऱ्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. भालजींचा जन्म ३ मे १८९८ रोजी कोल्हापुरात झाला. आज भालजी पेंढारकर यांचा जन्मदिन आहे. सुरुवातीच्या काळात त्यांनी पुण्यात वृत्तपत्रात नोकरी केली. भालजींनी लोकमान्य टिळक यांचा स्वर्गीय संदेश ही पुस्तिका लिहून प्रकाशित केली आणि चौकाचौकात विकली. भालजींच्या लिखाणाचा श्रीगणेशा अशाप्रकारे झाला.

१९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला. त्यांनी असीरे हर्स या उर्दू नाटकाचे केलेले मराठी रूपांतर आसुरी लालसा हे रुस्तमजी यांच्या आर्य सुबोध नाटक मंडळीतर्फे रंगमंचावर आले आणि खूप गाजले. पुढे भालजींनी मार्कंडेय (अपूर्ण), रजहृदय, उदयकाळ, जुलूम, राणीसाहेब, खूनी खंजर, बाजीराव-मस्तानी, वंदे मातरम् - आश्रम, बाजबहाद्दूर अर्थात राणी रूपमती या मूकपटांचे लेखन आणि त्यातल्या काहींचे दिग्दर्शनही केले. बकंभट या व्यंगपटाचे लेखन-दिग्दर्शन केल्यानंतर त्यांनी सरस्वती सिनेटोन या चित्रसंस्थेच्या श्यामसुंदर या पौराणिक बालचित्रपटाची दिग्दर्शन-पटकथा-संवाद-गीते अशी आघाडी सांभाळली.

भारतीय चित्रपटसृष्टीतला हा पहिला बालचित्रपट हिंदी आणि बंगालीमध्ये निर्माण झाला होता, तसेच पहिला रौप्यमहोत्सवी चित्रपट होण्याचा मानही त्याने मिळवला. भालजींनी कोल्हापूर छत्रपतींकडून कोल्हापूर सिनेटोन हा स्टुडिओ खरेदी केला आणि त्याचे नामकरण जयप्रभा स्टुडिओ असे केले. तेथील वातावरण चित्रनिर्मितीस पोषक आणि नेहमी शिस्तप्रिय असेल याकडे भालजींचा कटाक्ष असे. तेथे त्यांनी अनेक कलाकार आणि तंत्रज्ञांना घडवले आणि चित्रपटनिर्मितीचे कार्य दीर्घकाळ सुरू ठेवले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाल्याच्या भावनेचा व स्वातंत्र्याचा संदेश भालजींनी आपल्या चित्रपटांतून दिला.

जय भवानी, शिलंगणाचे सोने, छत्रपती शिवाजी, अशी शिवचरित्रावर आधारित चित्रपटांची निर्मिती जयप्रभा स्टुडिओत सुरू राहिली. भालजी पेंढारकर यांनी पाच दशकाहून अधिक काळ सिने-दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक म्हणून सिनेसृष्टीत काम केलं आहे. मूकपट ते बोलपट आणि कृष्णधवल ते रंगीत सिनेनिर्मिती करण्यात भालजी पेंढारकर यांचा मोलाचा वाटा होता.त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले. ऐतिहासिक सिनेमांच्या निर्मितीवर भालजी पेंढारकरांचा भर होता.

सिनेमाच्या माध्यमातून एक चांगला संदेश पोहोचवण्याचा त्यांचा प्रयत्न असे. भालजी पेंढारकरांनी त्यांच्या करिअरच्या सुरुवातीला बहु असोत सुंदर, आकाशवाणी, पार्थकुमार, कालियामर्दन, सावित्री हे बोलपट केले. त्यानंतर १९३९ सालानंतर त्यांनी सिनेमांत वेगवेगळे प्रयोग करायला सुरुवात केली. पुढे त्यांनी

**दैनंदिनी**

नेताजी पालकर, थोरातांची कमळा, वाल्मिकी, मीठभाकर, गाठ पडली ठका ठका, मोहित्यांची मंजुळा, साधी माणसं, गनिमी कावा, शाब्बास सूनबाई असे पंचेचाळीस सिनेमे सिनेसृष्टीला दिले. त्यांचा जयप्रभा स्टुडिओ म्हणजे कलाकार आणि तंत्रज्ञ यांना घडवणारी एक मोठी कार्यशाळाच होती.

अनेक मोठ-मोठे कलाकार भालजींच्या शिस्तीतून तयार झाले आहेत. स्वातंत्र्य मिळाले तरी सुराज्य निर्माण करण्यासाठी त्याग, निष्ठा, औदार्य व संयमी असा खंबीरपणा आणि आत्मविश्वास असलेली युव पिढी तयार व्हावी यासाठी त्यांनी समृद्ध आशयासह कला व तंत्र या दोन्ही दृष्टिकोनातून उत्कृष्ट अशा चित्रपटांची निर्मिती भालजी पेंढारकर यांनी केली. भालजी पेंढारकर यांनी १९२५ साली बाजीराव मस्तानी हा पहिला सिनेमा दिग्दर्शित केला. त्याकाळी भालजींना बाबा असे म्हटले जायचे. भालजींना चित्रभूषण, जीवनगौरव, दादासाहेब फाळके, गदिमा अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद गीते अशा वेगवेगळ्या माध्यमातून सिनेसृष्टीसोबत त्यांनी समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य केले.

# गर्जा महाराष्ट्र माझा या मंत्रानेच वाटचाल हवी

महाराष्ट्राने सर्वश्री यशवंतराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, पि. के. सावंत, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, अ.र.अंतुले, बॅ. बाबासाहेब भोसले, डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, सुधाकरराव नाईक, मनोहर जोशी, नारायण राणे, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असे वीस मुख्यमंत्री पाहिले. गेल्या ६४ वर्षात राज्यातील सर्व विभागांना राज्याचे नेतृत्व करण्याची संधी कमी-अधिक प्रमाणात मिळालेली आहे. पण त्यांचा लाभ अनेकांना घेता आला नाही ही हे वास्तव आहे. अनेक फसव्या आणि चकवा देणाऱ्या आकडेवारीच्या आधारे महाराष्ट्र प्रगत असल्याचे दाखवले गेले व जात आहे. पण महाराष्ट्राचे सिंचनासह अनेक क्षेत्रातले मागासपण लपविता येत नाही हे वास्तव आहे. केंद्रसरकारच्या नोटबंदी पासून जीएसटी पर्यंतच्या अनेक तुघलकी निर्णयांचा फटकाही महाराष्ट्रालाच सर्वाधिक बसला आहे. कारण हे कृषी-औद्योगिक समाजरचनेच्या दिशेने जाणारे देशातील महत्वाचे राज्य होते व आहे. आणि केंद्रसरकारच्या निर्णयाने कृषी व उद्योग क्षेत्राचे पूर्णतः कंबरडे मोडलेले आहे. त्यात महाराष्ट्राच्या वाट्याचे अनेक उद्योग गुजरात सह इतर राज्यात पळवले गेले व जात आहेत. सर्व क्षेत्रात ढासळलेल्या साऱ्या परिस्थितीचे खापर केंद्र सरकार कोरोनावर ढकलू पाहते. कारण कोणत्याही परिस्थितीचा पक्षीय फायदा कसा उठवायचा याच मानसिकतेत ही मंडळी सदैव असतात. कोरोना आला नसता तर जणूकाही भारत सर्वक्षेत्रात आघाडीवरच होता असा धादांत खोटा दावा करायलाही कमी केले जाणार नाही. तसेच केंद्र सरकार महाराष्ट्राला त्याच्या हक्काचा निधी देण्यातही दुजाभाव करत आहे हे चिंताजनक आहे. अगदी गेल्या आठवड्यात गुजरातला कांदा निर्यातीची परवानगी दिली पण महाराष्ट्राला नाही हे ताजे उदाहरण आहे.

राजकीय असंस्कृतपणा आणि विरोधकांबद्दल आकसभाव हे विद्यमान भारतीय राजकारणाचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. आज जागतिकीकरणाच्या वेगवान बदलत्या परिस्थितीत राज्य या संकल्पनेवर मोठ्या प्रमाणात आघात भागात होत आहेत. अशावेळी आपले पहिले मुख्यमंत्री कालवश यशवंतराव चव्हाण यांची तीव्रतेने आठवण होते. त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात व्यापक विचार देणाऱ्या यंत्रणा उभ्या केल्या होत्या. मात्र या यंत्रणांचा सक्षम पणे वापर करून महाराष्ट्राला राज्य म्हणून पुढे नेण्यात नंतरचे काही नेते कमी पडले. अर्थात काही क्षेत्रात महाराष्ट्राने निश्चित दमदार वाटचाल केली. पण झालेला विकास समतल पद्धतीने न झाल्याने विविध प्रश्न तयार झाले आहेत. या आसमान विकासातूनच अस्मितेच्या राजकारणाने उचल खाल्ली. एकीकडे महानगरातील सप्ततारांकित झगमगीत जीवन आहे तर दुसरीकडे लंगोटीला महाग असलेला कोकणातील माणूस आहे. एकीकडे मिष्टान्न वाया जात आहे तर दुसरीकडे मेळघाटात कुपोषणाने बालके व गरोदर माता दगावत आहेत. एकीकडे घरातील प्रत्येकासाठी वातानुकूलित गाडी आहे तर दुसरीकडे एक घागर पाण्यासाठी दोन-पाच मैलांची पायपीट आहे. शिक्षणापासून आरोग्यापर्यंत आणि गृहनिर्माणापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नांपर्यंत सर्वत्रच ही विषमतेची दरी रुंदावत आहे. ही विषमतेची दरी कमी कशी होईल हे पाहणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.


थोडे मागे वळून पाहिल्यास असे दिसते की, ज्ञानेश्वर ते तुकाराम आणि त्यानंतर अगदी गाडगे महाराजांपर्यंत महाराष्ट्राला संत चळवळीची मोठी परंपरा आहे. तसेच समाजसुधारकांचीही मोठी परंपरा आहे. जगन्नाथ शंकर शेठ, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, व्याकरण तज्ञ दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी, फिरोजशहा मेहता, न्यायमूर्ती रानडे, सुधारकाग्रणी आगरकर, महर्षी कर्वे, महर्षी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रा .गो. भांडारकर, कर्मवीर भाऊराव पाटील यासारखे अनेक नामवंत याच भूमीत होऊन गेले. त्यांनी संपूर्ण भारतावर आपला प्रभाव टाकला. राजकारण, साहित्य, कला क्रीडा, संस्कृती अशा विविध क्षेत्रात महाराष्ट्राने आपला ध्वज उंचावर फडफडत ठेवला आहे. सर्वांगीण समतेच्या प्रस्थापनेच्या लढ्याची आणि समतेची उज्वल परंपरा असलेल्या महाराष्ट्राला आज अनेक प्रश्नांनी ग्रासले आहे. त्याची सोडवणूक केवळ अस्मिता फुलवत ठेवून, दुराग्रह बाळगून, अथवा इतरांबद्दल द्वेषभावना दाखवून होणार नाही. विकास झाला पण त्याची फळे सर्व विभाग आणि त्यातील शेवटच्या माणसांपर्यंत पोहोचली नाहीत.

आज महाराष्ट्राला सर्वार्थाने महान बनवण्यासाठी काही धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. त्यासाठी लोकशक्तीचा रेटा वापरला पाहिजे. बिघडवण्यापेक्षा घडविण्याकडे आणि तोडफोडीपेक्षा उभारणीकडे प्रत्येक मराठी माणसाने लक्ष दिले तर आणि तरच महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने पुनर्निर्माण व नवनिर्माण होऊ शकते. ते करणे ही या वर्धापनदिनाची मागणी आहे. गेल्या अनेक दशकात, शतकात महाराष्ट्राला मोठेपणा मिळवून देण्यात अनेक मान्यवरांचे मोठे योगदान आहे. त्या सर्व पूर्वसुरींचे बोट धरत आपण भविष्याची वाटचाल करण्याची गरज आहे. अर्थात ती करत असताना आजचे जमिनीवरचे वास्तव समजून घेतले पाहिजेच. आजचे वास्तव आणि उद्याचे उद्दिष्ट नीट समजले की, वाटचाल सुलभ, सुकर आणि विश्वासपूर्ण होऊ शकते. तशी ती झाली तर आणखी सदतीस वर्षांनी म्हणजेच महाराष्ट्राच्या शताब्दी वेळी आपला महाराष्ट्र केवळ भारतातीलच नव्हे तर अवघ्या जगातील एक सर्वांगीण आघाडीवर असलेला अग्रभागी प्रदेश म्हणून ओळखला जाईल. इतकी ताकद आपल्या महाराष्ट्राच्या भूमीत, मानसिकतेत आहे यात शंका नाही. यशवंतरावांची व्यापक आणि अखंडतेची भूमिका प्रत्येकाने समजून घेतली पाहिजे. महाराष्ट्राच्या पहिल्या मुख्यमंत्र्यानी आणि देशाच्या माजी उपपंतप्रधानी त्रेसष्ठ वर्षापूर्वीच देशाला सांगितलेले आहे. महाराष्ट्राची तीच खरी ताकद आहे. या पासष्ठाव्या वर्धापनदिनी महाराष्ट्राला आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांचा एक बांधव म्हणून भरभरून शुभेच्छा. गर्जा महाराष्ट्र माझा हा मंत्र आपण प्रत्येकाने घेऊन वाटचाल केली पाहिजे.

■ प्रसाद कुलकर्णी

# यंदा आबादानी होऊ दे अंदाजांचा सुखद छिडकावा

उन्हाने होरपळणाऱ्या राज्यातील जनतेला यंदा मान्सून चांगलाच बरसणार असल्याच्या बातमीने दिलासा मिळाला. विशेषतः दिल्ली, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये चांगला पाऊस होईल. हवामान खात्याने म्हटले आहे की, दक्षिण-पश्चिम मान्सूनमध्ये जून ते सप्टेंबरपर्यंत १०६% पाऊस पडण्याची शक्यता आहे. १९५१ ते २०२३ पर्यंतच्या विश्लेषणाच्या आधारे असे सांगितले जात आहे की, एल निनोनंतर जेव्हा जेव्हा ला लीनाची परिस्थिती निर्माण झाली, यंदाही परिस्थिती तशीच राहणार आहे, त्यामुळे चांगला पाऊस होणार आहे. यामध्ये ५% त्रुटी असू शकते. ९५% ते १०५% पाऊस सामान्य मानला जातो. यंदाच्या मॉन्सूनमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता सर्वाधिक ३१ टक्के, तर दुष्काळाची शक्यता अवघी २ टक्के असल्याचे या वेळी स्पष्ट करण्यात आले. पावसासोबतच मे महिन्यात उष्णतेची लाट, वादळ आणि



धुळीच्या वादळाचाही समावेश असल्याची चर्चा आहे. मात्र, हवामान तज्ञ मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात निर्णायक अंदाज सादर करतील. गेल्या वर्षीही विभागाने ९६ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला होता, मात्र ९४ टक्के पाऊस झाला. भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. ७०-८० % शेतकरी पावसावर अवलंबून आहेत. देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या रोजगारासाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. सामान्य किंवा कमकुवत मान्सून त्यांच्यासाठी गंभीर संकट उभे करु शकतो. महागाई वाढते आणि सर्वसामान्यांचे जगणे कठीण होते. कारण शेतीवर कोणतेही संकट आले की रोजगार कमी होतो. रोजंदारी मजुरांना काम मिळणे बंद होते. तथापि, अतिवृष्टीमुळे विविध प्रकारच्या समस्याही निर्माण होतात. देशात दरवर्षी पूरग्रस्त भागातील रहिवाशांना पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस होत असल्याने तीव्र समस्यांना सामोरे जावे लागते. अतिवृष्टीमुळे पूर आणि दुष्काळग्रस्त भागात सर्वसामान्यांचे जगणे कठीण होते. साहजिकच या नैसर्गिक समस्या आहेत, परंतु सरकारने अंदाजांच्या आधारे तयारी सुरू केली पाहिजे, ज्यात सरकार वर्षानुवर्षे मागे पडत आहे. चांगल्या पावसाच्या अंदाजावर जितका आनंद व्यक्त केला जात आहे, तितकीच त्याबाबत सतर्क राहून आवश्यक तयारी करण्याची गरज आहे. राज्यातील अनेक शहरांनी तापमानाची चाळीशी ओलांडली आहे. दुष्काळ, गारपीट आणि अवकाळीच्या अस्मानी संकटामुळे शेती धोक्यात आली होती. अर्थव्यवस्थेचा मूलाधार असणारा मान्सून यंदा धो धो बरसून चिंब पावसानं रानं आबादानी झाली तर तमाम जनता निश्चीतच सुटकेचा निश्वास टाकेल.

■ प्रा. विजय कोष्टी

# वाचकांचा पत्रव्यवहार

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणार केव्हा?

गेल्या १०-१५ वर्षांत राज्याच्या राजकारणात अनेक उलाढाली झाल्या. जनतेने राज्यातील सर्वच प्रमुख पक्षांना सत्तास्थानी आणून पाहिले; मात्र आजतागायत कोणत्याही पक्षाचे सरकार शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखू शकले नाही. नुकत्याच जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर २३ ते मार्च २४ या ६ महिन्यांच्या कालावधीत दुष्काळ, नापिकी आणि अवकाळी यांमुळे हवालदिल झालेल्या १३७० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. ही आकडेवारी केवळ अधिकृत नोंद झालेल्या शेतकऱ्यांची असून प्रत्यक्षात आकडा याहून भयावह असू शकतो. कृषिप्रधान राज्य म्हणून ओळख असलेल्या महाराष्ट्राला ही आकडेवारी नक्कीच लांछनास्पद आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री ज्या विभागातून येतात त्या विदर्भात आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक आहे. निवडणूका जवळ आल्या कि शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीच्या घोषणा सर्वच पक्षांकडून केल्या जातात. शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवण्याची, शेतकऱ्यांना सधन आणि समृद्ध करण्याची स्वप्ने दाखवली जातात. प्रत्यक्षात मात्र जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी थोड्या कर्जाच्या ओझ्यापायी आपली जीवनयात्रा संपवली. ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरु आहे. आजतागायत एकही राजकीय पक्ष ठोस उपाय काढू शकलेला नाही. ■ सौ. मोक्षदा घाणेकर

## क्रिकेट संघांना विश्वचषकासाठी कोणते गोलंदाज निवडावे हा प्रश्न

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल २०२४ चा १७ वा हंगाम मध्यावर पोहोचला असताना अनेक नवनवीन विक्रम नोंदवले जात आहेत. अनेक संघांकडून अवघ्या २० षटकात (१२० चेंडूत) सहजतेने अडीशे धावांचा टप्पा ओलांडला जात आहे. चौकार, षटकारांची बरसात होत आहे. नुकताच कोलकात्याच्या ईडन गार्डन्समध्ये पंजाब किंग्ज आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्यात आयपीएल २०२४ चा ४२ वा सामना खेळला गेला. योगायोगाने या सामन्यात ४२ सर्वाधिक षटकार मारण्याचा ऐतिहासिक विश्वविक्रम नोंदवला गेला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना कोलकाता नाइट रायडर्स संघाने फिलिप सॉल्ट ७५ धावा आणि सुनील नरेन ७१ धावा यांच्या मदतीने २० षटकात ६ गडी गमावून २६१ धावांचा डोंगर उभा केला. हा सामना कोलकाता संघ सहजतेने जिंकेल असे वाटले परंतू २६१ धावांच्या डोंगराचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या पंजाब किंग्जने जॉनी बेअरस्टोने ४८ चेंडूंत झळकावलेल्या १०८ धावांच्या बळावर १८.४ षटकातच ८ गडी राखून विजय मिळवला. मात्र एकीकडे फलंदाजाकडून धावांचे डोंगर उभारले जात असतानाच दुसरीकडे गोलंदाजांची धुलाई सुरु आहे. त्यामुळे १ ते २९ जून दरम्यान वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी नेमके कोणते गोलंदाज निवडावे असा प्रश्न अनेक क्रिकेट संघाना पडला आहे. ■ प्रदीप मोरे

## मतदान टक्का घसरला

लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यात लोकसभेच्या ८८ जागांसाठी मतदान झाले. यात १३ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होता. या मतदार संघात सरासरी ६१.५० टक्के एवढे मतदान झाले. देशात उन्हाच्या तीव्र झळा असल्याने मतदान कमी झाल्याचे सांगण्यात येते. पहिल्या टप्प्यात सुद्धा हीच परिस्थिती कायम होती. महाराष्ट्रातील टक्का फारच घसरला असून सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५३. ५१ टक्के एवढे मतदान झाले. सर्वाधिक मतदान त्रिपुरा राज्यात झाले. तेथील मतदानाची टक्केवारी ७८.८२ टक्के एवढी होती. उत्तर प्रदेश मध्ये अगदीच कमी म्हणजे ५४.८३ एवढे मतदान झाले. शुक्रवारी मतदान झालेल्या ८८ मतदार संघात २०१९ मध्ये ७०.०९ टक्के एवढे मतदान झाले होते. ते यावेळी ६१.५० एवढे नोंदविण्यात आले. अजूनही देशातील ४० टक्के मतदार मतदान करत नाहीत. राजकीय पक्षांसह सरकार व स्वयंसेवी संस्था टक्केवारी वाढावी असा प्रचार करत आहेत. प्रत्यक्षात म्हणावे तसे यश नाही असे दिसते. ■ शांताराम वाघ

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार,ता.३.५.२०२४** विक्रम संवत २०८०, शिवशक ३५०, शालिवाहन शके १९४६,क्रोधी नाम संवत्सरे, उत्तरायणे,वसंत ऋतो, चैत्र मासे,कृष्ण पक्षे, दशमी तिथी २३.४५ नंतर एकादशी तिथी शततारका नक्षत्र,२४.०७ नंतर पूर्वा भाद्रपदा नक्षत्र,कुंभ रास,ब्रम्हा योग, १४.१९ नंतर ऐंद्र योग,वणिज करण,१२.४२ नंतर विष्ठी करण,२३.२५ पर्यंत दिनमान १२.३८,सुर्योदय ६.११ सुर्यास्त १८.४९, (कोल्हापूरचे)राहू काळ सकाळी १०.३० ते १२, उत्तम दिवस दुपारी १२ पर्यंत सर्व कामास शुभ कुपनलिका ब्रयति नारायणानंद सरस्वती आराधना नृसिंहवाडी,नाथयात्रा विटा,भद्रा १२.४२ ते २३.२५ पर्यंत.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.प्रेम आणि चविष्ट पदार्थ ही चांगल्या वैवाहिक आयुष्याची मूल तत्वे आहेत.

**वृषभ**- दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. मित्र आणि अनोळखी यांच्यातील फरकओळखण्याची सावधनता बाळगा.

**मिथून**-कामाच्या ताणामुळे तणाव आज जाणवेल. आर्थिक रूपात आज तुम्ही बरेच मजबूत असाल ग्रह नक्षत्रांच्या चालीने आज तुमच्यासाठी धन कमावण्यासाठी संधी.

**कर्क**-आज तुमचे स्वास्थ्य उत्तम राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुमच्या उत्तम स्वास्थ्य सोबत आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत खेळण्याचा प्लॅन बनवू शकतात.

**सिंह**-तुमच्या मनावर ग्रासलेला विषाद काढून टाका त्यामुळे तुमच्या प्रगतीत अडसर निर्माण झाला आहे. रिअल इस्टेट आणि आर्थिक व्यवहारांसाठी चांगला दिवस.

**कन्या**-तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी रहाल.आज तुमचे धन बऱ्याच गोष्टींवर खर्च होऊ शकते

**तुळ**-आपल्या वजनावर लक्ष ठेवा, अतिखाण्यात आनंद मानू नका. आज तुम्ही जमीन, स्थावर जंगम मालमत्ता किंवा सांस्कृतिक प्रकल्प यासारख्या विषयांवर लक्ष केंद्रीत करा.

**वृश्चिक**-उच्च व्यक्तिमत्वाला भेटताना उदास होऊन आपला आत्मविश्वास हरवू देऊ नका. ते जसे आरोग्यासाठीफायदेशीर आहे.आपल्या व्यवसायाचे भांडवल देखील आहे.

**धनु**- पुन्हा ऊर्जा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या. आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे.

**मकर**-थोडासा व्यायाम करून तुमचा दिवस सुरू करा. त्यामुळे तुमचे तुम्हालाच चांगले वाटेल. आज तुम्ही आपले धन धार्मिक कार्यात लावू शकतात

**कुंभ**-भावनिकदृष्ट्या खूप असुरक्षित असाल म्हणून तुम्ही दुखावले जाल अशा परिस्थिती,प्रसंगांपासून दूर राहा, सावध राहा. तुमच्याअवास्तव नियोजनामुळे निधीची कमतरता भासेल.

**मीन**-कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्याच करा. मोठ्या योजना आणि चांगल्या संकल्पना असलेली व्यक्ती तुमचे लक्ष वेधून घेईल

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१.
टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**विकणे-मजले, आळते** रोडवर हातकणंगले पासून २ किमी अंतरावर साडे आठ गुंठे इंडस्ट्रिज एनए जागा ५००० स्के. फुट बांधकाम विकणे आहे. संपर्क- ८८३०९०३०३४ (६८ एचपी लाईट, २ बोअरसह)

**विकणे आहे-** १) टायर चेंजर (मेनेटिक) २) सर्व्हिसींग मशिन (LG) फोन नं. ९३७११७१०६९

**15 KAV** किर्लोस्कर कं.चा २००५ मॉडेल चालू स्थितीतील जनरेटर विकणे आहे. मो. ९४२२४१३४३७

**For Sale-** 2BHK, Decent Reewed Flat at Kapad Market Housing Complex. Contact-9370134149

**कलेक्टर NA**प्लॉट विकणे जागा २४७६ स्के. फूट आहे. दर १५०० रू. स्के. फूट आहे. पत्ता- एकता कॉलनी, इस्कॉन टेम्पलजवळ, इचलकरंजी. ९८५०६१८०८३, ९६५७०२१२३४

**कबनूर दत्तनगरमध्ये** ६ गुंठे, रामलिंग रोडलगत ४ एकर, कोरोचीमध्ये १०० गुंठे कलेक्टर एनए, तहसिलदार एनए, डांबरी रस्ता, गटार, टीपी ले आऊट, पाणी, लाईट, सोयीसह ८००, १०००, १५०० स्के. फुटाचे प्लॉट विकणे आहेत. संपर्क- ८१४९९६५६९९, ९०२८७०७१०९

**सर्व कंपन्याचे** कुलर, फॅन, फ्रिज, एलईडी, टिव्ही, होमथिएटर, रिमोट स्वस्त मिळतील. भारत इलेक्ट्रॉनिक्स एसटी स्टँडजवळ, स्टेट बँकेसमोर, इचलकरंजी. फोन-७५१७९६९६८०

**फ्लॅट विकणे-** दुसऱ्या मजल्यावर ३ बीएचके (१०३२) स्के. फूट पार्किंग व सर्व सोयीनियुक्त पंचवटी टॉकीज परिसर, इचलकरंजी. फोन- ८४८२९८८८०९,८६९८००२०००

**१ बीएचके** प्रशस्त फ्लॅट ६७५ स्के. फूट विकणे आहे. गावभाग, इचलकरंजी. फोन- ९८५०११४२४९.

**घर विकणे आहे-** कबनूर. फोन- ९९२१४८४९५३

**टू बीएचके** रिसेंट फ्लॅट अर्जंट विकणे. लिफ्ट व पार्किंगची सोय. संपर्क-९६७३२९९६५५, ७०३०७६००५६

**चायना रॅपिअर** लुम २३० सीएम-१०, चायना रॅपिअर लुम १८० सीएम-१०, योग्य किंमत आलेस चालू कंडीशनमध्ये भाड्याने देणे अथवा विकणे आहे. मो. ९३७३४५६९१९

**जयसिंगपूर गांधी** रोड ७ वी गल्ली येथील बोळ बाजुची ३५X४०=१४०० स्के. फुट जागा जुन्या बांधकामसह विकणे आहे. संपर्क-८१४९०२५९०९

**हॉटेल साहित्य** विकणे आहे- लोखंडी टेबल, खुर्च्या, किचन कट्टा भांडी इत्यादी. संपर्क- ९८८१६६९५८५, ८२०८३५८६३८

**वाहन कर्ज -** बोलेरो, मॅक्सी, पिकअप, दोस्त, छोटा हत्ती, महिंद्रा जितो, सुपर कॅरीसाठी कर्ज उपलब्ध. मो. ८९७५७५२४९८.

**कार लोन -** जुन्या कारसाठी २०१२ पासून पुढील मॉडेल्सवर कमीत कमी कागदपत्रात कर्ज मंजूरी. मो. ८९७५७५२४९८.

### यात्रासहल विषयक

**गार्गी टुरिजम-** २१/०५ काशी, अयोध्या, दिल्ली, आग्रा, वैष्णोदेवी, अमृतसरसह उत्तर भारत, २५/०५, चारधाम यात्रासह दक्षिणभारत, नेपाळ, ९५४५२६४२४९, ८१८००००१३८

### कर्ज विषयक

**होमलोन -** मॉर्गेज प्लॉटतारण खरेदी एनए असो नसो मुद्रालोन आण्णासो पाटील लोन २५ कोटीपर्यंत खात्रीने मंजुरी- ९०९६०६६५०५, ७०५८७२१३२५

**एलआयसी-** हाऊसींग तुमचे होम लोन साकार करेल. तुमच्या स्वप्नातील घरासाठी तुम्ही आम्हाला संपर्क करा-९१३०८१३७२०, ७०५८५८३७२०

### * नोकरी विषयक *

**Urgently Required** at General Machine Tools, Yadrav, Ichalkaranji. Required Diploma holder in Mechanical/Electrical for Compressor Sales & Service with experience of 2-3 year. Contact 9922939136

Vacancy for Male Freshers Graduate for Industrial oil Marketing. Gandhar Oil. Contact-9422043313. Salary+Incentive+Perks

**दवाखान्यात कामासाठी** डे/नाईट मावशी पाहिजे. संपर्क-प्रफुल्ल नर्सिंग होम. मंगलधामजवळ.- ८८३०२१८३१७

**पाहिजेत- सर्व्हीसिंग** कामासाठी अनुभवी व शिकावू कामगार पाहिजे. भेटा- सुपर सर्व्हिसींग सेंटर, नदीनाका, इचल. पगार-८००० ते १२०००. फोन नं. ९३७११७१०६९

**कॉम्प्युटर ऑपरेटर** पाहिजे- गरजू, प्रामाणिक, फक्त बिलींगकरीता. संपर्क-बाळासाहेब पु. वडगावे, सोनपावली मारूती मंदिरजवळ, सुतारमळा, चौक-इचलकरंजी

**हॉटेल नंदादीपमध्ये** अनुभवी वेटर पाहिजे. पगार १२ हजार. संपर्क- ९९२१८१४८१४

**मेडीकल्समध्ये** अनुभवी व शिकाऊ मुले व मुली पाहिजेत. मो.९८६०८२४६३५

**पाहिजेत-** इचलकरंजीस्थित नामांकित कंपनीत १. ड्रायव्हर ट्रान्सपोर्ट लायसन्सधारक २. लोडर १०वी/१२ वी पास/नापास ३. हाऊस किपिंगसाठी (स्त्री/पुरूष) शिक्षणाची अट नाही. नियमानुसार पगार, दुप्पट ओव्हर टाईम, पीएफ, ईएसआयसीचा लाभ व इतर लाभ संपर्क-७७६७८१४३०७, ९६८९१७५११०

**पेढी व फिनीश** शर्टींग गोडावूनसाठी दिवाणजी कामगार पाहिजे. पगार १० ते १२ हजार. संपर्क- ९४२२४१७३४५

**एअर कंडिशनर** आणि कोल्ड स्टोरेज मेंटेनन्स व इंस्टॉलेशन कामासाठी शिकावू व होतकरू मुले पाहिजेत. संपर्क-९६५७०७८६९७

**ड्रायव्हर पाहिजे-** होंडा सिटी कारवर निर्व्यसनी अनुभवी संपर्क- किरण गॅससमोर, 'चंद्रा' बिल्डींग. ७४९९६१७२७२

**पाहिजेत-** ऑफिस कामासाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे. वय मर्यादा ४० वर्षे. संपर्क-९९२२५५९९१९

**अकौटंट पाहिजे-** जेन्टस्/लेडीज मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स सम्राट अशोकनगर, आवळे मैदानजवळ, इचलकरंजी

**पॅकींगसाठी लेडीज** पाहिजे- कामासाठी मुलगा पाहिजे. गारमेंटची शिलाई कामे घटीपन देऊ. संपर्क- ८२०८०२७९३४, ९४०४२६८२५४

**पाहिजेत-** नामांकित टेक्स्टाईल मिलमध्ये अनुभवी क्वॉलिटी राऊंड- १ चेकर पाहिजेत. शिक्षण बीएससी- १ बीकॉम-१ बी.ए. पाहिजे. संपर्क- ७४१००८८७७०

**Requirements-** Sales Executives Education: Any Graduadeev/DME Experience 0 to 1 year. Contact-7410088770

**व्हीएमसी** ऑपरेटर पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क- जयटेक इंजिनिअर, गणेशनगर, ७ वी गल्ली. मो. ९४२३०४१०२०, ९४२१२०६४४४

**रेडीमेड कपड्याच्या** दुकानमध्ये हुशार गरजू सेल्समन पाहिजे. संपर्क- श्री नटराज ड्रेसेस, १४, शॉपिंग सेंटर, इचलकरंजी- ८५५२००३२६४

**मेडिकलमध्ये विवाहीत** लेडीज/जेंटस फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क- दि सुखरूप औषधालय, उत्तम-प्रकाश टॉकीजजवळ, इचलकरंजी. मो. ९७३००८६०००

**साडी/कापड** दुकानात शिकाऊ/अनुभवी लेडीज/जेंटस् कामगार पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क- जनता क्लॉथ एम्पोरियम, इचलकरंजी. ७६२०६२४३७७

**घोडावत पेट्रोल** पंप, मजले (हातकणंगले) येथे कॅशीयर व ऑफिसबॉय पाहिजे. संपर्क- ८६५७७५३३३३

**घोडावत पेट्रोलपंपजवळ** मजले (हातकणंगले) येथे गाड्यामध्ये पेट्रोल, डिझेल सोडणेकरीता लेडीज/जेंटस पाहिजे. संपर्क- ७४११६८२५९४, ९१४६०६३३२९

**जयसिंगूपर येथील** ओल्ड मुंबई आई स्क्रीममध्ये शॉपमध्ये कामाकरीता जेंटस/लेडीज पाहिजेत. संपर्क-८६५७७५३३३३

**भेळशॉपमध्ये** भेळ बनवणेचे कामाकरीता जेंटस/लेडीज पाहिजे. संपर्क-८६५७७५३३३३, घोडावत पेट्रोल पंप, मजले (हातकणंगले)

**कामगार पाहिजेत-** अनुभवी, शिकावू समक्ष भेटा. पंचगंगा सर्व्हिसिंग सेंटर, स्टेशन रोड, माणिक स्टीलसमोर, आकर्षक पगार, अनुभवी ११ हजार, शिकाऊ ९००० हजार

**अकौटंट पाहिजे-** टॅली ERP अनुभव आवश्यक लेडीज/जेन्टस् फुल टाईम. संपर्क-९४२११००५५५

**अनुभवी व शिकावू** सेल्समन आणि वायरमन पाहिजेत. संपर्क- ९४२११००५५५

**JIO** कंपनीमध्ये प्रमोटर 'फिल्ड सेल्स एक्झ्युक्युटिव्ह' भरती सुरू. पगार+इन्सेंटिव्ह+ पी.एफ.+ईएसआसी सुविधा. ९२२६५५३४००

**नामवंत कंपनीमध्ये** पाहिजेत- १०वी/१२ वी झालेली शिकाऊ मुले-०४, मॅकॅनिकल डिप्लोमा फ्रेशर/अनुभवी-०६, लाईन इन्स्पेक्टर-०२ सोबत PF/ESIC ची सुविधा,इचलकरंजी.९१७५९६७७६७, ८९५६१६९६९६

**शहापूर येथे** हार्डवेअर दुकानात कामगार पाहिजे. संपर्क- ९९२२३८१८३७

**दिवाणजी पाहिजे-** धर्मनगर, निमशिरगाव फाटा येथील फॅक्टरीमध्ये दिवाणजी पाहिजे. परिसरातील लोकांना प्राधान्य. संपर्क-९८२३६९९६९६

**सेल्समन मुले व महिला** (विवाहीत) पाहिजेत. शोरूमध्ये कामासाठी वेळ सकाळी ९.३० ते ७.३० पगार व इन्सेटिव्ह १२०००+ भेटा. सुशीतो इंटरप्राईजेस, कोल्हापूर रोड, मॉडर्न हायस्कूलसमोर, इचलकरंजी. फोन.८४८४९६३०४०

**मल्टीब्रॅण्ड कार** वर्कशॉफकरीता अनुभवी व प्रामाणिक मेकॅनिक पाहिजे. जागा-३. संपर्क- ९०११९७७७११

**विजय कृषी अवजारे** या नामांकित कंपनीमध्ये मार्केटींग इक्झीक्युटीव्ह या पदाकरीता उमेदवार भरणेचे आहेत. जागा ४, महाराष्ट्र, कर्नाटक, ओडिसा आणि तेलंगणा अनुभवी व्यक्तीस प्राधान्य. संपर्क- ९०११९५३०२५, ९६५७७२१२२८

**पतसंस्थेत** ड्रायव्हर नेमणे आहे. विवाहीत, निर्व्यसनींना प्राधान्य. संपर्क-७४४७४४९४९१

**पतसंस्थे मध्ये** अकौटंट नेमणे आहे. अनुभवी विवाहीत महिलांना प्राधान्य. संपर्क-९६०७००७३१०७

**लॅबमध्ये, कामासाठी** MLT/DMLT मुले/मुली पाहिजेत. अनुभवींना प्राधान्य. समक्ष भेटा. श्री. बालाजी क्लिनिकल लॅबोरेटरी, पाटील आर्थोपेडीक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपाद नगर, इचलकरंजी

**पाहिजेत-** इचलकरंजीस्थित नामांकित बेकरीकरीता १) टेलिफोन ऑपरेटर/ऑर्डर घेणेसाठी १२ वी/ पदवीधर+बेसिक कॉम्प्युटर ज्ञान पुरूष/महिला ३) हाऊसकिपींगसाठी पुरूष/महिला शिक्षणाची अट नाही. संपर्क -९६९९०१७८४९, ७७६७९०६३६३

**डोळ्याच्या दवाखान्यात** नाईट ड्युटीसाठी मुलगा पाहिजे. (स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्यास प्राधान्य) पत्ता- मगदूम हॉस्पिटल जुन्या नगरपालिकेच्या मागे, फोनं.- ८६२५०६३४६६

**बिन्स पॅराडाईस** कॉफी शॉपमध्ये अनुभवी हॉटेल मॅनेजमेंट कोर्स केलेल्या कामगार पाहिजे. संपर्क- ९०२१००८७३१, ८६००६४३१०२

**पाहिजेत-** १)डिस्पॅच सुपरवायझर- ४, कोणत्याही शाखेचा पदवीधर, अनुभवी २) ड्रायव्हर-ट्रॅक्टर व महिंद्रा टाटा गाडीवर (TR , लायसन आवश्यक) संपर्क-९७६६२५६६५५

**पाहिजेत-** उत्कृष्ट स्वयंपाक करणारी महिला पाहिजे. (इचलकरंजी परिसरातील असावी) संपर्क-८५५४९८३८०२, ९७६६२५६६५५

**पेट्रोल पंपावर** शिकाऊ/अनुभवी जेंटस/लेडीज कामगार पाहिजेत. संपर्क-८०८७०४१००१, ८०५५१४२८८८

**कापड दुकानात** कामासाठी अनुभवी /शिकाऊ सेल्समन पाहिजे. संपर्क-९७६७३७४५१६

**पाहिजेत-** सिक्युरीटी स्टाफ, पगार-१२००० ते १३५००/- आठ तास कागल शिरोली एमआयडीसीकरीता सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. मो.७४४७४०१८६९, ७४४७४०१८६५

**कबनूर येथे** हॉटेलमध्ये कामासाठी रोटीवाला पाहिजे. संपर्क- ८३२९९११५२४

Required Videographer-1 Telecaller-3, Eagle spoken English Acadamy near Bhagyarekha theatre. 9175924058,9975455437

WORKERS REQURIDED-for Machine shop- Job Inspectors-3, CNC/VMC Operators-1, Quality Incharge-1. For Foundry. Melting Supervisor-1. 2-3 Years Experience Reqd. for All Posts. Contact-9158434345

**कापड दुकानात** कामकरणेसाठी शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजेत. संपर्क - ठाकूरदास अॅण्ड कंपनी, गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**हॉस्पिटलमध्ये** मेडिकल ऑफीसर मॉर्निंगसाठी (Male), अनुभवी स्टाफ नाईटसाठी (Male) पाहिजेत. संपर्क - सुशिलादत्त आर्थोपेडिक सेंटर, महासत्ता चौक, इचलकरंजी.

**मशिन वर्कशॉपसाठी-** १)टर्नर कम वेल्डर २)शिकाऊ कामगार पाहिजे. ३) टर्नर पाहिजे. संपर्क- ९७६२८०४९५६, ९९६०३०२२८२

**कामगार पाहिजेत-** लेडीज/जेन्टस् पत्ता-मेट्रो इंड. पार्वती इंड. इस्टेट, यड्राव.७८८८००६४०६

**गारमेंटकरिता** हेल्पर मुले व कटींग मास्टर पाहिजेत. वर्धमान चौक, इचलकरंजी-९५७९९९९७३९

**पाहिजेत -** शिटमेटल/ऑरगन वेल्डर, सी.ओ. २ वेल्डर/ हेल्पर पाहिजे. विशाल इंडस्ट्रिज, पार्वती गेट, खोतवाडी, मो. ९१४६७६९६५६, ८९९९५००७७३.

**सीएनसी ऑपरेटर** पाहिजेत (जागा ७) (लेडीज चालतील) संपर्क - पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव. मो. ९८८१२३१०८५, ९९७०५७८१०८..

### * भाड्याने देणे *

**२ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे शिवाजी चौक, विठ्ठल मंदिरजवळ, तारदाळ. संपर्क-९९२२१८६३२८

**महासत्ता चौकापासून** जवळ, शांत व प्रसन्न वातावरणातील १ आरके रूम भाड्याने देणेचे आहे. संपर्क-श्री सहदेव कदम (सर) आमराई रोड, शिक्षक कॉलनी. मो.नं. ७६२०३४१८४२, ७६२०३५१०९८

**शेड भाड्याने देणे-** आरसीसी बिल्डींग पहिला मजला, ५००० स्के. चे शेड गारमेंन्ट किंवा तागे गोडावूनसाठी भाड्याने देण्याचे आहे, २ टन कपॅसिटीचे लिफ्टची सोय आहे. मो. नं. ९४२२४१३४३७, ९४२२४१३४३८

**२५०० स्के.** फुटाची आरसीसी शेड भाड्याने देणे. २ ऑफिस बोअरची सोय. संपर्क-८६००८८०८९२

**प्राईम लोकेशन** शोरूमकरीता दुकानगाळे भाड्याने देणे. शरद कॉलेजजवळ, इचलकरंजी. ९८५०६१८०८३, ९६५७०२१२३४

**५१X३०** चे शेड भाड्याने देणे आहे- लोकमान्यनगर, कोरोची. संपर्क- ९४२२८८५७२३, ९०२२०३३२७४

**सरस्वती हायस्कूलजवळ** २ बीएचके घर शाकाहारी कुटूंबासाठी भाड्याने देणे आहे. तसेच तारदाळ येथे प्राईडजवळ ८४०० फुट बिगरशेती प्लॉट विकणे आहे. संपर्क-७०२०३११०५०

**भाड्याने देणे-** मध्यवस्तीमध्ये वेताळ मंदिरजवळ, २ रे मजल्यावरती किचन हॉल, बेडरूम स्के. सोयीनियुक्त भाड्याने देणे. टीडी कुंभार, इचलकरंजी- ७०२०७०२१४९

**भाड्याने देणे-** ४७ X५५ चे आरसीसी शेड सर्वसोयींनी युक्त १९ HP लाईटसह खंजीरे इस्टेट, पाण्याच्या टाकीजवळ, इचलकरंजी.८८८८९९७९७६, ९८५०९०९१४६

**रूम भाड्याने देणे-** बॅचलर व्यक्तीसाठी सिंगल रूम १२X१० सर्व सोयीनियुक्त मंगळवार पेठ, इचलकरंजी. फोन - ९७६४२०२६८०

**गाळा भाड्याने देणे-** कागवाडे मळा, मध्यवस्तीत १२०० स्केअर फूट बँक, पतसंस्था वा शोरूमसाठी भाड्याने देणे. संपर्क- ९४२२०४४८२१

**भाड्याने देणे-** सर्वसोयीनियुक्त रोडटच ३०X३० स्क्वे. फूट २ बीएचके फ्लॅट बोअरसहीत. संपर्क- चैतन्य आयुर्वेद दवाखाना, विक्रमनगर. ९१७५१०६८२९, ९४२००१०१५०

**१ बीएचके-** फ्लॅट भाड्याने देणे. वेताळ पेठ, वेताळ मंदिरजवळ, इचलकरंजी (२४ तास पाणी) संपर्क-९४०५२२८१३९

**२ बीएचके** २ फ्लॅट भाड्याने देणे- ११ वी, १२ व अकॅडमी मुलांकरीता शाहू कॉर्नर. संपर्क-९४२०४३२४७७

**भाड्याने देणे-** १ बीएचके व वन रूम किचन शाकाहारी कुटूंबासाठी भाड्याने देणे. थोरात चौक, शांतीनगर, इचलकरंजी. डॉ. थोरात. ९८२०२४५४७६

**सर्व सोयीनियुक्त** शेड भाड्याने मिळेल. कोल्हापूर रोड, व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूलमागे, पाटील मळा, कबनूर. संपर्क-९४२०४५४२२२

**विकली मार्केटसमोर** इचलकरंजी येथे आरसीसी गाळा ऑफिस, पतसंस्था फायनान्स कंपनी,मेडिकल लॅब इ. साठी भाड्याने देणे आहे. संपर्क-९१७५७८८३९६, ९०९६३३०३७५

**आरसीसी गाळा** भाड्याने देणे आहे. पत्ता - जुना डॉ. अरूण पाटील हॉस्पीटलशेजारी, स्वामी अपार्टमेंट रोड, (मेन रोड) इचलकरंजी. फोन७७६८९९११२३,७७०९६९९७४७

**भाड्याने देणे-घेणे-** २००० ते २०००० स्के. फूट पर्यंत एअरजेट/ रॅपीअर/सायझिंगचा शेड विकत/ भाड्याने मिळतील. संपर्क- ८२०८७९२२५९

**शहराच्या** मध्यवस्तीमध्ये सर्व सोयीनियुक्त २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. ग्राऊंड फ्लोअर. संपर्क-९३७११५७१२०

**गांधीकॅम्प, पद्माकर** कोल्ड्रींकशेजारी १४०० स्क्वे. फुटाचे ३ गाळे बँक,पतसंस्था, ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. संपर्क- ९४२२५८१६३२, ९११२६९०५७०

**शेड भाड्याने देणे-** २५X७० इंडस्ट्रियल लाईट दहा एचपी व्यंकटेश कॉलनीजवळ, जवाहरनगर, इचलकरंजी. ९७६४४०५८८९

**घर भाड्याने देणे** - मध्यवस्तीत आरसीसी २ रुम सर्वसोयीनीयुक्त, इंदिरा हौसिंग सोसायटीमध्ये कबनूर, मो. ९४२३२८४७८३.

**१० X १५** आरसीसी गाळा भाड्याने देणे व सिंगल रूम सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क- ९९७०२५००८५, शांतीनगर, इचलकरंजी

**१७०० स्क्वे.** फूट आरसीसी सर्वसोयीनियुक्त गोडावून जनता बँकेजवळ भाड्याने देणे. संपर्क- ९८९०९०९८००

## छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद

### * आरोग्य विषयक *

**मानसिक आजार,** व्यसनमुक्ती, लैगिंक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलार, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे, कमजारी इ. लैगिंक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमिट करण्याची सोय. निर्मुल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र. स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क- ८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६.

**आई वृध्दाश्रम** निमशिरगांव- पॅरालिसेस, कॅन्सर, मतिमंद, अंथरूणाला खिळून असलेले तसेच परावलंबित्व लेडिज वृध्दांची सेवा सुश्रुषा, केली जाईल. मो. ८८०५९२४०२३

### विवाह विषयक

'**वधु पाहिजेत-** वर मुस्लिम, वय २८ व २६ गरीब, सुशिक्षीत, अपेक्षा-गोरी धार्मिक. मो. ८३९०९२८०११

### बोअरवेल विषयक

**श्री साई बोअरवेल-** ५'' व ६।।'' बोअर योग्य व खात्रीशीर दरात मारून मिळेल. संपर्क- ९८८१३५५८१३, ९९२२७७२०३६

### शैक्षणिक विषयक

**श्री साई स्वामी** मजले २ व्हीलर, ट्रेनिंग खास लेडीज/मुलींसाठी घरपोच सेवा (सुट्टीमध्ये-टू व्हिरल-फोर व्हिलर शिका) संपर्क- ७०५८९९१५६३

**इचलकरंजीमध्ये** शेअर मार्केट समर कँप फक्त ९९९ रू. दि.२/५/२४ ते ८/५/२४ जवाहरनगर, इचलकरंजी.८००७७१८०१८

### यात्रासहल विषयक

**१४ मे** काशी, अयोध्या, प्रयाग, सहा ज्योतिर्लिंग, प्रवास १२ दिवस दि.१० जुलै अमरनाथ, काश्मीर, वैष्णोदेवी. १८ दिवस बसने. ९४२०५९२५२४, ९४०३९५३४१२

### * कर्ज विषयक *

**शेती तारण-२** एकर पुढे शेतीवर कर्ज ५ लाखा पर्यंत कर्ज मिळेल. डेअरी दूध विक्रीवर कर्ज मिळेल. ९५९५९१९६२५

**१० लाख** ते ५ कोटी पर्यंतचे कर्ज त्वरीत मिळेल. तसेच दुकानदार व्यापारीकरीता पिग्मीवर लोन मिळेल. संपर्क-७७६७९०७२४२

**पर्सनल,होम,मॉर्गेज,** पर्चेस प्रापर्टी, गोठा प्रकल्प, शेळी पालन, गावठाण प्रॉपर्टी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, असेसमेंट उतारा, प्लॉट, बीटी, टॉप अप, सर्व प्रकारचे व्हेईकल लोन, प्रोजेक्ट लोन (CMEGP व PMEGP) त्वरीत कर्जमंजुरी व मार्गदर्शन भेटा. के.जी.एन. फायनान्स. मो. ८३२९९२२४४१

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक**


# कराड उत्तर मतदारसंघाची निवडणूक तयारी पुर्ण

कराड,ता.२(प्रतिनिधी)

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी सातारा लोकसभा मतदारसंघ अंतर्गत २५९ कराड उत्तर मतदारसंघामध्ये प्रशासनाची तयारी सुरु आहे. २५९ उत्तर कराड विधानसभा मतदार संघ निवडणूक कार्यालयाचे कामकाज स्वर्गीय यशवंतराव चव्हाण बहुउद्दशीय हॉल, कराड येथे सुरु असल्याची माहिती कराड उत्तरचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रांत चव्हाण यांनी दिली.**

कराड उत्तर विधानसभा मतदार संघामध्ये ३३९ मतदार केंद्र आहेत. नोंदणीकृत मतदारांची संख्या २९६९४५ इतकी आहे. निवडणूक प्रक्रीया राबवण्यासाठी मतदान केंद्रांवर एकूण २५०४ कर्मचारी यांची आवश्यकता आहे. स्थानिक महिला कर्मचारी वगळता उर्वरीत कर्मचारी जिल्ह्यातील इतर तालुक्यातून येणार आहेत. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. गृह मतदानासाठी संमती दिलेले ८५ वर्षाच्या वरील वृध्द मतदारांची संख्या २६६ इतकी आहे, दिव्यांग मतदारांची संख्या ३२ इतकी असून त्यांचे टपाली मतदान मतदारचे घरी जावून १ मे ते ४ मे कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे. त्यासाठी मतदारसंघामध्ये एकूण राखील १० मतदान पथके तयार करण्यात आलेली आहेत. या प्रक्रीयेवर लक्ष ठेवण्यासाठी १० मायक्रो ऑब्जरवर व व्हिडीओग्राफर, पोलीस यांची नियुक्ती केली आहे.

मतदार संघामध्ये कराड-विटा रोड, कराड पुसेसावळी रोड, शामगाव, तासवडे टोलनाका, रहिमतपूर, वाठार किरोली रोड, कराड-विटा रोड, चोराडे फाटा या पाच ठिकाणी सहा स्थिर निगराणी पथके कार्यरत आहेत. मतदान प्रक्रीयेकरीता ईव्हीएम यंत्र तयार करण्याची प्रक्रीया दि. २९ व ३० एप्रिल रोजी पुर्ण करण्यात आली. स्वीप कक्षाकडून मतदारसंघामध्ये जास्ती जास्त मतदान होण्यासाठी २६ गावात जनजागृती करण्यात आली आहे. कराड उत्तर मतदार संघाच्या निवडणूक कार्यालयातील विविध पथकांच्या कामकाजाबाबत निवडणूक खर्च निरीक्षक कुमार उदय यांनी भेट देवून आढावा बैठक घेतली. निवडणूक प्रक्रीया सुरळीतपणे पुर्ण होण्यासाठी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र डूडी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन सज्ज असल्याची चव्हाण यांनी सांगितले.

# खानापूर - जांबोटी मार्गावर ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

बेळगाव,ता.२(प्रतिनिधी)

**खानापूर-जांबोटी मार्गावरील बाचोळी कत्री (शनया) समोर ॲक्टिवा दुचाकीला ट्रकने पाठीमागून ठोकल्याने एक जण ठार झाल्याची घटना गुरूवारी दुपारी १२.३० च्या दरम्यान घडली आहे.**

याबाबत माहिती अशी की, खानापूर तालुक्यातील शिवठाण येथील युवक विदेश तुकाराम मिराशी (वय २८) हा आपल्या मित्रासह एका लग्न समारंभासाठी ॲक्टिवा दुचाकीवरून जात होता. यावेळी पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या एका ट्रकने धडक दिल्याने दुचाकीवर पाठीमागे बसलेला त्याचा मित्र बाजूला उडून पडला तर विदेश तुकाराम मिराशी रस्त्यावरच पडल्याने ट्रकचे चाक त्याच्या मांडीवरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने खानापूर सरकारी रुग्णालयात दाखल केले. परंतु त्या ठिकाणी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

सदर ट्रक एका लग्नाचे वऱ्हाड घेऊन लग्नकार्यासाठी जात होता अशी माहिती प्राप्त झाली आहे. अपघात होताच ट्रक चालक ट्रक न थांबवताच तसाच पुढे निघून गेल्याचे समजते. याबाबत खानापूर पोलीस स्थानकात गुन्ह्याची नोंद झाली असून खानापूर पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# पावसामुळे पुन्हा दुबईची तारांबळ

मुंबई,ता.२

**गेल्या महिन्यात संयुक्त अरब अमिराती मध्ये आलेल्या भीषण पूरानंतर काही दिवसांनी, गुरुवारी पहाटे अबू धाबी आणि दुबईला मुसळधार पाऊस आणि वादळाचा तडाखा बसला.** स्थानिक प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, दुबईतील नागरिक गुरुवारी पहाटे तीन वाजता जोरदार वारा, गडगडाट आणि विजेच्या कडकडाटाने जागे झाले. यामुळे अबू धाबीच्या काही भागात रस्त्यावर पाणी साचले आहे. दरम्यान, देशाच्या हवामान खात्याने एम्बर अॅलर्ट जारी केला, ज्यामुळे देशाच्या बहुतांश भागात पावसाच्या ढगांनी झाकले असल्याचे सूचित केले.

# कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

गारगोटी,ता.२(प्रतिनिधी)

**गारगोटी ते पाटगाव मार्गावर शेणगाव गावच्या हद्दीत बुधवारी रात्री अल्टो कारने मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात मोटारसायकल स्वार ठार झाला. दयानंद रामू भोसले (वय ५७, रा.कडगाव,ता.भुदरगड) असे मृताचे नाव आहे. मृत व्यक्तीच्या भावाने कार चालकाविरोधात भुदरगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**

याबाबत माहिती अशी की, मृत दयानंद भोसले हे गारगोटी येथे बाजारासाठी आले होते. ते गारगोटीहून आपल्या गावी कडगावला ज्युपिटर मोटारसायकल (क्र.एम एच०९ एफ ए ५८१६) वरून जात होते. रात्री सव्वा आठचे सुमारास ते शेणगाव हद्दीतील गणपती मंदिराचे अलीकडे आले असता पाटगावकडून गारगोटीकडे जाणाऱ्या मारुती अल्टो कार (क्र.एम एच ०६ एझेड ३०१२) या कारने मोटारसायकलला जोराची धडक दिली. या अपघातात मोटारसायकलस्वार भोसले हे ठार झाले.

मृत भोसले हे गावी शेती करत होते, त्यांचे पश्चात पत्नी, एक मुलगी, भाऊ असा परिवार आहे. मृत भोसले यांचे भाऊ तुळशीदास यादव यांनी भुदरगड पोलिसांत फिर्याद दिली आहे. अल्टो कार चालक पियुष रमेश कोरवी (रा.मुदाळ तिट्टा,ता भुदरगड) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास भुदरगड पोलीस करत आहेत.

# प्रज्वल रेवन्नच्या विरोधात 'लूकआऊट' नोटीस

बंगळुरू, ता.२

**माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू आणि जनता दल सेक्युलर (जेडीएस) नेते प्रज्वल रेवन्ना यांच्या विरोधात ग्लोबल लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. सेक्स टेप प्रकरणी एसआयटीने ही नोटीस जारी केली असून जगातील सर्व इमिग्रेशन पॉईंट्सना ही नोटीस पाठवण्यात आली आहे.**

प्रज्वल रेवन्ना यांचे नाव सेक्स सीडी प्रकरणात आल्यानंतर जेडीएस पक्षातून त्यांना काढून टाकण्यात आले आहे. प्रज्वल हे जेडीएसकडून हसन मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. या मतदारसंघात मतदान पार पडले आहे. मतदानानंतर प्रज्वल जर्मनीला निघून गेले. प्रज्वल यांच्या अश्लील व्हिडिओ प्रकरणी एका विशेष टीमची स्थापना करण्यात आली आहे. याप्रकरणी मुख्यमंत्री सिद्दरामय्या म्हणाले की, काही व्हिडिओ समोर आले असून यात महिलांवर अत्याचार झाल्याचे दिसत आहे. यासंदर्भात ३३ व्हिडिओ क्लीप व्हायरल होत आहेत. निवडणुकीच्या काही दिवस आधीच हे व्हिडिओ समोर आले होते. प्रज्वल यांनी अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. प्रज्वल आणि त्यांच्या वडिलांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

# पाल येथून २० टन कलिंगड पिकाची चोरी उंब्रज पोलीस ठाण्यात अज्ञातावर गुन्हा

कराड,ता.२ (प्रतिनिधी)

**पाल, ता. कराड येथील शेतकऱ्याने लागवड केलेल्या तोडीस आलेल्या दोन लाख रुपये किंमतीच्या २० टन कलिंगड पिकाची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत दाखल फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर उंब्रज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत रविंद्र रामराव पाटील रा.पाल,ता.कराड यांनी उंब्रज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती की, पाल, ता. कराड येथील शेतकरी रविंद्र रामराव पाटील यांनी आपल्या शेतामध्ये दोन एकर कलिंगडची लागवड केली आहे. दि.२६ रोजी सकाळच्या सुमारास फिर्यादी शेतात गेले असता, शेतात वर्दळ झाल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी शेतात फिरून पाहिले असता शेतातील तयार झालेले मोठे कलिंगड फळ अज्ञाताने तोडून चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तसेच याआधीही अज्ञाताने कलिंगड फळ तोडून चोरून नेत असल्याचे फिर्यादी पाटील यांच्या लक्षात आले. यावरून दोन एकर शेतीत लागवड केलेले तयार झालेले सुमारे दोन लाख रुपये किंमतीचे २० टन कलिंगड फळ चोरून नेले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी उंब्रज पोलीस तपास करत आहेत.

# सचिन हॉस्पिटल येथे रविवारी मोफत स्त्रीरोग शिबिर

मिरज ता.२ प्रतिनिधी

मिरजेतील सचिन हॉस्पिटल (टेस्ट ट्यूब बेबी सेंटर) यांच्यावतीने रविवार (दि.५) मे रोजी सकाळी ९ ते सायं. ४ या वेळेत मोफत वंध्यत्व निवारण व स्त्री रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डॉ. सचिन सुगण्णावर व व डॉ.सौ.नेहा सुगण्णावर यांनी दिली. यावेळी डॉ. सचिन सुगण्णावर म्हणाले, मूल न झालेल्या दाम्पत्यांवर व स्त्रियांमधील सर्व आजारांवर हॉस्पिटलमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने उपचार केले जातात. सचिन हॉस्पिटल हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्त्रीरोग व वंध्यत्व निवारण (टेस्ट ट्यूब बेबी) सेंटर आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून सचिन हॉस्पिटलतर्फे स्त्रीरोग व वंध्यत्व निवारण मार्गदर्शन शिबिराचे सातत्याने आयोजन करण्यात येते. रविवारी (दि.५)मे रोजी घेण्यात येणाऱ्या या शिबिरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ञ डॉक्टरांचे पथक सहभागी होणार आहे.

# वस्त्रनगरीतील व्यापार,उद्योग,सहकार,शिक्षण क्षेत्रातील दिपस्तंभ कै.मदनलालजी बोहरा

**गेल्या ७ दशकाहून अधिक काळ या वस्त्रनगरी इचलकरंजी शहरामध्ये आपल्या असामान्य कार्य-कर्तृत्वाने वर्तमानाबरोबरच पुढील पिढ्यांसाठीही प्रकाशवाटा निर्माण करणारे आदर्शवत व असामान्य व्यक्तीमत्त्व वस्त्रनगरी इचलकरंजीच्या उद्योग, व्यापार, सहकार, शिक्षण क्षेत्रातील दिपस्तंभ समजले जाणारे आदरणीय कै. श्रीमान मदनलालजी बोहरा (शेठजी) यांचे आज तृतीय पुण्यस्मरण. त्यानिमित्ताने.....**



७ ऑक्टोबर, १९३२ साली राजस्थान मधील नेणिया (जि. नागौर) या खेड्यात शेठजींचा जन्म झाला. घरची अत्यंत गरीब परीस्थिती, नापिक जमिन अशातच वयाच्या १० व्या वर्षी मातृछत्र हरपलेले व जेमतेम ४ थी पर्यंत शिक्षण घेत, नानाविध संकटांच्या गर्तेतून मदनलालजी बोहरा नावाचे 'सुवर्ण' परीस्थितीच्या अग्निदिव्यातून तावून-सुलाखून निघत होते. फक्त मनाच्या सकारात्मक आणि दुर्दम्य आत्मविश्वासाच्या जोरावरच.

वयाच्या १६ व्या वर्षी आपले काका स्व. आसारामजी बोहरा यांच्या सोबत ते इचलकरंजीला आले आणि त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास सुरू झाला. स्व. दगडूलालजी मर्दा यांच्या मे. लक्ष्मीकांत भगवानदास या पेढीवरती ते नोकरीस लागले. त्यानंतर पुढे त्यांनी आपल्या कामाच्या कौशल्याने, सूक्ष्म निरीक्षण, चिकित्सक वृत्ती व कार्याची चिकाटी या जोरावर इचलकरंजी नगरीत स्वदेशी ट्रेडिंग कंपनीची मुहूर्तमेढ रोवली. गेल्या ६० वर्षात स्वदेशी डाईंग ॲण्ड ब्लिचिंग मिल्स प्रा.लि. बरोबरच भारत ट्रेडिंग कंपनी, पारीक सायझिंग व स्वदेशी सायझर्स, श्रीनिवास पुरुषोत्तम ॲन्ड कंपनी व स्वदेशी टेक्सटाईल ग्रुपच्या माध्यमातून यंत्रमाग, रॅपीयर, एअरजेट, सायझिंग व प्रोसेस हाऊस आदी नानाविध उद्योग समूहांच्या उभारणी तसेच विस्तारिकरणामध्ये कालानुरुप अद्यावत निर्माण करीत वस्त्रनगरीच्या उद्योग-व्यवसाय व व्यापाराला एक नवी प्रेरक दिशा दिली.

इचलकरंजी शहरातील पहिले कापड मार्केट स्व. अनंतरावजी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली उभारले गेले. या वास्तूच्या उभारणीत शेठजींचा मोलाचा वाटा होता. पुढे शहराच्या वाढत्या विस्ताराबरोबर शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन शेठजींच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त अनेक व्यापारी बंधूनी नव्या कापड मार्केटचा प्रस्ताव शेठजींसमोर ठेवला आणि शेठजींनी क्षणाचाही विलंब न लावता सुरवात केली. अन १९९८ च्या दरम्यान मदनलाल बोहरा को-ऑप क्लॉथ मार्केट/हौसिंग सोसायटीची भव्य-दिव्य वास्तू उभारली. तेथे १९७ गाळ्यांमधून वस्त्रोद्योगाची नवी दालने सुरू झाली. शेठजींनी बोहरा मार्केट परिसरामध्ये विलोभनीय असे बालाजी मंदिर तसेच खंजिरे इंडस्ट्रियल इस्टेट मध्ये संकटमोचन हनुमान मंदिर ही उभारले.

पुष्कर या तीर्थक्षेत्री अखिल भारत वर्षीय पारीक आश्रमाची भव्य वास्तू उभारण्यातही शेठजींचा सिंहाचा वाटा आहे. त्याचबरोबर हरिद्वार येथे अखिल भारतवर्ष पारीक समाज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून कार्य करत असताना भव्य दिव्य वास्तू लोकवर्गणी व स्वखर्चातून उभारली. त्यांच्या या असामान्य योगदानासाठीच त्यांना 'पारीकरत्न'असे संबोधले जाते.

श्री नारायण बाबासाहेब एज्युकेशन सोसायटीचे माजी प्रेसिडेंट म्हणून त्यांची वेगळी ओळख शैक्षणिक क्षेत्रात आहे.

शेठजींनी इचलकरंजीमध्ये अनेक भव्य लोकोपयोगी वास्तू उभारल्या यापैकी एक म्हणजे 'गायत्री-भवन' होय. स्व. ताराचंदजी बोहरा व स्व. शंकरलालजी दायमा आदी ज्येष्ठ व्यक्तींच्या सहकायनि व शेठजींच्या पुढाकाराने श्री गायत्री सेवा मंडळच्या माध्यमातून 'गायत्री भवन' ची स्थापना झाली. त्याचबरोबर कोल्हापूर रोडवर पारीक हौसिंग सोसायटीच्या ४ इमारतीमध्ये ४८ संकुले साकारली. कुंटुंबवत्सल शेठजींच्या जीवनाच्या वाटचालीत त्यांच्या अर्धांगिणी कै. गीताबाई यांची लाभलेली भक्कम साथ हेच त्यांच्या प्रसन्नमुद्रेची साक्ष होती. शेठ्जीचा कार्याचा वारसा त्याचे नातू कै. हरिषजी बोहरा यांनी उत्तम रित्या सांभाळला होता. कै. मदनलालजी बोहरा शेठजींच्या प्रामाणिक सेवावृत्ती व आशावादीपणाचा चिरतंन प्रवाह त्यांचे सुपुत्र श्रीनिवासजी, राजेंद्रजी व पुरुषोत्तमजी यांनी स्वीकारला आहे व याच पावलांवर पाऊल ठेवित नातू रोहित, कृष्णा व राहुल मार्गक्रमण करीत आहेत. शेठजींच्या उद्योग-व्यवसायासह त्यांच्या शैक्षणिक कार्याची धुरा आज श्री. नारायणराव बाबासाहेब एज्युकेशन सोसायटीचे प्रेसिडेंट श्री. श्रीनिवासजी बोहरा व चेअरमन कृष्णा बोहरा हे उत्तमरित्या सांभाळत आहेत.

समाजासाठी, शिक्षणासाठी, मानवसेवेसाठी अव्याहत कार्यरत असणाऱ्या शेठजींच्या परीस स्पर्शाने अनेकांच्या आयुष्याचे सोने झाले त्याच शेठजींच्या उत्तुंग कार्याचा संस्काराचा, ज्ञानदानाचा, समाजसेवेचा हा विचाररथ आपण सर्वांनीच पुढे न्यायचा आहे. हीच खरी शेठजींना व सौ. गीताबाई (दादी) यांना श्रध्दांजली ठरेल. त्यांच्या पवित्र आत्म्यास परमेश्वरचरणी चिरशांती लाभो हीच प्रार्थना.

**-प्रा. युवराज मोहिते,**
(गोविंदराव ज्युनिअर कॉलेज, इचलकरंजी.)

# यळगुड-मांगूर चेकपोस्टवर साडेसहा लाखाचे दागिने जप्त

**हुपरी ता.२ प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने अवैध हालचालींवर नजर ठेवण्यासाठी जवळच असलेल्या कर्नाटक सीमेवर यळगूड मांगूर रोडवर चेक पोस्ट सुरू आहे.तपासणी दरम्यान एक चांदी व्यापारी दागिने घेऊन जात असताना सापडला आहे.त्याचेकडून ६ लाख ६० हजार रुपयांहून अधिक किंमतीचे १६ किलो १२१ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने जप्त केले आहेत.संदीप आनंदा शिंदे रा.पाण्याच्या टाकीजवळ मांगूर असे त्याचे नाव आहे.**

जवळच असलेल्या कर्नाटक सीमेवरील मांगूर,कुन्नूर व बारवाड या ठिकाणी चांदी हस्तकला उद्योग केला जातो यातूनच हुपरी शहराची या भागातील लोकांचे व्यापारी हितसंबंध गुंतलेले आहेत मात्र या घटनेने हुपरी शहरातील व्यापारी वर्गाचे धाबे दणाणले आहेत. एस. एस.टी.पथकातील प्रकाश पाटील, युवराज पाटील,व पो.कॉ.लक्ष्मण ठोकळ यांच्या पथकाने ही कारवाई केली असून सदर जप्त करण्यात आलेली चांदी कोल्हापूर येथील ट्रेझरी मध्ये जमा केली आहे.चांदी उद्योगाला निवडणूक काळातील आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर मुक्त व्यापार करता येईल म्हणून एकीकडे चांदी हस्तकला फाडेशनचे संचालक मंडळ चांदी कारखानदार असोसिएशनचे पदाधिकारी धडपडत असताना संबंधित यंत्रणांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेण्याची ग्वाही दिली होती यातच ही घटना घडल्याने चांदी उद्योजकामधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

लोकप्रतिनीधी निवडणुकीत चांदी उद्योगांतील आयडेंटिटी आणि भयमुक्त व्यापार यांवर ढीगभर शब्दांचे बुडबुडे सोडतात मात्र प्रत्यक्षात याबाबत ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत याचा फटका हजारो कारागिरांना बसला आहे कामकाज ठप्प असल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

ही हुपरी शहराची शोकांतिका आहे याकरिता संबंधित विभागाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून हालचाल करावी अशी मागणी केली जात आहे.

***सांगली,ता.३ (प्रतिनिधी)**

मिरज तालुक्यातील फळ मार्केट ते धामणी कडे जाणाऱ्या रोडवर शिवीगाळ करू नका असे म्हणाल्याचा रागातून एका युवकास दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली. सदरचा प्रकार हा सोमवार दि. २९ एप्रिल रोजी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडला.

## कारची सुमोला धडक; चालक जखमी

**सांगली,ता.३ (प्रतिनिधी)-**

कोल्हापूर ते सांगली या मार्गावर फळ मार्केट जवळ भरधाव वेगात असलेल्या एका कारने समोरून येणाऱ्या टाटा सुमो गाडीला जोराची धडक दिली. या अपघातात कार मधील चालक गंभीर जखमी झाले. सदरचा अपघात हा सोमवार दि. २९ एप्रिल रोजी रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास झाला. या प्रकरणी विठ्ठल गोपाळ पाटील (वय ६० रा. कवठेपिरान) यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी चालक विजय विष्णू सरक (रा. आटपाडी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात डॅटसन कार आणि सुमो या दोनही वाहनांचे मोठे नुकसान झाले. या अपघातात सरक हे जखमी झाले. अपघातानंतर विठ्ठल पाटील यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.


## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ गट नंबर ७५९ हिस्सा क्रमांक १ यापैकी बिगरशेती भुखंड क्रमांक. १५९ क्षेत्र ९२-९३ चौ.मी चा खुला प्लॉट यासी चतु:सिमा- पुर्वेस - विशाल कुन्नुर यांची मिळकत, पश्चिमेस विजयानंद कडदास यांची मिळकत, दक्षिणेस - उत्तम विभूते यांची मिळकत, उत्तरेस- २० फुट रुंदीचा रस्ता येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत सौ नजमा नुरमहंमद शेरकर रा. इचलकरंजी यांच्या मालकीची असून त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असललेचा निर्वाळा देवून आमचे अशिलांशी भरीव संचकार रक्कम स्विकारून खरेदीपुर्व करार केलेली आहे. सबब, सदर मिळकती बाबत कोणाचाही कसलाही हक्क सबंध, करार, बोजा वैगेरे असलेस तो त्यांनी आजपासून ०७ दिवसाचे आत आम्हास खालील पत्त्यावल कागदपत्रांसह लेखी पटवून द्यावा. म्हणून दिली जाहीर नोटीस अशी दि. ३०/०४/२०२४.

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**
३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी,ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर
मो.९८८१०१४७२५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६४० पैकी प्लॉट नं. ०९ चे क्षेत्र - ११२.० चौ. मी. खुली जागा व घर मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - केसरकर यांची मिळकत, पश्चिमेस - देवकते यांची मिळकत, दक्षिणेस- दास यांची मिळकत, उत्तरेस- २० फुट रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही असिफ आमीर काझी, अफरीना आमीर काझी व वहिदा आमीर काझी रा. तारदाळ यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस . सही ता. ३०/०४/२०२४

**ॲड.बाबासो एम.पाटील,**
ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी पब्लिक, रा.१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी,इचलकरंजी,

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन-जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी मौ. कोरोची ग्रामपंचायत हददीतील मिळकतीचा क.ग.नं.७३९ क्षेत्र हे.० १० आर आकार रु.० ६९ पैसे यापैकी प्लॉट नं.३ व ४ क्षेत्र १८५० चौ. फुट याचे १७१.९३ चौ.मी. ची खुली मिळकत यांसी चतु:सिमा पुर्वेस - मारुती शिंदे वगैरे यांचीच मिळकत, पश्चिमेस - मारुती शिंदे वगैरे यांचीच मिळकत, दक्षिणेस- बबन माने यांची मिळकत, उत्तरेस- १२ फुट रुंदीचा रस्ता.

२) वर नमुद मिळकत ही श्रीमाबाई शिवराम शिंदे व श्री मारुती शिवराम शिंदे, रा. कोरोची यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकारा दाखल रक्कम स्विकारुन मिळकतीचे संचकारपावतीने खरेदीपत्र करुन देणेचे मान्य केले आहे. सबब वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही दावा, पोटगी अर्ज, मनाई दावा, आरक्षण, करारपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. ३०/०४/२०२४ इ. रोजीचे.

**ॲड.श्री.सुनिल सु.धुपदाळे**
रा.१७/२९४,पुजारी मळा, इचलकरंजी
मो.नं. ९३२६०२२३८५

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन :- जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी क. इचलकरंजी म्युनिसिपल हददीतील रि.स.नं. ६५७/३/ब क्षेत्र हे ०-४९.५ आर. पॉ. आकार रु. ६.८३ पै. अंतीम रेखांकनानंतर तयार करणेत आलेल्या मिळकत पत्रिकेपैकी सि.स.नं. १८१४८/४ पैकी भुखंड नं. ४ चे क्षेत्र २९१.०० चौ.मि. यासी चतु:सिमा पुर्वेस- याच गट नंबरपैकी भुखंड क्र. ५ ची मिळकत, पश्चिमेस - ४० फुट रुंदीचा डी. पी. रस्ता, दक्षिणेस - २० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस - श्री पाटील यांची भुखंड क्र. ३ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील तदंगभुत हक्कासह व इजमेंटरी हक्कासहची मिळकत.

२. येणेप्रमाणे वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही १. श्री अनिलकुमार देवकरण डाळ्या, २. श्री सुहास गुणधर आकीवाटे, ३. सौ. भाग्यश्री सुहास आकीवाटे, ४. श्री नितीन रामकिशोर धुत, व ५. श्री धनराज देवकरण डाळया सर्व रा. इचलकरंजी यांचे मालकी व कब्जा वहीवाटीची असुन त्यांनी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा आमचे अशिलानां देवून सदरची मिळकत कायम खुष खरेदी देणेचे ठरवले आहे व संचकारादाखल रक्कमही स्विकारली आहे.त्याप्रमाणे आमचे अशिल लवकरच खरेदीपत्र पुर्ण करुन घेणार आहेत.

सबब, सदर मिळकतींवर कोणाचेही तारण गहाण, कब्जा, पोटगी, वहिवाट, कुळ, वहिवाट, दान, चालु दावा, ॲटेचमेंट, खरेदी, करार, इजमेट अगर इतर कोणतेही कायदेशीर हक्क संबंध असलेस ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत अस्सल कागदपत्रांसह आमचे खाली पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून आपल्या हक्काचा खुलासा करावा. म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. २९/४/२०२४.

**ॲड.जी.पी.कोल्हापुरे,**
रा.१६/६६६, नवीन शिवाजीनगर पोलिस स्टेशन जवळ, इचलकरंजी, मो.नं. ९८५०१०४२७३

## जाहीर नोटीस

ता. हातकणंगले पैकी मौजे कोरोची येथील क.ग.नं. ६०६ यापैकी बिगरशेती प्लॉट नं. १ पैकी उत्तर बाजूची क्षेत्र ६६०-० चौ. फुट याचे ६१-३ चौ.मी. ची जागा व यावरील बंदिस्त मिळकत यातील असले सर्व प्रकारचे सोईसह याचा घर नं. २६७६ ने नोंद आहे. यासी चतु:सिमा- पूर्वेस - गट नं. ६०५ ची मिळकत, पश्चिमेस- सरकारी रस्ता, दक्षिणेस- सदर प्लॉट नं. पैकी बाळासाहेब चौगुले यांची मिळकत व उत्तरेस - गणपते यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत सर्व ही श्री. सुभाष दगडु उगलमुगले रा. कोरोची यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिल यांना कायम व खुष खरेदी देणेचे ठरवुन संचकार भरीव रक्कम स्विकारुन तसा करार करुन देवुन वरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळाही उगलमुगले यांनी आमचे अशिल यांना दिलेला आहे.

सदर वरील मिळकतीवर अन्य कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, करार, लेखी अगर तोंडी व्यवहार केलेला असलेस अथवा कसलाही हक्क, अधिकार, वगैरे असलेस ते त्यांनी सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रासह समक्ष भेटुन खात्री करुन द्यावी. मुदतीत हरकत न आलेस आमचे अशिल वरील मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण करुन घेतील म्हणून दिली जाहीर नोटीस सही. दि. ०२/०५/२०२४

**ॲड.बाबासो एम.पाटील**
नोटरी (भारत सरकार)
१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी.
मो.९२२६८८७००१

## जाहीर नोटीस

आमचे अशिल राम टेक, नोंदणीकृत भागीदारी फर्म तर्फे भागीदार हरीष जुगलकिशोर मालू व रामनिवास जुगलकिशोर मालू, दोघे रा. ३०६/३०७, मंगळवार पेठ, माधवनगर - ४१६४०६, तालुका - मिरज, जिल्हा - सांगली यांनी दिलेले माहितीवरून, त्यांचे सांगणेवरून, त्यांचे करिता तमाम लोकांना कळविणेकरिता प्रसिद्ध करणेत येते की,

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी मिरज पैकी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील शहर कुपवाड येथील औद्योगिक क्षेत्रातील पड शेतजमीन रि.स.नं. २१ / २ ( याचा सांगली जुना सर्व्हे नंबर २१/२) याचे एकूण क्षेत्र हे. ०-७४ आर आकार रु.०-०० पैसे यापैकी हे.०-२४.६७ आर यापैकी निम्मा हिस्सा हे. ०- १२.३३५ आर म्हणजेच १२३४-०० चौ. मी. ची मिळकत यांसी चतु:सिमा पूर्वेस - आमचे अशिल राम टेक यांची मिळकत, दक्षिणेस याच नंबर पैकी राजेंद्र घोडावत यांचे क्षेत्र, पश्चिमेस - छाया मासाळ, आण्णासाहेब पाटोळे, हिम्मतलाल साखळा व चिवटे यांच्या मिळकती, उत्तरेस - शंकर भिकूशेठ पालकर यांच्या मालकीचे उर्वरीत क्षेत्र व त्यापलीकडे सरकारी रस्ता येणेप्रमाणे चतुः सिमेतील हे ० -१२.३३५ आर म्हणजेच १२३४-०० चौ. मी. क्षेत्राची जमीन मिळकत. त्यातील झाड-झुडूप, काष्ट, पाषाण इ. तदंगभूत मालमत्तेसह व इजमेंटरी हक्कासह सर्व .

वर नमूद केलेली मिळकत ही आपले मालकी वहिवाटीची निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून शंकर भिकूशेठ पालकर, रा. बामणोली, तालुका मिरज, जिल्हा - सांगली यांनी आमचे अशिलांना कायम व खुष खरेदी देणेचे ठरवून आमचे अशिलांचे नावे नोंदणीकृत खरेदीपूर्व करारपत्र करून दिले आहे व आमचे अशिलांचेकडून संचकारादाखल भरीव रक्कमही स्विकारली आहे. ठरलेप्रमाणे आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करणेस सुरूवातीपासून तयार होते, आहेत व असतील. तथापि शंकर भिकूशेठ पालकर यांचे कृत्याने खरेदीपूर्व करारपत्राप्रमाणे सदर मिळकतीचे खरेदीपत्र पुरे होणेचे राहिले आहे. नोंदणीकृत खरेदीपूर्व करारानंतर शंकर भिकूशेठ पालकर यांनी दि. २१/१०/२०२३ इ. रोजी सदर मिळकतीचा खुला कब्जा आमचे अशिलांना दिलेला असून सदर मिळकत आमचे अशिलांचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असताना शंकर भिकूशेठ पालकर हे सदर मिळकत खरेदी घेणेचे आमचे अशिलांचे न्याय्य व कायदेशीर हक्क डावलून सदरची मिळकत त्रयस्त इसमाचे नावाने बेकायदेशीररित्या विक्री किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करणेचे प्रयत्नात असलेचे आमचे अशिलांना समजून आले आहे व शंकर भिकूशेठ पालकर हे आमचे अशिलांना तसे बोलूनही दाखवीत आहेत. आमचे अशिलांचे न्याय्य व कायदेशीर हक्कांना डावलून शंकर भिकूशेठ पालकर यांचेशी संगनमत करून सदर मिळकतीचे खरेदीचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हस्तांतरणाचा व्यवहार कोणीही शंकर भिकूशेठ पालकर यांचेशी केलेस ती बाब आमचे अशिलांचेकडून कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नसून संबंधित सर्वांचे विरुद्ध आमचे अशिल फौजदारी व दिवाणी कायदेशिर कारवाई करतील.

सबब, सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळवून ताकीद देणेत येते की वर केलेली मिळकत आमचे अशिल खरेदी घेणेस तयार असलेने कोणीही शंकर भिकूशेठ पालकर यांचेशी सदर मिळकतीचे खरेदीबाबत किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा कसलाही व्यवहार करू नये. केलेस तो आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही. तसेच आमचे अशिल संबंधितांवर कायदेशीर फौजदारीसह सर्व प्रकारच्या कायदेशीर कारवाया करतील. त्यात कोणाचीही गय केली जाणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

म्हणून प्रसिद्ध केली जाहीर नोटीस ता.०२/०५/२०२४.

**ॲड.सौ.नेहा सौरभ धूत**
बी.कॉम.,एलएल.एम.
ॲडव्होकेट
सी-६०, न्यू लॉयर्स चेंबर्स, जिल्हा न्यायालय परिसर, शिवाजीनगर, पुणे-४११००५ (महाराष्ट्र) (मोबा.९५५२६६५२७२)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेकरिता आमचे अशिलांचे तर्फे प्रसिद्ध करणेत येते की,

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व तुकडी कोल्हापूर ता. हातकणंगले क।। इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील, मे. सहदुय्यम निबंधकसो वर्ग-२ इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील, इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं.६ हिस्सा क्र. १९ यामधील भूखंड क्र. १ चे क्षेत्र चौ. मी. १३८०.० ची मिळकत इचलकरंजी नगरपरिषद यांचेकडील गुंठेवारी नियमाधीन परवाना क्र.७१/१६-१७ दिनांक २२/१२/२०१७ इ. रोजीने गुंठेवारी झालेली आहे. तसेच मा. तहसिलदारसो, हातकणंगले यांचेकडील बिगरशेती आदेश क्र. बि. शे/ वशि/ ११६२/२०१९ दिनांक ०१/०८/२०१९ इ. रोजीने बिगरशेती झालेली आहे. यामधील भूखंड क्र. १ सी याचे क्षेत्र १७३.० चौ. मी. १८६१.४८ चौ. फुट ची खुली जमीन मिळकत. यासी चतु:सिमा :- पुर्वेस - प्लॉट नं.१ ची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नं.१ डी ची मिळकत, पश्चिमेस - ३० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं.१ बी ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत आतील तदंगभुत वस्तुसह व इजमेंटरी हक्कासह सर्व.

वर नमूद केलेली मिळकत ही आपले मालकी वहिवाटीची निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून श्री. संजय महादेव कांबळे व श्री. उल्हास दत्तात्रय सुर्यवंशी, रा. इचलकरंजी यांनी आमचे अशिलांना कायम व खुष खरेदी देणेचे ठरवून आमचे अशिलांचे नावे खरेदीपूर्व करारपत्र करून दिले आहे व संचकारही स्विकारला आहे. ठरलेप्रमाणे वर नमूद केले मिळकतीचे खरेदीचा व्यवहार आमचे अशिल लवकरच पूर्ण करणार आहेत.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही तारण, गहाण, कब्जा, बोजा, लिज, बक्षीसपत्र, हक्क, जप्ती, इजमेंट, मृत्यूपत्र, कूळ, पोटगी अगर कोणतेही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांत खालील पत्त्यावर आपली हरकत/तक्रार सर्व कागदपत्रांनिशी रजिस्टर्ड ए. डी. द्वारे लेखी कळवावी. मुदतीत कोणाची तक्रार न आलेस सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. म्हणून प्रसिद्ध केली जाहीर नोटीस सही ता. ०२/०५/२०२४.

**ॲड.सौ.नेहा सौरभ धूत**
बी.कॉम.,एलएल.एम.
ॲडव्होकेट
सी-६०, न्यू लॉयर्स चेंबर्स, जिल्हा न्यायालय परिसर, शिवाजीनगर, पुणे-४११००५ (महाराष्ट्र) (मोबा.९५५२६६५२७२)

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन :-

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ असलेली मौजे शहापूर येथील क. ग.नं. ६२, क्षेत्र हे . २.०२ आर .पो . ख . क्षेत्र ०.१० आर . आकार रू १.९० पैसे यापैकी गुंठेवारी बिगरशेती भुखंड नं.१५ चे क्षेत्र ५३३.६४ चौ.मी. व भुखंड नं. २४ चे क्षेत्र ३९८.६९ चौ. मी . याचे एकुण क्षेत्र ९३२.३३ चौ. मी. ची मिळकत इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजी यांचेकडील आदेशाने सबडिव्हीजन करून घेतलेले असुन ते पुढीलप्रमाणे १. भुखंड नं. १५+२४ / ए चे क्षेत्र १५३.८३ चौ. मी. २. भुखंड नं. १५+२४ / बी चे क्षेत्र १८०.०१ चौ. मी . ३ . भुखंड नं. १५+२४ / सी चे क्षेत्र १६० - १० चौ. मी . येणेप्रमाणे वर भुखंड नं. १ ते ३ मधील भुखंड नंबर एकासएक लगत असुन याची एकत्रीत क्षेत्र ५३१४ . ७९ चौ. फुट म्हणजेच ४९३ . ९४ चौ.मी. ची खुली बिगरशेती झालेली मिळकत यांसी एकत्रीत चतुः सिमा पुढीलप्रमाणे पुर्वेस :- तुकडा नं. १६ श्री गुरसाळे यांची मिळकत, पश्चिमेस :- ४० फुटी सरकारी रस्ता, दक्षिणेस :- श्री चौथे यांची मिळकत व उत्तरेस :- २० फुटी सरकारी रस्ता येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत यास यापुढे मिळकत असे संबोधिले आहे.

२) वरील पॅरा नं १ मधील मिळकत ही १. श्री श्रीरंग जयराम वेर्णेकर, रा. हुबळी २. श्री संकेत सुरेश कुर्डेकर मयत करीता वारस २.१ श्रीमती श्रीनिधी संकेत कुर्डेकर २.२ समर्थ संकेत कुर्डेकर २.३ गौतमी संकेत कुर्डेकर २.४ सौ सुधा सुरेश कुर्डेकर रा. इचलकरंजी यांचे मालकी वहीवाटीची असून सदरील मिळकतीच्या सातबारा पत्रकी मालक सदरी त्यांचे नावाची नोंद असून त्यांनी त्यांची मिळकत विक्रीस काढलेली आहे. सदरील मिळकती संदर्भात त्यांनी आमच्या अशिलांशी नोटरी करार करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदरील मिळकत निर्वेध व निष्किर्जी असलेचा निर्वाळा मुळ मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही कसलाही हक्क, करार, बोजा, कोर्ट केसेस ,प्रिएम्शन, तारण, पोटगी ॲटेचमेंट, अग्रहक्क, बक्षिस, दान, कुळ हक्क, आरक्षण वगैरे हक्कसंबध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह कळवावे . मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस सदरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी आहे असे गृहीत धरून आमचे अशिल जागा मालक यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही म्हणुन प्रसिध्द केली जाहीर नोटीस सही ता.३०.०४.२४.

**ॲड. पंकज आण्णासो पाटील**
ऑफीस-श्री दत्त अपार्टमेंट,गाळा नं.१, सांगली नाका, इचलकरंजी, ४१६११५, मो. नं. ९०२१२३७६८७.



व्यक्तीमत्व विकास शिबीरप्रसंगी उपस्थित प्रमुख मान्यवर.

## सुलतानपुरे विद्यामंदिरमध्ये व्यक्तीमत्व विकास शिबीर संपन्न

इचलकरंजी,ता.२–

**येथील वीरशैव उत्कर्ष मंडळ संचलित मृगेंद्रआण्णा सुलतानपुरे प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानिकेतन हायस्कूल व ज्युनि.कॉलेज, डी.एम.बिरादार बाल विद्यामंदिर व राष्ट्र सेवादल यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तीमत्व विकास शिबीर संपन्न झाले.**

या शिबिरात ८ ते १४ वयोगटातील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या शिबिराच्या पहिल्या दिवशी ध्वजारोहणासाठी सौ.हेमल सुलतानपुरे, रीटा रॉड्रीग्युज, सुनिल पवार, बाबा नदाफ, सुषमा साळुंखे, रवि जावळे हे उपस्थित होते. शिबिरातील विद्यार्थ्यांना एरोबिक्स, कॅलेस्थॅनिक, बर्ची, झांज, पथनाट्य, प्रबोधनपर गाणी शिकवण्यात आली. शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पवन लोकरे हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आर.आर.पाटील,सौ.शैलजा पाटील, अशोक चनविरे, श्री.कित्तुरे, सुनिल पवार, बाळासाहेब गायकवाड, गणपती शिंदे आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन सौ.सोनल जाधव यांनी तर आभार मुख्याध्यापिका सौ. भेंडवडे यांनी मानले.

## महाराष्ट्र दिनी पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

कोल्हापूर,ता.२(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या स्थापना दिनानिमित्त छत्रपती शाहू स्टेडियम येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते झाला.**



यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे,निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक कुटुंबिय, ज्येष्ठ नागरिक, अन्य मान्यवर, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी परेड कमांडर सोबत परेडचे निरीक्षण केले. तसेच पालकमंत्री मुश्रीफ यांनी उपस्थितांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



## शिरोळ तालुक्यात आंध्र प्रदेशातील ९६ विशेष पोलिस दाखल

शिरोळ,ता.२(प्रतिनिधी)–

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरोळ तालुक्यात आंध्र प्रदेश राज्यातील ९६ विशेष पोलिस कर्मचारी दाखल झाले असून शिरोळ तालुक्यातील कुरुंदवाड, शिरोळ आणि जयसिंगपूर पोलीस ठाण्यात या तुकड्या दाखल झाले आहेत.**

शिरोळ तालुक्यातील गणेशवाडी, पाचवा मैल, शिवनाकवाडी आणि उदगाव अंकली टोलनाका या ठिकाणी सदरचे पोलीस तपासणी नाक्यावर कार्यरत झाले आहेत. याचबरोबर शिरोळ तालुक्यातील प्रत्येक गावा- गावात संबंधित पोलीस ठाण्यामार्फत आंध्र प्रदेश पोलिसांच्या माध्यमातून रूट मार्च सुरू करण्यात आला आहे.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरोळ तालुक्यातील शांतता व व्यवस्था राखण्यासाठी संबंधित विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणात पोलीस यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. सध्या हातकणंगले लोकसभा मतदारसंघात मोठमोठ्या नेत्यांच्या सभा संपन्न होत आहेत. यासाठी स्थानिक पोलीस यंत्रणेवर मोठा ताण पडत असून आंध्रप्रदेश विशेष पोलिसांचे पथक शिरोळ तालुक्यात दाखल झाले आहे. ७ मे पर्यंत सदरचे पोलीस शिरोळ तालुक्यात कार्यरत असणार आहेत. तसेच येत्या दोन ते तीन दिवसात सुमारे ४०० ते ५०० पोलिसांचा जादा फौजफाटा शिरोळ तालुक्यात दाखल होणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाच्यावतीने देण्यात आली.

# हुपरी परिसरातील गावांमध्ये प्रचार शिगेला

### ६८ हजारांचे निर्णायक मतदान; उमेदवार निवडताना मतदारांची सत्वपरिक्षा ठरणार

हुपरी,ता.२(प्रतिनिधी)–

**हातकणंगले विधानसभा मतदारसंघात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या हुपरी परिसरातील पहिल्या नवनिर्मित हुपरी नगरपरिषदेतील विरोधी पक्ष व सत्ताधाऱ्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. शेतकरी संघटनेचा एकला चलो नारा, राष्ट्रवादी, शिवसेना, आरपीआय, ताराराणी विकास आघाडी व मनसे महायुतीची बुलेट ट्रेन धावत आहे. तर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आता नाही तर कधीच नाही, असा पवित्रा घेतल्याने हातकणंगले लोकसभा मतदारसंघात निवडणूक लक्षवेधी ठरणार आहे. हुपरी परिसरातील गावांमध्ये प्रचार शिगेला पोहचलेला आहे.**

हुपरी परिसरातील गावांमध्ये हुपरी (२३,६७४), पट्टणकोडोली (१५,२७९), रेंदाळ (१३,९३२) अशी एकूण ५२ हजार ८८५ ही सगळ्यात जास्त मतदार संख्या असलेली गावे आहेत तर तळंदगे (४,१६८),इंगळी (५,६४८),यळगूड (५,६६८) अशी एकूण १५ हजार ४८४ ही कमी मतदान असलेली गावे आहेत. यांची गोळाबेरीज ६८ हजार ३६९ हे निर्णायक मतदान आहे. या ठिकाणी शिवसेनेचे चांगले प्राबल्य आहे. हुपरी शहरात महावीर गाट यांनी भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढविली आणि जिंकून सौ.जयश्री गाट यांना नगराध्यक्षपदी विराजमान करुन ७ नगरसेवक व दोन अपक्ष सोबत घेऊन बहुमताने सत्ता प्रस्थापित केली. ताराराणी पक्षाचे सर्वोसर्वे आमदार प्रकाश आवाडे यांनी नगरपरिषद निवडणुकीत एकदिलाने भाग घेतला नाही. काठावरुन प्रचार केला आणि ५ उमेदवार निवडून आणले. मनसेच्या दौलतराव पाटलांनी चुरशीच्या निवडणुकीत दोन नगरसेवकपद पटकावले.शिवसेनेच्या अंतर्गत वादाचा फटका बसला आणि दोन नगरसेवक निवडून आले तर अपक्ष दोन नगरसेवकांनी बाजी मारली. आता ही सगळीच मंडळी हातात हात घालून महायुतीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. शिवसेनेत सुजित मिणचेकर आणि मुरलीधर जाधव हा टोकाचा वाद नेहमी धुपत राहिला आणि व्यक्ती केंद्रीत राजकारणामुळे शिवसेनेचे फार मोठे अंतर्गत नुकसान झाले. आता मात्र जाधव शिंदे सेनेत दाखल झाल्यानंतर मिणचेकर गटाला मोकळीक मिळाली आणि उद्धव ठाकरे गटाची आता सत्वपरीक्षा सुरू झाली आहे. महाविकास आघाडी सोबतीला घेऊन विद्यमान आमदार राजूबाबा आवळे, माजी आमदार डॉ.सुजित मिणचेकर, जिल्हा प्रमुख संजय चौगुले, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष व्ही.बी.पाटील, माजी नगरसेवक मदन कारंडे,माजी आमदार अशोकराव जांभळे हे गावागावांमध्ये प्रत्यक्ष भेटून सविस्तर अजेंडा जनतेच्या मनात उतरविण्यासाठी धडपड करीत आहेत.तर स्वाभिमानी शेतकरी संघटना एकला चलो रे चा नारा देत ऊस बिलाचा मुद्दा आणि एफआरपी, शेतमालाला हमीभाव, कर्ज माफी दूध आंदोलन महापूर यांसह शेतकऱ्यांचा प्रश्नांसाठी केलेल्या आंदोलनासह अनेक कामांच्या जोरावर संघटनेचे कार्यकर्ते घर आणि घर पिंजून काढत आहेत.



हुपरी परिसरातील भागात सर्वाधिक मतदान घेण्यासाठी स्थानिक नेत्यांबरोबरच पाठबळ देणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये ईर्षा पहायला मिळते आहे. मतदारांच्या गाठीभेटीनंतर आता थेट जाहीर सभांनी जागा घेतली आहे. २ मे ला शेतकरी संघटनेच्या वतीने राजू शेट्टी यांनी चिटणीस चौकातील जाहीर सभेत हमीभावासह अनेक मुद्यांवर सभा गाजवली तर ३ तारखेला महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्यासाठी नितीन गडकरी यांची सभा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तर महाविकास आघाडीची ४ एप्रिलला सभा घेण्यासाठी हालचाल सुरू केली आहे.

विरोधी पक्षाचा पराभव कसा करायचा यासाठी खलबत्ते केली जात आहेत. यातून राजकीय संघर्षाची बीजे पेरली जात आहेत. हुपरी परिसरातील गावांमध्ये मराठा, जैन समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्या खालोखाल अल्पसंख्याक, दलित आणि धनगर समाजाची मते आहेत. ती पदरात पाडून घेण्यासाठी विविध शक्कल लढवली जात आहे. आरक्षणाचा मुद्दा कळीचा आहे. काही करुन निवडणूक जिंकायची याकरिता साम,दाम, दंड, भेद अवलंबिले जात आहेत. जातीचे राजकारण खेळले जात असले तरी या निवडणुकीत उमेदवार निवडताना मतदारांची सत्वपरीक्षा आहे हे नाकारून चालणार नाही.

## डीकेटीई वायसीपीच्या ३० विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

इचलकरंजी,ता.२–

**येथील डीकेटीई सोसायटीच्या यशवंतराव चव्हाण पॉलिटेक्निकच्या (वायसीपी) कॅम्पसमधून ३० विद्यार्थ्यांची एल. अँड टी. डीफेंन्स लि. पुणे या नामांकित कंपनीत निवड झाली.**



नामांकित कंपनीत निवड झालेले डीकेटीई वायसीपीचे विद्यार्थी.

सदरच्या कॅम्पसमध्ये वायसीपीच्या तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगमधील आशिष गोरड, घनश्याम कुदळे, मोहित रूगे, प्रदीप चव्हाण, राधिका ओझा, ऋतुजा बोरगावे, सलोनी रवंदे, सानिका पोवार, सपना जांगिड, स्नेहा कमदोद, स्वप्नील बागणे, तेजश्री होगाडे, तृप्ती कुंभार, यश शेजापुरे. तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधील संदेश निपासले, शुभम कांबळे, प्रेरणा कांबळे, ओंकार मोरे, संम्मेद पाटील, सुमित खोत, मिथिलेश खेतमर, नेहा शिंगारे, पृथ्वीराज भापकर, प्रज्ञेश शिंगे, आशुतोष गायकवाड यांची वार्षिक २.१० लाख रुपये पॅकेजवर निवड झाली आहे.

यासाठी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, उपाध्यक्ष प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे व सर्व संचालकांचे सहकार्य तर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. ए. पी. कोथळी, उपप्राचार्य प्रा. बी. ए. टारे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर एम. बी. चौगुले, डीकेटीईच्या कार्यकारी संचालिका डॉ. एल. एस. आडमुठे, विभाग प्रमुख व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

## कोल्हापूरात उष्णतेची लाटेने नागरिक हैराण

कोल्हापूर,ता.२(प्रतिनिधी)–

**कोल्हापूरात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेची लाट आली असून उन्हाच्या जबरदस्त तडाख्याने नागरिक हैराण झाले असून तापमानाचा पारा एकेचाळीसपर्यंत पोहोचला असल्याने नागरिकांच्या अंगाची लाही–लाही होत आहे.**

सकाळपासून धरती तापायला सुरुवात होऊ लागली असून दिवसभर उकाड्यामुळे अंगावरुन घामाच्या धारा वाहतात, रस्त्यावर तर एक मिनिटही उभं राहणं उन्हामुळे मुश्किल झाले आहे. तळपत्या उन्हामुळे घरातून दिवसा बाहेर पडणे लोक आता टाळू लागले आहेत. संपूर्ण एप्रिल महिना कोल्हापूरसाठी सर्वाधिक उष्म्याचा ठरला आहे. वाढत्या तापमानाचा पर्यटकांवरही परिणाम झाला असून दिवसभरात तुरळक पर्यटक कोल्हापूरात दिसतात.वाढत्या उन्हामुळे कोल्हापूर शहरातील रस्ते दिवसभर ओस पडले असून सायंकाळीच काहीजण खरेदीसाठी बाहेर पडतात, उन्हापासून संरक्षण करण्यासाठी नागरिक गॉगल, टोपी, रुमाल आणि स्कार्फचा जास्तीतजास्त वापर करीत आहे.



तळपत्या उन्हामुळे नागरिकांमध्ये उष्माघात होण्याची शक्यता अधिक असल्याने आरोग्य यंत्रणा अलर्ट झाली असून जिल्ह्यातील ७६ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४१४ आरोग्य उपकेंद्रे, १६ आयुर्वेदिक दवाखाने तसेच तालुका दवाखान्यात उष्माघाताच्या अनुषंगाने स्वतंत्र नियंत्रण कक्ष कार्यान्वित केला असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राजेश गायकवाड यांनी सांगितले. तसेच ५ फिरती आरोग्य पथके कार्यान्वित केली आहेत.

## देवस्थान समितीस कापडी पिशव्या सुपूर्द

कोल्हापूर,ता.२(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर डाक विभागामार्फत पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीस भक्तांना देण्यासाठी १० हजार कापडी पिशव्या सुपुर्द करण्यात आल्या.**

यावेळी महाराष्ट्र सर्कलचे चीफ पोस्टमास्तर जनरल किशन कुमार शर्मा, गोवा रिजन, पणजीचे पोस्टमास्तर जनरल रामचंद्र जायभाये, जिल्हाधिकारी अमोल येडगे, श्री यादगिरी, मुंबई रिजन यांच्या हस्ते या कापडी पिशव्या प्रदान करण्यात आल्या.

हा कार्यक्रम कोल्हापूर डाक विभागाचे प्रवर अधीक्षक अर्जुन इंगळे, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सहाय्यक सचिव महादेव दिंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

## राधानगरी, भुदरगडमध्ये वोटर स्लिपचे वाटप

गारगोटी,ता.२(प्रतिनिधी)–

**येत्या ७ मे रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा मतदारसंघात मतदान होणार असल्याने त्यादृष्टीने प्रशासनाने सर्व मतदारांना मतदार चिठ्ठ्या घरपोच देण्याचा धडक कार्यक्रम राबविला. राधानगरी,भुदरगड विधानसभा मतदारसंघात सर्व मतदारांना या मतदार चिठ्ठ्या घरपोच देण्यात आल्या.**

पूर्वी राजकीय पक्षाकडून ज्या त्या गावांत मतदारांना मतदार चिठ्ठ्या (वोटर स्लिप) दिल्या जात होत्या,पण गेल्या कांही निवडणुकात निवडणूक आयोगाकडून मतदानाच्या अगोदर या मतदार चिठ्ठ्या दिल्या जात आहेत. त्यामुळे राजकीय पक्षांचे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे काम कमी झाले आहे.

या मतदार चिठ्ठीत मतदारांचा यादी भाग क्रमांक, मतदारांचा अनुक्रमांक, मतदान केंद्राचा पत्ता, मतदान केंद्राचा नकाशा,देण्यात आला आहे, त्यातूनही काही अडचण आल्यास त्या मतदार चिठ्ठीत मतदान केंद्रांच्या केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचा मोबाईल क्रमांक देण्यात आला आहे. मतदारांना मतदान केंद्र शोधणे, मतदार क्रमांक शोधणे या अडचणी निर्माण होतात. ग्रामीण भागात या अडचणी उदभवत नाहीत,पण शहरी भागात मतदान करताना या अडचणी उद्भवतात, यासाठी मतदारांना सोईस्कर मतदान करता यावे यासाठी निवडणूक आयोगाकडून काळजी घेण्यात आली आहे. या मतदार चिठ्ठ्या देण्यासाठी राधानगरी तालुक्यातील २०५ भुदरगड तालुक्यातील १७२ व आजरा तालुक्यातील ४८ केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून या मतदार चिठ्ठ्या घरपोच करण्यात आल्या.



भुदरगड तालुक्यात महिला मतदारांना मतदार चिठ्ठ्या (वोटर स्लिप) देताना अधिकारी.

आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी
वसंत व्याख्यानमाला वर्ष ५२ वे




पुष्प दुसरे– शुक्रवार दि. ३ मे २०२४
वक्ते–मा.श्री. संदेश भंडारे (पुणे)
(जागतिक किर्तीचे फोटोग्राफर, जर्नालिस्ट आणि लेखक)
विषय – तमाशा आणि वारी
(तमशाचे प्रारूप आणि वारीची अनुभूती देणारा स्लाईडशो व अनुभव कथन)
स्थळ – डी.के.टी.ई. पटांगण, राजवाडा चौक, इचलकरंजी
वेळ – सायंकाळी ७.०० वाजता

श्रीहरी
शुक्रवार, ता.३/०५/२४ पासून
रोज १ वा.
मस्त रोमॅन्टीक हिंदी चित्र
स्कूल गर्ल
४ व ७ वा.
प्रौढांसाठी
A फ्रेंडस् पार्टी A

श्रीदत्त
शुक्रवार, ता.३ पासून
रोज ४ खेळ - १ * ४ * ७ व १० वा.
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
स्लीवर टूब (भाग २)
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

भाग्यरेखा DOLBY DIGITAL
लेझर प्रोजेक्टर
QUBE CINEMA NETWORK DIGITAL The Power of Cinema. Delivered.
शुक्रवार दि. ३ पासून
रोज ३ खेळ १२,३,६ वा.
या म्हाताऱ्याला अडवून दाखवा !



जुनं फर्निचर (मराठी)
रोज १ खेळ ९ वा.
भागयरेखा मधे पून्हा महिलांचा घुमनार नाच ग घुमा




नाच ग घुमा (मराठी)

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 अत्याधुनिक 2K प्रोजेक्टर
बुधवार ता. १ पासून रोज ४ खेळ
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ३ खेळ १२,३ व ९ वा.
बाईपण भारीनंतर महिलांसाठी आणखी एक जबरदस्त चित्रपट



नाच ग घुमा (मराठी)
रोज १ खेळ *६ वा.
नटसम्राट नंतर आणखी एक जबरदस्त चित्रपट




जुनं फर्निचर (मराठी)

गुरु
बुधवार ता. १ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
१२.३० व ३.३० वा.



नाच ग घुमा (मराठी)
प्रत्येक स्त्रीने पाहिलाच पाहिजे असा अप्रतिम चित्रपट
६.३० व ९.३० वा.



जुनं फर्निचर (मराठी)

RK CINEMAS 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण 3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
Real 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
74474 40070 bookmyshow



द फॉल गाय 11.00AM, 01.30PM, 04.15PM,10.30PM
स्वरगंधर्व सुधिर फडके 06.45PM
जुनं फर्निचर 12.30PM, 3.30PM, 7.00PM, 9.45PM
नाच ग घुमा 10.30 AM, 01.00 PM, 04.00 PM, 07.15 PM, 10.00 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह खासकरुन पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच.

फॉर्च्युन सिनेप्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortunecineplex.in
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11



नाच गं घुमा (U)(MAR) 11.00am, 02.00, 04.45, 07.30, 10.15pm
जुनं फर्निचर (U)(MAR) 12.15, 01.45, 04.30, 07.45, 10.30pm
मैदान (U/A)(HIN) 03.30, 10.00pm
स्वरगंधर्व सुधीर फडके (U)(MAR) 06.45pm
आज पहा कोणताही मॉर्निंग शो फक्त ८० रु. मध्ये

# काँग्रेस सत्तेत आल्यास हिंदूमध्ये भांडणे लावली जातील

## उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ; सांगलीत संजय पाटील यांच्या प्रचारार्थ सभा

सांगली,ता.२(प्रतिनिधी)-

**काँग्रेस सत्तेत आल्यास देशातील हिंदूंची जाती-जातीत विभागणी करून त्यांची आपसात भांडणे लावली जातील. हिंदूंमध्ये फूट पाडून गुपचूप ओबीसींच्या हक्काच्या आरक्षणाचा लाभ मुस्लिमांना द्यायचा आहे, असा दावा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केला**

भाजपा महायुतीचे उमेदवार खासदार संजय पाटील यांच्या प्रचारार्थ बुधवारी सांगलीत चिंतामणराव वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा पार पडली. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री सुरेश खाडे, मंत्री गुलाबराव पाटील, उमेदवार आणि खासदार संजय पाटील, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार गोपीचंद पडळकर आदी उपस्थित होते.



सांगली येथील प्रचार सभेत हात उंचावताना योगी आदित्यनाथ, चंद्रशेखर बावनकुळे, संजय पाटील व इतर प्रमुख मान्यवर.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, काँग्रेस जाहीरनाम्यात अल्पसंख्यांना त्यांच्या आवडीनुसार आहार घेण्याचे स्वातंत्र्य देणार आहे. या निवडणुकीत काँग्रेस शक्य तेवढे खोटे बोलत आहे. कारण काँग्रेस लवकरच इतिहासजमा होणार आहे. उत्तरप्रदेशमध्ये हे निवडणूक लढण्याचे सुद्धा धाडस करीत नाहीत. आता अंतिम उपाय म्हणून जातीय जनगणनेच्या नावाखाली तुमची दिशाभूल करून हिंदूंमध्ये फूट पाडत असल्याचे सांगून योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही बदलता भारत बघितला आहे. २०१४ पूर्वीचा भारत आणि त्यानंतरचा भारत यात आपल्याला फरक दिसतो, जगात सन्मान मिळत नव्हता, दहशतवाद, नक्षलवादाने देशात दहशत होती.शेतकरी आत्महत्या करत होते. ज्यांच्याकडे भ्रष्टाचार थांबवण्याची जबाबदारी होती तेच भ्रष्टाचारी होते. आता २०१४ नंतर मात्र मोदींच्या नेतृत्वाखाली जगात देशाचा सन्मान वाढला आहे. नक्षलवाद, दहशतवाद संपला आहे. देशाच्या सीमा सुरक्षित आहेत.आत्मसन्मान, सुरक्षा, विकास आणि गरीब कल्याण ही मोदींची गॅरंटी आहे. तसेच आत्मनिर्भर, विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा विजयी करायचे आहे. त्यासाठी संजय पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

संजय पाटील म्हणाले, सन २०१४ साली मला संधी मिळताच जिल्ह्याच्या दुष्काळी भागातील सिंचन योजना पूर्ण करण्याची संधी मिळाली. पाच राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे दुहेरीकरण केले. विरोधक दुष्काळात माणसे होरपळत असताना कुठे होते.जनतेच्या पाण्यासाठी त्यांनी कधीच तोंड उघडले नाही. मात्र आता आमच्यावर टीका करत आहेत. ही निवडणूक देशाच्या विकासाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारत जगात महासत्ता होत आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी भाजपला मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सांगलीत प्रथमच सभा झाली. या सभेला मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

# मोदींकडून जुगार उद्योगांना प्रोत्साहन

## आम.पृथ्वीराज चव्हाण यांची घणाघाती टीका

कराड,ता.२(प्रतिनिधी)-



**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या मिळतील, अशा घोषणा केल्या; पण गेल्या १० वर्षांत कोणतीच नोकरभरती झाली नाही. उलट युवकांना जुगाराच्या सवयी लावण्यासाठी बेधडकपणे जुगाराच्या जाहिराती सुरू आहेत. कारण जुगार कंपन्यांकडून भारतीय जनता पक्षाला इलेक्ट्रॉल बॉण्डद्वारे १४०० कोटींची देणगी दिली गेली, असा चंदा दो, धंदा लोचा उद्योग करत नरेंद्र मोदींनी जुगार उद्योगांना प्रोत्साहन दिल्याचा घणाघात माजी मुख्यमंत्री आम. पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.**

उंब्रज (ता.कराड) येथे महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ ते बोलत होते. यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड.उदयसिंह पाटील-उंडाळकर, युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष शिवराज मोरे, जिल्हाध्यक्ष डॉ.सुरेश जाधव, कराड उत्तरचे अध्यक्ष निवासराव थोरात, माजी सभापती एम.जी.थोरात, मारूती जाधव, मोहनराव माने, वसंतराव जगदाळे, नंदकुमार जगदाळे, संपतराव इंगवले, वसंत पाटील, इंद्रजित जाधव, सुरेश पाटील, मधुकर जाधव, अनिल मोहिते, उमेश मोहिते, संग्राम पवार, अमित जाधव, प्रवीण वेताळ, दत्ता काशीद, भीमराव डांगे, उमेश साळुंखे, संजय घाडगे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आ.चव्हाण पुढे म्हणाले, काँग्रेस जाहिरनाम्यात कायमच प्रयत्नशील राहिली आहे. त्यानुसार कायम अंमलबजावणीही केली आहे. काँग्रेसने ७० वर्षात काय विकास केला, हे सांगण्याची गरज नाही. देशातील जनताच उदाहरणाने तुम्हाला सांगत आहे; पण मोदींनी दहा वर्षात काय विकास केला? हे सांगता येत नसल्यानेच धार्मिक तेढ निर्माण करण्याची भाषा, काँग्रेसच्या जाहिरनाम्याबाबत दिशाभूल करणारी वक्तव्ये ते करत आहेत. अनेक उद्योगपतींचे उद्योग काढून फक्त अदानीला दिले जात आहेत. त्यामुळे बाहेरील उद्योग भारतात येत नाहीत. आपला देश हुकूमशाहीकडे निघाला आहे. १५ लाख रूपये खात्यावर येतील, हा जुमला होता. हे अमित शहांनी मान्य केले, तसेच १०० दिवसांत परदेशातील काळा पैसा परत येईल, अशी घोषणा केली होती; पण काळा पैसा, तर आणला नाहीच, उलट काळ्या पैसेवाल्यांना तुम्ही पाठीशी घातले. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करतो म्हणाले; पण त्यांच्या उत्पन्नावर कर लावला, ही वस्तुस्थिती आहे. महागाई कमी करणार होते; पण केली दुप्पट. रूपयांचे मूल्यांकन वाढविणार असताना ते आणखी कमी केले. पेट्रोल, डिझेल दरावरून दिशाभूल केली. आज कच्च्या तेलांचे दर कमी असूनही पेट्रोल, डिझेलचे दर शंभराच्या पारच आहेत.

# शशिकांत शिंदे यांना मताधिक्याने विजयी करा

## आम.बाळासाहेब पाटील

कराड,ता.२(प्रतिनिधी)-

**सातारा लोकसभा मतदार संघातील जनतेचा आम.शशिकांत शिंदे यांना चांगला प्रतिसाद मिळत असून, ते जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नांना न्याय देतील.आपल्या सुख दुःखामध्ये सहभागी होतील, तसेच विकास निधीचे वाटप सर्व गावांना समान न्यायाने करतील, असा विश्वास व्यक्त करून, या निवडणुकीत आ.शशिकांत शिंदे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा,असे आवाहन आम. बाळासाहेब पाटील यांनी केले.**

आम.शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ खटाव तालुक्यातील म्हासूर्णे,शेनवडी,होळीचागाव, भूषणगड आदी गावांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कोपरा सभेप्रसंगी ते बोलत होते.यावेळी सातारा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.भाग्यश्री भाग्यवंत, माजी सदस्य जितेंद्र पवार, सी.एम.पाटील, कारखान्याचे संचालक संतोष घार्गे यांची प्रमुख उपस्थिती होती.



होळीचागाव येथे कोपरा सभेत मार्गदर्शन करताना आम.बाळासाहेब पाटील,समवेत भाग्यश्री भाग्यवंत,जितेंद्र पवार,सुरेश पाटील आदी.

आ.बाळासाहेब पाटील पुढे म्हणाले, शरदचंद्र पवार यांनी शेतकरी, कष्टकरी, कामगार, उद्योजक आदींसाठी विविध निर्णय घेऊन सामान्यांना न्याय देण्याचा विशेष प्रयत्न केला.देशाच्या जडणघडणीमध्ये काँग्रेस विचारसरणीतून देशभर वीज प्रकल्प, विविध ठिकाणी धरणे, सूतगिरण्या विविध प्रक्रिया उद्योग उभे राहिले. मात्र सध्याचे सरकार गेल्या दहा वर्षातच हे सर्व झाले असल्याचे भासवत आहेत. येत्या निवडणुकीत इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांना बहुमतांनी विजयी करा, असे आवाहन आ.बाळासाहेब पाटील यांनी होळीचागाव येथील कोपरा सभेत केले.

याप्रसंगी भाग्यश्री भाग्यवंत, जितेंद्र पवार, भाऊसाहेब लादे यांनी आमदार शशिकांत शिंदे यांना बहुमतांनी विजयी करण्याचा निर्धार केला. या कोपरा सभेस सुरेश पाटील, दत्तात्रय रुद्रुके,सुरेश सूर्यवंशी,सरपंच सौ. वंदना शिंदे, उपसरपंच सौ. स्नेहल साठे, भाऊसाहेब लादे, सुरेश शिंदे, पांडुरंग शिंदे,संजय शिंदे,दुर्योधन शिंदे, रघुनाथ खाडे, प्रकाश खाडे, वसंत मोहिते, संजय शिंदे, उत्तम देशमुख, परशुराम पवार,पांडुरंग सावंत, दिलीप होवाळे, रामचंद्र देशमुख तसेच पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पाणी योजना पूर्णत्वास नेल्याने जनता आमच्यासोबत

## संजय पाटील; आटपाडी तालुक्यात प्रचार दौऱ्याला प्रतिसाद

आटपाडी,ता.२(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्ह्यातील दुष्काळ कायमचा हटवण्यासाठी भारतीय जनता पार्टीने टेंभू ताकारी आणि म्हैसाळ या योजना पूर्णत्वास नेल्या आहेत, त्यामुळे जनता आमच्या पाठीशी आहे, असा विश्वास सांगली लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खासदार संजयकाका पाटील यांनी व्यक्त केला.**

लोकसभा निवडणूक प्रचारार्थ आटपाडी तालुक्यात प्रचार दौरा करण्यात आला. यादरम्यान झरे येथील सभेत ते बोलत होते. संजयकाका पाटील यांच्या प्रचारार्थ नेलकरंजी, करगणी, खरसुंडी, शेटफळे, निंबवडे, राजेवाडी, दिघंची, झरे येथे नागरिक, कार्यकर्त्यांशी संवाद साधत मार्गदर्शन करण्यात आले.



संजय पाटील यांच्या प्रचार सभेप्रसंगी उपस्थित मान्यवर.

यावेळी पालकमंत्री सुरेश खाडे, आमदार गोपीचंद पडळकर, माजी आमदार राजेंद्र देशमुख, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुहास बाबर, हर्षवर्धन देशमुख, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष विनायक मासाळ, राजेंद्र खरात, लक्ष्मण सरगर, अरूण बालटे, प्रमोद शेंडगे याच्यासह भाजप, शिवसेना, आरपीआय, रासपचे पदाधिकारी, कार्यकर्ते दौऱ्यात सहभागी झाले होते.

संजयकाका पाटील म्हणाले, ज्यांच्या घरात १२ वेळा खासदारकी होती त्यांनी सांगली जिल्ह्यासाठी काय केलं हे त्यांना सांगता येत नाही. सत्तेत असतानाही आटपाडी, जत, खानापुर, कवठेमहांकाळ, तासगाव या तालुक्यांचा दुष्काळाचा प्रश्न ते सोडवू शकले नाहीत. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही हजारो कोटींच्या टेंभू, ताकारी आणि म्हैसाळ या योजना पूर्णत्वास नेल्या. आज दुष्काळी तालुक्यामध्ये सगळीकडे पाणी आले आहे. शेतकऱ्यांची शिवार हिरवीगार झाली आहेत. हरितक्रांती झाली आहे. येणाऱ्या काळात राहिलेल्या वंचित सर्व गावांमध्ये या सर्व योजनांचे पाणी नेले जाईल. कोणतेही गाव पाण्यापासून वंचित राहणार नाही. यासाठी आम्ही जिवाचे रान करू. दुष्काळाचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी आपण सर्वांनी भारतीय जनता पार्टीला साथ द्यावी, असे आवाहन संजयकाका पाटील यांनी केले.




महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त ध्वजाला मानवंदना देताना ग्रामपंचायतीचे पदाधिकारी,कर्मचारी व ग्रामस्थ.

# महाराष्ट्र,कामगार दिन चंदुर येथे उत्साहात साजरा

चंदुर,ता.२(वार्ताहर)-

**चंदुर (ता.हातकणंगले) येथे विविध ठिकाणी महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालयामध्ये ध्वजपूजन महिला सफाई कर्मचारी फुलाबाई करडे व सर्व महिला सफाई कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आले. तर ध्वजारोहण पाणीपुरवठा कर्मचारी गजानन मांगलेकर यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती महेश पाटील ,सरपंच स्नेहल कांबळे उपसरपंच ललिता पुजारी, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी बी.व्ही कांबळे,सर्व कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कुमार व कन्या विद्या मंदिरमध्ये ध्वजारोहण मुख्याध्यापक नारायण नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. तर दि न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ध्वजारोहण मुख्याध्यापक गोपाल साठे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सर्व शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# मतदानाचा हक्क बजावून लोकशाही मजबूत करा

## मंत्री शंभूराज देसाई

सातारा,ता.२(प्रतिनिधी)-

**भारताची लोकशाही जगात मोठी व बळकट आहे. मतदानाचा पवित्र हक्क बजावून आपण सर्वांनी लोकशाही मजबूत करूया, असे आवाहन पालकमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी केले. सातारा येथील श्रीमंत छत्रपती शाहू महाराज क्रीडा संकुल येथे महाराष्ट्र दिनाचा मुख्य शासकीय सोहळा संपन्न झाला. त्यावेळी मंत्री श्री. देसाई बोलत होते.**



यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डूड्डी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशीनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, उपवन संरक्षक आदिती भारद्वाज, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, श्रीमती विजयादेवी देसाई, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

पालकमंत्री श्री देसाई म्हणाले, आतापर्यंतच्या वाटचालीत महाराष्ट्राने समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली आहे. कृषी, उद्योग, व्यापार, सहकार, शिक्षण, संशोधन, साहित्य, नाटक, चित्रपट, कला, संस्कृती अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. देशातीलच नव्हे तर जगातील प्रगतशील आणि पुरोगामी राज्य म्हणून आज महाराष्ट्राचा लौकिक आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचा हा लौकिक निर्माण करण्यात, देश-विदेशात आणि समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मराठी सुपुत्रांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. राज्याने आज अनेक क्षेत्रामध्ये प्रगती केली आहे.

उद्योग, व्यवसाय, सेवा यासह आयटी, ऊर्जा निर्मिती अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्र देशात अव्वल स्थानावर आहे. राज्याचा हा प्रगतीचा आलेख असाच उंचावत राहण्यासाठी आपण सर्व नेहमीच प्रयत्नशील राहुया, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# धैर्यशील माने यांना निवडून द्या

## आम.विनय कोरे; चरण येथे प्रचार सभा

बांबवडे,ता.२(प्रतिनिधी)-

**शाहुवाडी तालुक्याच्या विकासासाठी पुन्हा एकदा खासदार धैर्यशील माने यांना निवडून देण्याचे आवाहन आमदार विनय कोरे यांनी केले. चरण (ता.शाहूवाडी) येथे झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.**

पुढे बोलताना आ. कोरे म्हणाले, सर्वात जास्त निधी हा खासदार माने यांनी शाहूवाडी तालुक्यासाठी खेचून आणला असून तालुक्यात एमआयडीसी उभारण्यासाठी देखील मंजुरी मिळवली आहे. त्यामुळे खासदार हा आपली कामे करणाराच असावा आणि यासाठी खा. धैर्यशील माने यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. शाहूवाडी तालुक्यातील खुटाळवाडी,भाडळे,सुपात्रे, हणमंतवाडी, वरेवाडी, कुंभारवाडी,




चरण (ता.शाहूवाडी) येथे धैर्यशील माने यांच्या प्रचार सभेत बोलताना आ. विनय कोरे व व्यासपीठावर इतर मान्यवर.

खोतवाडी, पिशवी, केळेवाडी, गमेवाडी, सावर्डे, पेढेवाडी, म्हांडलाईवाडी, तळपवाडी, शित्तूर, गुजरवाडी, सोनवडे,साळशी, गोगवे, बजागवाडी, बहिरेवाडी, ससेगाव, मोळावडे, कोपर्डे, सावे, सावर्डे खुर्द शिंपे, सवते,पाटणे, वाडीचरण, डोनोली, चरण, सैदापूर, थेरगाव या गावांचा दौरा यावेळी करण्यात आला. यावेळी गोकुळचे संचालक करणसिंह गायकवाड, माजी बांधकाम समिती सभापती सर्जेराव पाटील, माजी जि. प सदस्य बाबा लाड, विजयसिंह देसाई, पांडुरंग वग्रे, महादेव पाटील, विष्णू पाटील, विष्णू यादव, शंकर बारगीर, पंडित नलवडे, काळू पाटील, सुरेश नारकर, स्वप्निल घोडे पाटील, पांडा निकम, शिवाजी चौगुले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाचट कुट्टी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला

मसूर,ता.२(प्रतिनिधी)-

**ऊस उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या भरमसाठ रासायनिक खतांच्या वापरामुळे दिवसेंदिवस जमिनीचा पोत कमी होत चालला आहे. जमिनी नापीक बनत चालल्या आहेत. त्यावर उपाय म्हणून अनेक शेतकऱ्यांनी पाचट कुट्टी करण्याकडे कल वाढवला आहे.**

सध्या ऊसतोडणी हंगाम संपला आहे. ऊसाचे फड रिकामे झाले की, शेतकरी शक्यतो पाचट हे पेटवून खोडवा ऊसाची तयारी करतो. मात्र, हीच पाचट जमिनीत कुजवली तर जमिनीचे आरोग्य सुधारते. सेंद्रिय कर्ब वाढून उत्पादनात देखील वाढ होते. एवढेच नाही तर पाचट कुजवल्याने पर्यावरणाचे संवर्धन होणार आहे. यासाठीच अलीकडे अनेक शेतकऱ्यांनी उसाची पाचट न जाळता कुट्टी केली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यापासून उसाच्या उत्पादनातही वाढ होणार आहे.शेतजमिनीमध्ये पाला पाचोळा कुजवणे,शेणखत किंवा कंपोस्ट खताचा वापर केल्यास जमिन सुपिकता तर वाढणार आहेच शिवाय उत्पादनातही वाढ होत आहे.

# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विशेष पथके स्थापन करावी

## जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश

सातारा,ता.२(प्रतिनिधी)-

**मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली आहे. मतदानाचा दिवशी प्रत्येक कुटुंबातील पात्र नागरिक मतदान करतील यासाठी शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे पथक तयार करुन ५० ते ६० कुटुंबाच्या मागे शासकीय प्रतिनिधी नियुक्त करावा. या प्रतिनिधींनी मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी जबाबदारी दिलेल्या प्रत्येक कुटुंबाला भेट देवून त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात लोकसभा निवडणूक तयारी विषयी आढावा बैठक घेण्यात आली.



जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना देताना जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी

यावेळी ते बोलत होते.या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले,उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे यांच्यासह सर्व सहायक निवडणूक अधिकारी यांच्यासह नोडल अधिकारी, नगर परिषदांचे मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी उपस्थित होते.

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आवश्यक ते सर्व जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात आले आहे तथापी यापुढे जावून या टप्प्यात वैविध्यपूर्ण उपक्रम राबविणे आवश्यक आहेत, असे सांगून श्री. डुडी म्हणाले, ग्रामीण भागात लोकांना मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे पथक तयार करावे या पथकात ग्रामीण भागात काम करणाऱ्या तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका आदींचा समावेश असावा तसेच शहरी भागात नगर परिषदेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग राहील. ही पथके मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी सकाळी ७, दुपारी १२ ते १ व सायं. ४ वाजता घरोघरी जावून प्रत्येक कुटुंबाला भेट देतील व पात्र नागरिकांनी मतदान करावे यासाठी त्यांना प्रोत्साहित करतील.

या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नागराजन म्हणाल्या, प्रत्येक मतदान केंद्रावर सोयी सुविधा देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यातील दोन मतदान केंद्रे थीमवर तयार करण्यात येणार आहे. यामध्ये जय जवान जय किसान, कृषी, महिलांसाठी,युवकांसाठी, दिव्यांगासाठी विशेष मतदान केंद्रे तयार करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागात नागरिकांना मतदान करण्याविषयी प्रोत्साहित करण्यात येत आहे, असेही त्यांनी बैठकीत सांगितले.

# पानेरी येथे नागरिकांची आरोग्य तपासणी

ढेबेवाडी,ता.२(प्रतिनिधी)-

**पाटण तालुक्यातील डोंगरदऱ्यात वसलेल्या दुर्गम पानेरी (वाल्मिकी खोऱ्यात) शिवसमर्थ परिवाराच्या शिवआरोग्य सेवा हॉस्पिटल तळमावलेच्यावतीने ब्लड प्रेशर, ईसीजी,ओपीडी, रक्ताच्या इतर तपासण्या, डोळे तपासणे, हाडांची तपासणी अशा अनेक प्रकारच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली व उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.**

अतिदुर्गम भागामध्ये आरोग्याच्या सुविधा भेटत नाहीत तसेच येथील नागरिकांचे त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यासाठी शिवसमर्थ परिवाराचे संस्थापक अध्यक्ष ॲड.जनार्दन बोत्रे यांच्या संकल्पनेतून असे सामाजिक उपक्रम राबविले जातात. यावेळी कौन्सिलर प्रणिता जाधव, दिपाली कचरे, छाया भिंगारदेवे व शिव आरोग्यचे कर्मचारी उपस्थित होते.



शुक्रवार, ता. ३ मे २०२४

वर्धापन दिन विशेषांक




# धैर्यशील माने यांना मताधिक्याने निवडून आणूया

**हिंदुराव शेळके**
इचलकरंजी,ता.२–

**देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी व मोदींचे हात बळकट करण्यासाठी हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार धैर्यशील माने यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणूया असे आवाहन भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष हिंदुराव शेळके यांनी केले.**

धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यकर्ता व महिला मेळाव्यात ते बोलत होते.

हिंदुराव शेळके यांच्या इचलकरंजी येथील निवासस्थानी हा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यासाठी माजी आमदार सुरेशराव हाळवणकर, अरुण इंगवले, अमृता भोसले, अश्विनी कुबुडगे, संजय गांधी निराधार कमिटीचे तमन्ना कोटगी, संतोष शेळके माजी नगरसेविका आक्काताई कोडगी, मोहन कुंभार ,प्रकाश पाटील ,अतुल शेळके ,विवेक शेळके, पूर्णानंद सव्वाशे, संतोष कोटगी, उमाकांत दाभोळे , बसवराज मंदेवाली, अरविंद कापसे महिला पदाधिकारी शोभाताई पाटील तसेच असंख्य महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ हिंदूराव शेळके यांच्या निवासस्थानी झालेल्या मेळाव्यात अभिवादन करताना महायुतीचे नेते व पदाधिकारी.



राष्ट्रवादीचे नेते शरद पवार,जयंत पाटील यांनी इचलकरंजी येथे माजी आम.अशोकराव जांभळे यांच्या निवासस्थानी भेट दिली.त्यावेळी नितीन जांभळे यांच्या निधनाबद्दल सांत्वन व्यक्त केले.यावेळी अशोकराव जांभळे, सौ.कलावती जांभळे,सुहास जांभळे,अमोल जांभळे,प्रविण खाडे,जयदीप जांभळे आदि मान्यवर.(छाया –अनंतसिंग)

# खास. धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ अभिनेता गोविंदा यांची जयसिंगपुरात रॅली

जयसिंगपूर,ता. २ (प्रतिनिधी)–

**हातकणंगले लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार खास . धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ मंगळवारी सायंकाळी सिने अभिनेते माजी खास . गोविंदा, शिवसेनेच्या नेत्या शितल म्हात्रे यांनी जयसिंगपूर शहरातून रॅली काढली. यावेळी रॅलीत उमेदवार खास .धैर्यशील माने, माजी नगराध्यक्ष संजय पाटील (यड्रावकर ) सहभागी झाले होते. रॅलीला शहरवासीयां कडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला . तुमच्या आमच्या कामाचा आणि हक्काचा खासदार म्हणून महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांना मोठया मताधिक्क्याने विजयी करण्याचे आवाहन यावेळी गोविंदा यांनी केले .**

प्रारंभी सिनेअभिनेते गोविंदा यांनी आम . राजेंद्र पाटील (यड्रावकर ) यांच्या निवासस्थानी भेट दिली. आम. यड्रावकर यांनी अभिनेते गोविंदा यांचा सत्कार केला. तर सौ. त्रिशला संजय पाटील (यड्रावकर) यांनी शिवसेना नेत्या शितल म्हात्रे यांचा सत्कार केला. त्यानंतर रॅलीस सुरुवात झाली. स्टेशन रोडने रॅली चौथ्या गल्लीत आली. ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिरात अभिनेते गोविंदा यांनी दर्शन घेतले. यानंतर रॅली पहिल्या गल्लीतून स्टेशन रोडने गांधी चौक मार्गे मध्यवर्ती क्रांती चौकात आली. याठिकाणी अभिनेते गोविंदा यांनी श्रीमंत जयसिंग महाराज व राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यानंतर रॅली तेरावी गल्ली, जुनी भाजी मंडई, नगरपालिका रोडने राजीव गांधीनगरमध्ये आली. यानंतर रॅलीची सांगता झाली. रॅलीत शरद साखर कारखान्याचे संचालक आदित्य पाटील (यड्रावकर ), राहुल पाटील, माजी नगराध्यक्ष संभाजी मोरे, दादासो पाटील (चिंचवाडकर ), प्रकाश लड्ठे, माजी नगरसेवक राहुल बंडगर, महेश कलकुटगी, अभिजीत भांदिगरे, प्रविण इंगळे यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.




धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ रॅलीमध्ये अभिवादन करत असताना अभिनेता गोविंदा, धैर्यशील माने, संजय पाटील यड्रावकर उपस्थित जनसमुदाय

# शाश्वत विकासाच्या गॅरंटीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्या

## राजे समरजिसिंह घाटगे

गडहिंग्लज,ता.२ (प्रतिनिधी)–

**शेतकरी,युवक,महिलांसह सर्वसामान्यांच्या शाश्वत विकासाच्या गॅरंटीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्या. असे आवाहन शाहू ग्रुपचे अध्यक्ष व भाजपाचे नेते राजे समरजिसिंह घाटगे यांनी केले.**

महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ भादवण, भादवणवाडी,जाधेवाडी,हेन्याळी,हालेवाडी, खोराटवाडी,मासेवाडी (ता.आजरा) येथे भाजपच्या बूथ प्रमुख व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.यावेळी ते बोलत होते.

श्री.घाटगे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने तसेच राज्य सरकारने विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या.त्यांनी महिलांच्या हाताला काम देण्यासह त्यांचा आत्मसन्मान वाढवणारे निर्णय घेतले. तरुणांना नोकऱ्यांसह उद्योग व्यवसायासाठी प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजना यशस्वीपणे राबवल्या तर शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याचे धोरण राबविले.हमीभावासह पीएम किसान सन्मान निधीसारख्या अनेक योजना राबविल्या.

यावेळी शैलेश मुळीक,रोहन बारादेसकर,टी.बी.मुळीक ,सखाराम डोंगरे,संभाजी हाळवणकर ,दत्तात्रय डोंगरे,(भादवण)उद्योजक शरद पाटील,गोविंद बिरांबोळे,महादेव खाडे,विनायक पाटीला(होन्याळी ),राजाराम पाटील,गणपती चौगुले, दिलीप फाळणेकर (भादवणवाडी),सुरेश परीट नामदेव खोत, एकनाथ पाटील, तानाजी सावंत, सदाशिव सुतार (मासेवाडी),दत्तात्रय सावंत ,(जाधेवाडी),अनिल खोराटे, यशवंत खोराटे,दीपक देसाई राजाराम आजगेकर बंडोपंत खोराटे (खोराटेवाडी)आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# राम नाईक यांची आवाडे यांच्या निवासस्थानी भेट

इचलकरंजी,ता.२ –

**उत्तरप्रदेशचे माजी राज्यपाल, माजी मंत्री तथा माजी खासदार राम नाईक यांनी बुधवारी माजी खास. कल्लाप्पाण्णा आवाडे आणि आमदार प्रकाश आवाडे यांची निवासस्थानी भेट घेतली.**

उत्तरप्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक हे बुधवारी इचलकरंजीत आले होते. यावेळी त्यांनी माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांची विशेष करुन भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करत विविध विषयांवर चर्चाही केली. यावेळी राम नाईक यांना देशातील सर्वोच्च पद्मविभुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उत्तम आवाडे, डॉ. राहुल आवाडे, स्वप्निल आवाडे, सौ. किशोरी आवाडे, सौ. सपना आवाडे, सौ. वैशाली आवाडे, सौ. मौश्मी आवाडे, द्राक्षायणी पाटील, रोहित आवाडे, आदित्य आवाडे, दिया आवाडे, अॅड. स्वानंद कुलकर्णी व मान्यवर उपस्थित होते.



उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक यांनी माजी खास. कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या निवासस्थानी भेट दिली.





Hotel Alankar
Karad

- ए.सी., नॉन ए.सी. व सूट रूम्स
- फॅमिली व्हेज, नॉन-व्हेज रेस्टॉरंट
- ब्रेकफास्ट रेस्टॉरंट
- आर्य प्युअर व्हेज थाळी
- बार रेस्टॉरंट
- ए.सी. कॉन्फरन्स हॉल
- बँक्वेट हॉल
- कुंजन मल्टीपर्पज हॉल
- अलंकार स्वीट्स
- अलंकार लिकर्स
- डी.एस. वाईन्स

कराड बस स्टॅन्ड समोर
(०२१६४) २३००११/१२/१३/१४
९१७२०४८३९८/९९

Scan QR Code For Menu

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !




किशोर पोतदार | दत्तात्रय कांबळे | नवनाथ डवरी

सभासद संख्या - ३३१५ * भागभांडवल-१ कोटी ९३ लाख ९४ हजार
ठेवी १०० कोटी ४२ लाख * कर्जे - ६८ कोटी २८ लाख
ऑडीट वर्ग- सन २०२२-२३ अ वर्ग * नफा- २ कोटी ५२ लाख ७१ हजार
खेळते भांडवल - १५६ कोटी ३४ लाख * वार्षिक उलाढाल- ४८० कोटी ५४ लाख
* सी.डी. रेशा- ६१.४१ * स्वनिधी- ४ कोटी ९६ लाख
* राखीव निधी- ३ कोटी ५४ लाख
सोने तारण कर्ज- ४१ कोटी ९६ लाख ९४ हजार * गुंतवणूक ४६ कोटी ६६ लाख

सामाजिक बांधिलकी - कोरोनात गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप अंध-अपंग, मुकबधीर मुलांना गणवेश वाटप * दरवर्षी पांजरपोळ जनावरांना चारा वाटप * दर मंगळवारी मोफत नेत्र तपसाणी व अल्पदरात ऑपरेशन संस्थेचा सन्मान * आंतरराज्य आदर्श संस्था पुरस्कार

किशोर वि. पोतदार (सभापती) | दत्तात्रय गुं.कांबळे (उपसभापती) | नवनाथ बा. डवरी (मॅनेजर)

संचालक - जवाहर शहा, दत्तात्रय तांबट, रविंद्र खराडे,पुंडलिक डाफळे, अनंत फर्नांडीस, चंद्रकांत माळवदे, सौ. सुजाता सुतार, सौ. सुनिता शिंदे, रविंद्र सनगर, विनय पोतदार, जगदीश देशपांडे, श्रीमती भारती कामत

श्री लक्ष्मी नारायण नागरी सहकारी पतसंस्था मुरगूड, ता. कागल

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !





सुखदेव येरूडकर | मारूती पाटील | राहुल शिंदे

- वसुल भाग भांडवल-४२ लाख ७० हजार
- राखीव व इतर निधी- ९ कोटी ६२ लाख
- ठेवी ११६ कोटी ५३ लाख * कर्जे - ८६ कोटी ३६ लाख
- गुंतवणूक - ४३ कोटी ५७ लाख पैकी सोने तारण कर्ज- ३० कोटी ७६ लाख व खेळते भागभांडवल - १३४ कोटी ४४ लाख
- नफा- २ कोटी ५० लाख व एकूण व्यवहार -११२९ कोटी १३ लाख
- डिव्हीडंड- १५ % • थकबाकी- ००.५८ %
- ऑडिट वर्ग - 'अ' मार्च २०२३
- संगणकीकृत सेवा, स्वमालकीची इमारत, लॉकर्सची सुविधा आकर्षक ठेव योजना

सुखदेव येरूडकर (चेअरमन) | मारूती पाटील (व्हा. चेअरमन) | राहुल शिंदे (कार्यकारी संचालक)

संचालक- उदयकुमार शहा, एकनाथ पोतदार, आनंद देवळे, प्रकाश हावळ सोमनाथ यरनाळकर, राजाराम कुडवे, आनंदा जालीमसर, दत्तात्रय कांबळे सौ. रुपाली शहा, सौ. रेखा भोसले. सर्व सभासद व सेवक वर्ग.

श्री गणेश नागरी सह. पत संस्था मुरगूड ता. कागल.




सभासद, ग्राहक, हितचिंतक यांचे कोटी-कोटी आभार!

सुभाषराव जोशी (मा.अध्यक्ष) | डॉ. सुभाष एरम (अध्यक्ष) | समीर जोशी (उपाध्यक्ष) | डॉ.अनिल लाहोटी (व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष) | सीए. दिलीप गुरव (मुख्य कार्यकारी अधिक्षक)

SINCE - 1917
॥ सकल जनांसी आधारु ॥

दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि. कराड
(शेड्यूल्ड बँक)
website : www.karadurbanbank.com

शतक महोत्सवी बँक

# हुपरी-इंगळी रस्त्यातील साईडपट्टी उखडून टाकल्याने नागरिकांत संताप

हुपरी, ता.२ (प्रतिनिधी)–

**सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हुपरी इंगळी रस्त्याचे मुरुमीकरण व डांबरीकरण सुरू आहे उत्तम आणि टिकाऊ रस्ता बांधकाम होण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्ची पडत आहे.याचा फायदा शेतकऱ्यांनाही होणार आहे.मात्र याच रस्त्याला सुरुंग लावून जवळपास तीनशे फूट रस्त्याच्या बाजूला एकाने चर खोदून साईड पट्टी उखडून टाकल्याने नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.**



हा पूर्वी साखळी रस्ता होता तो जिल्हा परिषदेच्या ताब्यात आहे.संबंधित विभागाकडे साधारणता तो १० मीटर म्हणजे ३० फूट रुंदीचा हा रस्ता पंचतारांकित औद्योगिक वसाहतीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यापर्यंत जोडला आहे. रस्ता खराब झाला लोकांची मागणी झाली शासनाने ७ कोटींचे बजेट लावले आणि कंत्राटदारांनी रस्त्याचे काम युध्दपातळीवर सुरू केले आजुबाजुला शेती असल्याने रस्ता खचूनये म्हणून भराव टाकून साईड पट्ट्या मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत यापुर्वी ओलसरपणा मुळे रस्ता खचण्याचे प्रमाणात वाढले होते शिवाय शेतकऱ्यांना त्रास नको म्हणून नाल्याच्या काठावर जवळपास ६०० मीटर संरक्षक भिंत बांधकाम सुरू आहे.हा रस्ता शाळा कॉलेज,कामगार,पंचतारांकित औद्योगिक वसाहत व हुपरी शहरात उद्योग धंद्याच्या निमित्ताने सतत येणाऱ्या लोकांना महत्त्वाचा दुवा आहे.या रस्त्यावर अवजड वाहने व ऊसाची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते यामुळे मजबूत रस्त्याची गरज ओळखून सार्वजनिक बांधकाम विभागाने महाराष्ट्र शासनाकडून ७ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. पुढील वर्षात हा रस्ता प्रत्यक्षांत करताना अडचण रस्ता खचू नये याची खबरदारी घेतली जात असताना हा रस्ताच उखडून टाकल्याने कोट्यवधी रुपये पाण्यात घालायचे का ?असा संतप्त सवाल जनतेमधून उपस्थित केला जात आहे.

# कागल तालुक्याच्या आत्मसन्मानाची व स्वाभिमानाची निवडणूक

## पालकमंत्री ना . मुश्रीफ

मुरगूड, ता.२(प्रतिनिधी)–

**शक्तीशाली व सामर्थ्यवान भारतासाठी मोदीजींना पुन्हा पंतप्रधान करण्याची गरज आहे . त्यामूळे सर्वांनी महायुतीच्या पाठीशी ठाम रहा . कोल्हापूर लोकसभेची निवडणूक वेगळ्या ऐतिहासिक वळणावरची आहेच. त्याशिवाय ही निवडणूक कागल तालुक्याला आव्हान देणारी आहे .**



तालुक्याच्या अस्तित्वाची , स्वाभीमानाची व आत्मसन्मानाची निवडणूक आहे . त्याचे साक्षीदार व्हा असे आवाहन पालकमंत्री ना . हसन मुश्रीफ यांनी केली .सभेला अभिनेते गोविंदा उपस्थित होते.त्यांचे आगमन.होताच लोकांतून एकच जल्लोष सुरू झाला.खासदार संजय मंडलिक याना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन करताच हात उंचावून लोकांनी प्रचंड दाद दिली.

महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ मुरगूडच्या ऐतिहासिक हुतात्मा तुकाराम चौकात जाहिर सभा झाली .सभेच्या अध्यक्षस्थानी शामराव घाटगे होते . तर सभेस समरजितसिंह घाटगे , अभिनेता गोविंदा ' आमदार अमोल मेटकरी ' आमदार तानाजीराव मुटकूळे ' गोकूळचे माजी अध्यक्ष रणजितसिंह पाटील , शेतकरी संघाचे अध्यक्ष प्रविणसिंह पाटील ' अविनाश पाटील आदि प्रमुख उपस्थित होते .

या सभेत बोलताना समरजितसिंह घाटगे म्हणाले ;मोदीजींनी संविधान वाचविण्याचा प्रयत्न केला . काँग्रेसकडूनच संविधान मोडण्याचा व संविधानाचा अवमान झाला आहे . देशाचे नागरिकत्व डावलणाऱ्या व महिलांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसला हद्दपार करण्याची ही वेळ आहे .

आमदार अमोल मेटकरी म्हणाले , जोपर्यंत सूर्य , चंद्र तारे आहेत तोपर्यंत संविधानाला धक्का लागणार नाही कोणीतरी भावनीक करुन मते मागातील त्यांना बळी पडू नका .

महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक भाषणात म्हणाले ' या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी अनेक क्रांतीकारी निर्णय घेतले .देशाला स्थीर शासन दिले .आपल्याला देशाबरोबरच आपला जिल्हा बलशाली करायचा आहे . त्यासाठी छ .शाहूंचा कार्याचा व विचाराचा वारसा आम्ही घेवून या निवडणूकीत उतरलोय .भूमीपूत्राला विजयी करण्यासाठी आपण या सभेद्वारे निर्धार करण्याचे आवाहनही त्यांनी केले . अभिनेते गोविंदा यांनी हिंदी व मराठी भाषेत भाषण करीत उमेदवार संजय मंडलिक यांना साथ देण्याचे जनतेला नम्र आवाहन केले . त्यांनी समाजाच्या विकासासाठी महायुतीला दुसरा पर्याय नसल्याचे सांगितले . या सभेत प्रविण सिंह पाटील , आमदार तानाजीराव मुटकूळे ' रणजितसिंह पाटील , काँ. अशोक चौगले , ॲड . राणा प्रताप सासणे , बबन बाबर ' संकेत भोसले . भगवान पाटील आदींची भाषणे झाली .

सभेस शिवसेनेच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे ;ॲड विरेंद्र मंडलिक बिद्रीचे संचालक सुनिल सुर्यवंशी , प्रवीण भोसले 'दिग्वीजय पाटील ' आर.डी. पाटील , श्री खिलारे ' आदि प्रमुख उपस्थित होते स्वागत व प्रास्ताविक शिवसेना जिल्हा प्रमुख राजेखान जमादार यांनी केले . तर संतोष वंडकर यांनी आभार मानले .

**विजयी सभेत गाणार आणि डान्स ही करणार**

गोविंदाचे संजय मंडलिक यांना विजयी करण्याचे भाषण संपताच गाणे गाण्याचा आग्रह लोकांतून होत होता. यावर संजय दादांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा आणि ते विजयी होणारच असे सांगून विजयी सभेत गाणार आणि डान्स ही करणार असे आस्वशीत त्यांनी केले.

# गुड्डापूर अपघातात एक ठार; एक जखमी

जत,ता.३ (प्रतिनिधी)–

**जत तालुक्यातील गुड्डापूर ते सोरडी या रस्त्यावर मोटरसायकल व डंपर यांच्यात समोरासमोर झालेल्या धडकेत पत्नी जागीच ठार झाली. तर पती जखमी झाले आहेत. मंडाबाई गणपत माने (वय.५०) ह्या अपघातात जागीच ठार झाल्या. तर गणपत यशवंत माने (वय ५८)दोघेही रा. धुळगाव ता. कवठेमंहकाळ) हे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना गुरुवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.**

गणपत माने व त्यांच्या पत्नी मंडाबाई माने हे दोघेजण मोटरसायकल वरून गुड्डापूर येथे मुलाच्या विवाहाकरीता स्थळ पाहून गावाकडे परतत होते. दरम्यान गुड्डापूर- सोरडी रस्त्यावर मोटरसायकल व डंपर दोन्हीमध्ये समोरासमोर धडक झाली.या धडकेत मंडाबाई माने या जागीच ठार झाल्या.तर गणपत माने हे गंभीर जखमी झाले होते. अपघाताची माहिती मिळताच तुकाराम बाबा यांनी घटनास्थळी तात्काळ जाऊन जखमी गणपत माने यांना १०८ या तून माडग्याळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डॉ. चव्हाण यांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले आहे.

# प्रियकराने लग्नास नकार दिल्याने युवतीची आत्महत्या

**कोल्हापूर ता.२ (प्रतिनिधी)–**

दुसऱ्या जातीतील असल्यामुळे प्रियकराने लग्नास नकार दिल्याने आणि त्याच्या आई-वडिलांनी घरी बोलवून दमदाटी केल्यामुळे करवीर तालुक्यातील कोथळी येथील सानिका संभाजी कुंभार (वय २०) हिने २९ एप्रिल रोजी घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणी प्रियकर रोहित उर्फ अक्षय रंगराव मुसळे, त्याचे वडील रंगराव गोविंदा मुसळे आणि आई सुलाबाई रंगराव मुसळे (तिघे रा. कोथळी) यांच्या विरुद्ध करवीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

याबाबत मृत युवतीची आई लता संभाजी कुंभार (वय ४८, रा. कोथळी) यांनी फिर्याद दिली.


* मळाई उद्योग समूह (मळाई ग्रुप)
* श्री मळाईदेवी शिक्षण संस्था, मलकापूर
* श्री मळाईदेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित जखिणवाडी (मलकापूर, नांदलापूर, कापील)
* आदर्श ज्युनिअर कॉलेज व चव्हाण विद्यालय, मलकापूर
* कन्याशाळा, मलकापूर

मा.अशोकराव थोरात (शेतीमित्र) संस्थापक अध्यक्ष, मळाई ग्रुप

मा. अजित थोरात नगरसेवक,मलकापूर नगरपरिषद

* कन्याशाळा, मलकापूर * चव्हाण विद्यालय पोतले * न्यू इंग्लिश स्कूल, कासारशिरंबे * स्टार इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज ॲन्ड रायझिंग ॲकॅडमी, मलकापूर * आदर्श प्राथमिक विद्यालय, आगाशिवनगर * आदर्श शिशु-विहार आगाशिवनगर * जमना सहकारी ग्राहक संस्था, मलकापूर *आदर्श क्रिडा संस्था, कराड * कराड तालुका ॲम्यच्युअर ॲथलेटिक्स असोसिएशन, कराड *समाज प्रबोधन सार्वजनिक वाचनालय,मलकापूर * विज्ञान प्रबोधिनी, मलकापूर * यशवंत कृषी विकास संस्था, कराड * यशवंत फळे, फुले,भाजीपाला खरेदी-विक्री व प्रक्रिया सह. संस्था,कराड. * सातारा जिल्हा शिक्षण संस्था संघ, सातारा * महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ * मा.श्री.अजित जोतिराम थोरात (काका) नगरसेवक मलकापूर

अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व संचालक, सभासद

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी , शहर जिल्हाध्यक्ष
विवेक चोपडे, इचलकरंजी.

कृष्णा-कोयना
नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड
ISO 9001: 2008

अर्थिक प्रगती
- ठेवी : ............... १०७ कोटी ६२ लाख
- स्व: निधी............. १६ कोटी ५४ लाख
- खेळते भागभांडवल... १२९ कोटी ६२ लाख
- कर्जवाटप.......... ८० कोटी ९८ लाख
- गुंतवणूक.........४३ कोटी ४९ लाख
- एकत्रित व्यवसाय.. १८८ कोटी ६० लाख
- नफा..............१ कोटी ३२ लाख
- ऑडिट वर्ग.......... अ

♦ ठेवीवरील आकर्षक व्याजदर ♦ सेव्हिंग ठेव - ४%
♦ कॉल डिपॉझीट २५ दिवस -५.५०% ♦ १ वर्षे व त्यापुढे -९%
♦ ४६ दिवस ते ९० दिवस - ६% ♦ दामदुप्पट ठेव - ८ वर्षे २ महीने२८ दिवस
♦ ९१ दिवस ते १८० दिवस- ७% ♦ दामदिडपट - ४ वर्षे ९ महिने २६ दिवस
१८१ दिवस ते १ वर्षे - ८% ज्येष्ठ नागरिक अर्धा टक्का जादा व्याजदर

महाव्यवस्थापक श्री. अरुण पाटील
व्हा. चेअरमन श्री.सचिन चव्हाण
चेअरमन श्री. बाळासाहेब पाटील

सर्व संचालक, सभासद व सेवक वर्ग

- संस्थेची वैशिष्ट्ये -
आयएस ओ ९००१ : २०१५ मानांकन संस्था  बँको ब्ल्यू रिबन -२०१८ पुरस्कार संस्था  कार्यक्षेत्र सातारा जिल्हा  आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना  अनुभवण्यासारखी आपुलकीची तत्पर सेवा  सुलभ व तात्काळ गरजेनुसार कर्ज वितरण  वेळेत कर्ज हप्ता व व्याज भरणाऱ्यास कर्जदारांना १% रिबेट  संस्थेचे पूर्णत: संगणकीकरण  लॉकर्स सुविधा  एस.एम.एस. बँकींग सुविधा  ड्राफ्ट आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी.  नक्त एनपीए प्रमाण 0%  वीज बिल स्वीकृती केंद्र

श्रीमती जयश्री भ. मोकाशी अध्यक्षा
डॉ.विश्वजीत भ. मोकाशी उपाध्यक्ष
श्री.अभिजीत भ. मोकाशी सचिव
श्री.विलास चौधरी संचालक

दैनिक महासत्ताच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा,,!

MOKASHI
Krishi Vikas Pratishthan's

मोकाशी कृषि विकास प्रतिष्ठान
दादासाहेब उर्फ भगवानराव मोकाशी

- दादासाहेब मोकाशी अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय
- दादासाहेब मोकाशी औद्योगिक प्रशिक्षण संस्था
- वेस्टफिल्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स
- शिक्षणमहर्षी दादासाहेब मोकाशी कौशल्य विकास संस्था
- शिक्षणमहर्षी दादासाहेब मोकाशी सह. पतसंस्था मर्या.
- किटकनाशक व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- मोकाशी एज्युकेअर
- दादासाहेब मोकाशी कृषि महाविद्यालय
- दादासाहेब मोकाशी कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय
- दादासाहेब मोकाशी मुक्त कृषि शिक्षण केंद्र
- दादासाहेब मोकाशी स्कील डेव्हलपमेंट सेंटर
- डिप्लोमा इन ॲग्रीकल्चर एक्स्टेंशन सर्व्हीस फॉर इन्पुट डिलर्स
- दादासाहेब मोकाशी अन्नतंत्रज्ञान, संशोधन आणि विकास संस्था
- दादासाहेब मोकाशी तंत्रनिकेतन
- दादासाहेब मोकाशी ॲग्रो टुरीझम
- कोटेश्वर माध्यमिक विद्यालय, कोर्टी
- जेबीएम अन्नचाचणी प्रयोगशाळा
- ॲग्री क्लिनिक आणि ॲग्री बिझनेस सेंटर (AC/ ABC)
- मोकाशी फूडस्

संचालक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी

शिक्षणमहर्षी दादासाहेब मोकाशी शैक्षणिक संकुल, कराड-विटा रोड, राजमाची, मो.७२१९२०३७६६

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



ॲड. मेहबूब बाणदार
ॲड.हिना मेहबूब बाणदार
ॲड. मेहबूब बाणदार
बाणदार परिवार, इचलकरंजी.

दैनिक महासत्ता च्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा ...!

कराड-पाटण तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी सोसायटी; कराड
हेड ऑफिस : कराड, फोन ७०३०९०२९५२ कराड शाखा मोबा.९६७३३३२१०१
शाखा : पाटण मोबा ९६७३३३२१०२, दहिवडी शाखा ७०३०९०९३९६, उंब्रज शाखा ९६७३३३२१०३, तळमावले शाखा ७०३०९०९३९५, सातारा शाखा ७०३०९०२९४२
सर्व शाखा संगणकीकृत * सातारा जिल्हा कार्यक्षेत्र

-ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर -
* ४६ दिवस ते १८० दिवस ५.५० टक्के
* १८१ दिवस ते ३६४ दिवस ६.५० टक्के
* १ वर्षाच्या पुढे ७.५० टक्के
*३ वर्षापुढील मासिक व्याज ७.५० टक्के
*दामदिडपट ठेव ५ वर्षे ६ महिने
*दामदुप्पट ठेव ९ वर्ष १ महिने
*सेव्हिंग्ज ठेव ४ टक्के
* आवर्त ठेव ७.५० टक्के

* संस्थेची स्थापना : ४-११-१९५२ * ऑडीट वर्ग - अ
* भाग भांडवल - ३९ कोटी ८१ लाख
* गुंतवणूक - ४९ कोटी ३० लाख
* राखीव निधी - २३ कोटी ३ लाख
* ठेवी-१७२ कोटी ९६ लाख,
* कर्ज-१९० कोटी ४६ लाख
* खेळते भागभांडवल : २६९
* सभासद संख्या : २९४८

- कर्जावरील व्याजदर -
* मध्यम मुदत कर्ज- रू.१५,००,०००-१० टक्के * विशेष कर्ज - रू.१०,००,०००-१० टक्के
* प्रासंगिक कर्ज -रू.५,००,०००-०९ टक्के * सोने तारण कर्ज १० ग्रॅमला ५०,००० व्याज दर ९ टक्के

श्री.उमाकांत उद्धवराव फल्ले मॅनेजर
श्री.दत्तात्रय दादाराम जाधव उपाध्यक्ष
सौ.वैशाली राजेंद्र पवार अध्यक्षा
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग

दैनिक महासत्ता च्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा ...!

शिवराज बसले भोजनास, तृप्त झाले स्वराज...
१००%शुध्द शाकाहारी हॉटेल
आख्खा मसुरा स्पेशल
शिवराज ढाबा
9921217007/ 9850497007
पश्चिम महाराष्ट्रातील नंबर १ चा



कराड-चिपळूण रोड वारूंजी फाटा, कराड


दैनिक महासत्ताच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा...!
युवा नेते
मार्गदर्शक स्व.विलासराव पाटील (उंडाळकर) माजी सहकार मंत्री
अध्यक्ष मा.रोहित पाटील
उपाध्यक्ष मा.विजय मुठेकर
'सर्वसामान्यांची पसंती'
स्थापना सन १९९६
सर्वसामान्यांची पसंती
कोयना सहकारी बँक लि; कराड
मा.ॲड.उदयसिंह पाटील (दादा) संस्थापक अध्यक्ष
प्रशासकीय कार्यालय, रयत बझार बिल्डींग, मार्केट यार्ड, कराड फोन - २२३२७७
शाखा : कराड, तळमावले, सातारा, औंड, शेरे-शेणोली, उंब्रज, शिरवळ, वडूज, लोणंद, मलकापूर, आकुर्डी-पुणे विस्ता. कक्ष- मार्केट यार्ड, कराड.

दैनिक महासत्ताच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा..!

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड.
विद्यानगर ता.कराड, जि.सातारा
स्थापना : १९५४ मानांकन अ+ श्रेणी दूरध्वनी (प्राचार्य) : ०२१६४- २७१३४६
ई-मेल : sgmkarad@yahoo.com / str_sgmck@bsnl.in
नॅक मानांकनात महाविद्यालयास महाराष्ट्रात द्वितीय व भारतात सातवे आणि शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळाला.
कला, वाणिज्य, विज्ञान, संगणकशास्त्र आणि व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम (कनिष्ठ व वरिष्ठ विभाग)



डॉ.मोहन राजमाने
प्राचार्य, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड





## टिचकी

कलंकित उमेदवार, प्रचाराला धार,
कुणाचे पेनड्राईल, कुणाकडे पोर्नस्टार
वैशाखाआधीच पेटलाय वणवा
आता होऊनच जाऊदे आर या पार!



## फ्लॅशबॅक

# बैलगाडीतून प्रचार केला आणि पुढे मुख्यमंत्री बनले!

देशातील लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे पूर्ण झाले आहेत. अशा स्थितीत उर्वरित ५ टप्प्यांसाठी सर्वच पक्षांनी आपली पूर्ण ताकद लावली आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान नेते हेलिकॉप्टरमधून सभेच्या ठिकाणी पोहोचून जनतेला संबोधित करत असतात, पण देशात एक काळ असा होता की राजकारणी हेलिकॉप्टर किंवा गाडीने नव्हे तर



घोडागाडी, बैलगाडीने प्रचार करायचे. आज आपण अशा एका नेत्याविषयी जाणून घेणार आहोत, ज्यांनी घोडागाडी आणि बैलगाडीतून गावोगाव जाऊन आपल्या पक्षाचा प्रचार केला आणि नंतर तीनदा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली.

हा नेता म्हणजे भाजपचे दिवंगत नेते कल्याण सिंह. वास्तविक, उत्तर प्रदेशातील हाथरसच्या सिकंदरराव विधानसभा जागेवरील १९६९ ची निवडणूक रंजक होती. त्यात त्यावेळचे दोन युवा नेते कल्याण सिंह आणि रामप्रकाश गुप्ता हे जनसंघाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी सात दिवस तळ ठोकून होते. त्या निवडणुकीत रघुवीर प्रसाद त्रिवेदी यांना जनसंघाचे उमेदवार घोषित करण्यात आले आणि कल्याण सिंह आणि राम प्रकाश गुप्ता यांना त्यांच्या समर्थनार्थ प्रचारासाठी पाठवण्यात आले. असे म्हटले जाते की, दोघेही राधेश्याम गुप्ता यांच्या पुरनगंज मोहल्ला येथील निवासस्थानी सुमारे सात दिवस थांबले आणि त्यांच्यासाठी जोरदार प्रचार केला.

त्या वेळी कल्याण सिंह जनसंघाकडून दीपक निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवत असलेल्या त्रिवेदी यांच्या प्रचारासाठी बसने सिकंदरराव येथे पोहोचले होते. त्यानंतरच त्यांनी पत्र लिहून रामप्रकाश गुप्ता यांना येण्यास सांगितले.

कल्याण सिंह आल्यानंतर तीन दिवसांनी गुप्ताही तेथे पोहोचल्याचे सांगितले जाते. दोन्ही नेते सकाळी टांगा आणि बैलगाडीतून प्रचारासाठी निघायचे आणि प्रत्येक गावात सभा घेऊन रात्री उशिरापर्यंत परतायचे. यानंतर रात्री रस्त्यावरच्या दिव्याच्या उजेडात निवडणूक बैठका व चर्चा घेत.


निवडणूक संपल्यानंतर दोन्ही नेते आपापल्या ठिकाणी परतले. नंतर काळ बदलला आणि भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली. पुढे जाऊन कल्याण सिंह आणि राम प्रकाश गुप्ता हे दोन्ही नेते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री बनले. १९९९ मध्ये पहिल्यांदा राम प्रकाश गुप्ता यूपीचे मुख्यमंत्री बनले होते, तर कल्याण सिंह तीन वेळा (१९९१, १९९७, १९९८) मुख्यमंत्री बनले होते.

## जाणून घ्या

# नेहरुंची रणनीती, अटलजींचा पराभव

ही घटना १९६२ च्या लोकसभा निवडणुकीची आहे, जिथे जनसंघाचे उमेदवार अटलबिहारी वाजपेयी आणि काँग्रेस नेत्या सुभद्रा जोशी यांच्यात लढत होती. या प्रचारात चित्रपट तारे उतरले होते आणि त्यामागील रणनीतीकार माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू होते, ज्यांनी स्वत: काँग्रेस उमेदवाराच्या विरोधात प्रचार करण्याऐवजी फिल्म स्टारची निवड केली होती.

खरेतर १९५७ मध्ये यूपीच्या याच बलरामपूर लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला होता. दोन वेळा



खासदार राहिलेल्या सुभद्रा जोशी यांचे नाव ऐकून खुद्द अटलबिहारींना धक्काच बसला.

असे म्हटले जाते की त्यावेळी नेहरूंनी येऊन त्यांचा प्रचार करावा अशी सुभद्रा यांना इच्छा होती, पण अटलबिहारींच्या विरोधात नेहरूंना प्रचार करायचा नव्हता. अशा परिस्थितीत त्या काळातील लोकप्रिय चेहऱ्यांचा शोध घेत असतानाच त्यांनी काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी चित्रपट अभिनेते बलराज साहनी यांची निवड केली.

अटलजींना त्यांच्या विजयाचा पूर्ण विश्वास होता. बलरामपूरचे लोक सुभद्रा जोशी यांना तितकेसे ओळखत नव्हते, हे त्यांना माहीत होते.

बलराज साहनी त्यांच्या 'दो बिघा जमीन' या चित्रपटाने देशभर प्रसिद्ध आणि प्रसिद्ध झाले होते. गरीबीशी लढा देणाऱ्या या चित्रपटात त्यांनी 'शंभू' ही व्यक्तिरेखा साकारली होती. पंडित नेहरूंनी असा अंदाज लावला की लोकांना नेत्यांपेक्षा अभिनेते जास्त आवडतात. त्यामुळे त्यांनी बलराज साहनी यांच्याशी बोलून बलरामपूरमध्ये काँग्रेस उमेदवाराचा प्रचार करण्यास सांगितले. सुभद्रा जोशींच्या समर्थनार्थ बलराम साहनी बलरामपूरला येत असल्याचे समजताच लोकांची गर्दी जमू लागली. साहनी हे बलरामपूर येथील कवी बेकल शाही यांच्या घरी वास्तव्यास होते आणि तेथून सुभद्रा जोशी यांच्यासह काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी प्रचाराची स्क्रिप्ट तयार केल्याचे सांगितले जाते.

निवडणूक प्रचारादरम्यान परिस्थिती अशी होती की बलराज साहनी यांची एक झलक पाहण्यासाठी लोक घरांच्या गच्चीवर आणि खिडक्यांवर उभे राहिलेले दिसले. बलरामपूरचे रस्ते आणि चौक गर्दीने फुलून गेले होते. साहनी यांनी त्या दिवशी सायंकाळपर्यंत जाहीर सभा घेऊन काँग्रेससाठी मते मागितली. या अभिनेत्याने संपूर्ण जनतेचा मूडच बदलून टाकला आणि सुभद्रा जोशींच्या बाजूने असे वातावरण तयार झाले की अटलबिहारी वाजपेयी यांनी जिंकलेली जागा गमावली. सुभद्रा जोशी यांनी अटलजींचा केवळ २०५२ मतांनी पराभव केला आणि ती जागा काँग्रेसकडे गेली. मात्र, नंतर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या आग्रहास्तव अटलबिहारींना राज्यसभेतून संसदेत पाठवण्यात आले.



१९५२ मध्ये पार पडलेल्या स्वतंत्र भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी मतपेटी बंद कशी करायची आणि सील कशी करायची याचे सरकारी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देताना निवडणूक आयोगाचे कर्मचारी.

## उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघ

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल गांधी, व्ही. के. कृष्णा मेनन, मृणाल गोरे, राम नाईक यांच्यासारख्या दिग्गजांनी खासदारकी भूषवलेला उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघ हा भाजपचा हक्काचा बालेकिल्ला मानला जातो. राम नाईक यांनी पाच वेळा या मतदारसंघातून विजय मिळवला. यामध्ये येणाऱ्या सहापैकी चार विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपचे आमदार आहेत, तर एका ठिकाणी शिवसेना-शिंदे गटाचे आणि एका ठिकाणी काँग्रेसचा आमदार आहे. एकूणच भाजपची विधानसभा मतदारसंघांमध्येही ताकद असल्यानं २०१४ पासून 'भाजपचा गड' अशीच ओळख या लोकसभा मतदारसंघाची बनलीय. यंदा या मतदारसंघातून केंद्रीय मंत्री पियुष गोयल रिंगणात आहेत; तर काँग्रेसने भूषण पाटील या तुलनेने नवख्या उमेदवाराला उमेदवारी दिली आहे.**

# आधीच बालेकिल्ला, त्यात प्रतिस्पर्धी नवखा....



उत्तर मुंबई मतदार संघ म्हणजे मुंबईचे उत्तरेकडचे प्रवेशद्वार. दहिसर पासून या मतदार संघाला सुरुवात होते. मध्यम वर्गीय आणि झोपडपट्टी वासियांचे वास्तव असलेल्या या मतदार संघात आदिवासी बांधवांचे अस्तित्वही पाहण्यास मिळते. मुंबईतील प्रमुख पर्यटन स्थळ असलेले संजय गांधी राष्ट्रीय उद्यान अर्थात नॅशनल पार्क हे याच मतदार संघात आहे. याच नॅशनल पार्कजवळ मुंबईपासून हाकेच्या अंतरावर परंतु सुविधापासून खूप दूर असलेले आदिवासी पाडे पाहायला मिळतात. मूलभूत सुविधांपासून दूर असलेला हा आदिवासी अशिक्षित असल्याने आपल्या हक्कासाठी आवाज उठवतानाही दिसत नाही. गेल्या काही वर्षात उत्तर मुंबईचा चेहरा मोहरा बदलला आहे. मोकळ्या जागेवर उंचच उंच इमारती उभा राहिलेल्या दिसतात. चारकोप, गोराई या म्हाडाच्या वसाहतींबरोबरच आता नव्याने म्हाडाच्या इमारती उभ्या राहत

**या मतदारसंघातील आजवरचे खासदार**

| | | |
|---|---|---|
| ▶विठ्ठल गांधी | काँग्रेस | १९५१ |
| ▶व्ही. के. कृष्णा मेनन | काँग्रेस | १९५७ |
| ▶व्ही. के. कृष्णा मेनन | काँग्रेस | १९६२ |
| ▶मृणाल गोरे | भालोद | १९७७ |
| ▶रविंद्र वर्मा | जनता पार्टी | १९८० |
| ▶अनुपचंद शहा | काँग्रेस | १९८४ |
| ▶राम नाईक | भाजप | १९८९ |
| ▶राम नाईक | भाजप | १९९१ |
| ▶राम नाईक | भाजप | १९९६ |
| ▶राम नाईक | भाजप | १९९८ |
| ▶राम नाईक | भाजप | १९९९ |
| ▶गोविंदा अहुजा | काँग्रेस | २००४ |
| ▶संजय निरुपम | काँग्रेस | २००९ |
| ▶गोपाळ शेट्टी | भाजपा | २०१४ |
| ▶गोपाळ शेट्टी | भाजपा | २०१९ |

आहेत.

स्वतंत्र भारताच्या पहिल्या निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तर मुंबईतून निवडणूक लढवली होती. मात्र, त्यावेळी त्यांचा पराभव झाला. आता उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघ हा भाजपचाच आहे हे इतके ठरून गेले आहे की या मतदारसंघातून कोणीही महत्वाचा विरोधी पक्ष निवडणूक लढवायला तयार होत नाही. या मतदारसंघात मालाड ते बोरिवली हा भाग येतो. माजी केंद्रीय मंत्री राम नाईक हे पाच वेळा या मतदारसंघातून निवडून आले होते. राम नाईक या मतदार संघाचे खासदार असताना जनसंपर्कासाठी ते रेल्वेतून प्रवास करायचे. विविध रेल्वे स्थानकावरती बूट पॉलिश करणारे आपली एक दिवसाची कमाई राम नाईकांना निवडणुकीसाठी मदत निधी म्हणून द्यायचे. मात्र त्यांना २००४ मध्ये अभिनेता गोविंदा याच्याकडून पराभूत व्हावे लागले.

२००९ मध्ये काँग्रेसने निरुपम यांना उमेदवारी दिली. तर भाजपाने पुन्हा राम नाईकांना रिंगणात उतरवले होते. त्यावेळी मनसेने उत्तर मुंबईतून शिरीष पारकर यांना उमेदवारी दिली. मनसेमुळे इथल्या मराठी मतांची विभागणी झाली. त्याचा फायदा काँग्रेसला आणि फटका युतीचे उमेदवार राम नाईक यांना बसला. राम नाईक हे अवघ्या ५७७९ मतांनी पराभूत झाले. प्रथमच लोकसभा लढवणाऱ्या मनसेच्या पारकरांनी लाखाच्या वर मते घेतली आणि हेच मतदार संघाच्या निकालावर परिणाम करणारे ठरले. निरुपम लोकसभेत पोहचले.

२०१४मध्ये गोपाळ शेट्टी हे भाजपचे उमेदवार उत्तर मुंबईतून खासदार म्हणून निवडून आले. शेट्टींची लोकप्रियता इतकी प्रचंड होती की विरोधी पक्षांतील कोणताच बडा नेता हात दाखवून अवलक्षण करू इच्छित नव्हता. अखेरीस बॉलीवूड अभिनेत्री उर्मिला मातोंडकरला पक्षप्रवेश




देऊन उमेदवारी देण्यात आली. हा आयत्या वेळचा उमेदवार कितपत यशस्वी ठरणार नाही हे काँग्रेस नेत्यांनाही माहीत होते. झालेही तसेच. शेट्टी यांनी २०१९मध्येही दणदणीत विजय मिळवला. या निवडणुकीत शेट्टी यांना ७,०६,६७८ मते मिळाली. तर, उर्मिला मातोंडकर यांना २,४१,४३१ मते मिळाली.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत या लोकसभा मतदारसंघाच्या अखत्यारीत येणाऱ्या सहा विधानसभा मतदारसंघात चार भाजप आणि एक शिवसेना, एक काँग्रेस असे उमेदवार विजयी झाले होते. बोरिवली – सुनील राणे – भाजप, दहिसर – मनिषा चौधरी – भाजप, मागाठणे – प्रकाश सुर्वे – शिवसेना, कांदिवली पूर्व – अतुल भातखळकर– भाजप, चारकोप – योगेश सागर – भाजप, मालाड पश्चिम – अस्लम शेख – काँग्रेस.

हा मतदारसंघ संमिश्र लोकवस्तीचा आहे. मराठी मतदारांची संख्या ही इतर एकूण भाषिक मतदारांच्या तुलनेत कमी आहे. उत्तर भारतीय, गुजराती, मारवाडी भाषिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. काही विधानसभा मतदारसंघात अल्पसंख्य समुदाय आहे. त्यामुळे भाषिक-धार्मिक कल लक्षात घेता हा मतदारसंघ संमिश्र आहे. मराठी मतांची तुलना करता अन्य भाषिक मतदारांची संख्या अधिक भरते.

यंदा भारतीय जनता पक्षाने उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांना उमदेवारी जाहीर केली आहे. तब्बल ३५ वर्षांनी पीयूष गोयल निवडणुकीच्या मैदानात उतरत आहेत. त्यांनी आपल्या प्रचारास सुरुवात केली आहे. त्यासाठी अगदी लोकलमधून प्रवास करत आहेत. दादर ते बोरिवली असा प्रवास करुन त्यांनी लोकांशी संपर्क साधला. पीयूष गोयल यांचे आई-वडील भाजपमध्येच होते. परंतु त्यांनी गेल्या ३५ वर्षांत निवडणूक लढवली नव्हती. आता भाजपने मोदी सरकारमधील नवरत्नांना राज्यसभेऐवजी लोकसभेच्या मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतल्यामुळे गोयल यांनाही उमेदवारी मिळाली आहे. पीयूष गोयल १९९० च्या दशकात भाजपाशी जोडले गेले. पक्षात विविध पदावर काम करत त्यांना २०१० रोजी राज्यसभेची संधी मिळाली. सलग तीन वेळा ते राज्यसभेतून खासदार झाले. भाजपमध्येच नाही तर विरोधी पक्षात त्यांचे चांगले संबंध आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मर्जीतील नेते ते आहेत.

दुसरीकडे या मतदारसंघातून काँग्रेसने भूषण पाटील यांना उमेदवारी दिली आहे. महाविकास आघाडीमध्ये ठाकरे गट सुद्धा मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघासाठी इच्छुक होता. या ठिकाणी विनोद घोसाळकर यांच्या नावाची चर्चा होती. परंतु काँग्रेसने ही जागा सोडली नाही. भूषण पाटील यांची फारशी कुणाला माहिती नसल्याने त्यांना उमेदवारी देऊन काँग्रेसने पियुष गोयल यांची यशाची वाट मोकळी केली अशी टिका काँग्रेसवर होत आहे . भूषण खंडेराव पाटील बोरिवलीचे स्थानिक रहिवासी असून मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्मले आणि वाढले. त्यांनी मुंबई विद्यापीठातून विज्ञान शाखेत पदवी प्राप्त केली . ते बिल्डर आहेत. ते सध्या मुंबई काँग्रेसचे उपाध्यक्ष आहेत. त्यांची पत्नी डॉ. दर्शनी भूषण पाटील या बालरोग तज्ञ आहेत . भुषण पाटील महाविद्यालयीन जीवनापासून सामाजिक कार्यात सक्रिय सहभागी होते. मोफत वैद्यकीय शिबिरे, युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित करणे आणि गरजूंना मोफत रेशन आणि वैद्यकीय मदत देणे, विशेषतः कोविड महामारीच्या काळात हजारो कुटुंबांना मदत केली . २००७ मध्ये नगरसेवक म्हणून मुंबई महानगर पालिकेची आणि २००९ मध्ये बोरिवली पश्चिम मधून आमदारकीची निवडणूक ते लढले होते. मात्र त्यांचा पराभव झाला.

पीयूष गोयल हे चार्टर्ड अकाऊंटंट आणि इनवेस्टमेंट बँकर आहेत. त्यांना राजकारण वारसाने प्राप्त झाले आहे.२०१४ मध्ये मोदी सरकारमध्ये ते कोळसामंत्री होते. नंतर २०१७ मध्ये सुरेश प्रभू यांच्या राजीनाम्यानंतर ते रेल्वे मंत्री झाले.

कागदावरचे गणित आणि या मतदारसंघावरची भाजपाची पकड पाहता पियूष गोयल यांचे पारडे स्पष्टपणाने जड दिसत आहे. आता उत्तर मुंबईतील १७ लाख मतदार काय फैसला करतात हे ४ जून रोजी पाहावे लागेल.

**१९५२ साली उत्तर मुंबई हा लोकसभा निवडणूक द्विसदस्यीय होता. म्हणजे, एकाच मतदारसंघातून सर्वसाधरण आणि राखीव असे दोन खासदार निवडून येत. पहिल्या निवडणुकीत या मतदारसंघातून काँग्रेसकडून व्ही. बी. गांधी (सर्वसाधारण) आणि नारायण काजरोळकर (राखीव) हे उमेदवार, तर सोशालिस्ट आणि शेड्युल कास्ट फेडरेशनकडून अशोक मेहता (सर्वसाधार) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर (राखीव) उमेदवार होते. कॉ. श्रीपाद डांगे सुद्धा इथून पहिल्या निवडणुकीत उतरले होते. यातून व्ही. बी. गांधी आणि काजरोळकरांचा विजय झाला. डॉ. आंबेडकरांचा पराभव झाला होता. असा या मतदारसंघाच्या पहिल्या निवडणुकीचा इतिहास आहे.**

## किस्से असेही

# मतपत्रिकांवर लिपस्टिकचे ठसे

स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या लोकसभा निवडणुकीपासून आजपर्यंत प्रत्येक वेळी प्रचार, मतदान आणि मतदानानंतर अशा काही रंजक घटना घडल्या आहेत, ज्या अनेक दशके लोकांच्या स्मरणात आहेत. अनेकवेळा नेत्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही प्रचार केला तर कधी साधनांची कमतरता असतानाही मतदारांच्या



भेटी घेत उमेदवाराला विजयी करण्याचे आवाहन केले. वटवाघळांच्या आवाजावर पंडित जवाहरलाल नेहरूंची 'कीप सायलेन्स'ची हाक असो किंवा नाक तुटल्यावर टॉर्चलाइट लावून इंदिरा गांधींचे सार्वजनिक भाषण असो, आजपर्यंत सर्वांना ते आठवते. अशीच एक घटना माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या १९८४ च्या लोकसभा निवडणुकीशी संबंधित आहे.

१९८४ च्या लोकसभा निवडणुकीत बॉलिवूड मेगास्टार अमिताभ बच्चन यांनी अलाहाबाद मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. त्यांचे विरोधक भारतीय लोकदलाचे दिग्गज नेते हेमवती नंदन बहुगुणा होते. १९७७ मध्ये काँग्रेस सोडल्यानंतर त्यांनी जनता पक्षाला केंद्रात सत्तेत आणण्यात मोठी भूमिका बजावली होती. या निवडणुकीत अमिताभ बच्चन यांच्यासमोर बहुगुणा यांचा दारुण पराभव झाला होता. खरे तर इंदिरा गांधींच्या हत्येनंतर काँग्रेसला विजयी करून पुन्हा सत्तेत आणण्याची जबाबदारी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या खांद्यावर आली होती. सर्वसामान्य जनतेची संपूर्ण सहानुभूती काँग्रेसकडे होती. काँग्रेसला बहुगुणासोबत समाधान मानावे लागले. त्यामुळे राजीव गांधी यांनी आपले मित्र अमिताभ बच्चन यांना अलाहाबादमधून उमेदवारी दिली.

अमिताभ बच्चन निवडणूक प्रचारासाठी जिथे-जिथे गेले, तिथे लोकांची गर्दी जमली. त्यांचा करिष्मा मतदानात आणि निकालातही दिसून आला. त्या वेळी बॅलेट पेपरद्वारे मतदान झाले होते. त्यानंतर जेव्हा मतमोजणी झाली तेव्हा अमिताभ बच्चन यांच्या बाजूने हजारो बॅलेट पेपरवर मतदान झाले; इतकेच नाही तर महिला मतदारांनी बॅलेट पेपरवर लिपस्टिकच्या खुणाही टाकल्या. हे पाहून निवडणूक अधिकारी चक्रावले. मात्र, अशी सुमारे चार हजार मते अवैध ठरविण्यात आली. यानंतरही अमिताभ बच्चन यांनी त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी भारतीय लोकदलाचे प्रबळ नेते हेमवती नंदन बहुगुणा यांचा १,०९,६६६ विरुद्ध २,९७,४६१ ने पराभव केला.

अमिताभ बच्चन यांच्या राजकारणातील डावाची सुरुवात दणदणीत विजयाने झाली. मात्र, त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच बोफोर्स वादाची झळ त्यांच्यापर्यंत पोहोचली. अमिताभ यांनी लोकसभेचे सदस्यत्व सोडले आणि लवकरच राजकारणातून संन्यास घेतला.

अमिताभ बच्चन यांना अलाहाबादमधून उमेदवारी देण्याचा निर्णय राजीव गांधींना का घ्यावा लागला? वास्तविक, यापूर्वी काँग्रेस नेते केपी तिवारी यांना या जागेवरून उमेदवारी देण्यात आली होती. पण, बहुगुणा यांनी या जागेवरून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर काँग्रेसने अचानक अमिताभ बच्चन यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. यामुळे बहुगुणा यांना इतर कोणत्याही जागेचा विचार करण्याची संधी मिळाली नाही. याचा परिणाम असा झाला की उत्तर प्रदेशात काँग्रेसने ८५ पैकी ८३ जागा जिंकल्या.

अमिताभ बच्चन यांना अलाहाबाद मतदारसंघातून उमेदवारी देण्याची काँग्रेसच्या रणनीती पहिल्या दिवसापासून कार्यरत होती. अमिताभ बच्चन निवडणूक प्रचारादरम्यान अलाहाबादमध्ये आले होते. अमिताभ यांच्या एका झलकसाठी तरुण मतदार तासनतास थांबायचे. मुली त्यांच्यावर दुपट्टे फेकत असत. हेमवती नंदन बहुगुणा जाहीर सभांमध्ये अलाहाबादसोबतच्या त्यांच्या आयुष्यभराच्या नात्याची आणि कामाची लोकांना आठवण करून देत राहिल्या. पण, अमिताभ बच्चनच्या ग्लॅमरने सगळ्यांवरच छाया पडली होती. त्याच वेळी, त्यांची नाळ अलाहाबादमध्ये असल्याने त्यांना खूप फायदा झाला. अलाहाबादच्या निवडणुकीच्या सभांमध्ये अमिताभ म्हणत होते की, मी जिथे जातो तिथे मला गंगाकाठचा माणूस म्हणतात.

या निवडणुकीत अमिताभ विजयी झाले खरे; पण राजकारणापासून दूर गेल्यानंतर या महानायकाने आपल्या भावना व्यक्त करताना असे म्हटले की, ' मी भावनेच्या भरात निवडणुकीच्या मैदानात उतरलो. तेव्हा माझ्या लक्षात आले की राजकारण हे खऱ्या भावनांपेक्षा वेगळे असते. शेवटी मी हार मानली.'

# कमी मतदान आणि अपक्षांचा लाभ

बिहारमध्ये जेव्हा-जेव्हा मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे, तेव्हा अपक्ष उमेदवारांचे नशीब सुधारले आहे. हे आम्ही आकडेवारीच्या गणितावर म्हणत आहोत. यावेळीही लोकसभा निवडणुकीत मागील लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत कमी मतदान झाले असून एका लोकसभा जागेवरही रंजक लढत पाहायला मिळाली.

बिहारमध्ये सुरुवातीच टप्प्यातील मतदानात मतदारांनी फारसा रस दाखवलेला नाही. उर्वरित टप्प्यात काय होते हे येणारा काळच सांगेल. तत्पूर्वी, कमी मतदानामुळे आजपर्यंत कोणत्या अपक्ष उमेदवाराला फायदा झाला हे जाणून घेऊया.



ही गोष्ट २००९ च्या लोकसभा निवडणुकीची आहे, जेव्हा दिग्विजय सिंह बांका लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले आणि कमी मतदानामुळे ओम प्रकाश यादव सिवान लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून विजयी झाले. त्या वर्षी (२००९) मतदानाची टक्केवारी ४८.७ होती. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत मागील निवडणुकीच्या तुलनेत १० टक्के कमी मतदान झाले होते.

याच वर्षी पप्पू यादव यांनी पूर्णिया मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. मागील निवडणुकीच्या तुलनेत एक टक्का कमी मतदान झाले. पप्पू यादव यांनी निवडणूक जिंकली होती.१९९६ च्या लोकसभा निवडणुकीत बेगुसराय लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार रामेंद्र कुमार विजयी झाले होते. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत ६०.८ टक्के मतदान झाले होते. मागील निवडणुकीच्या तुलनेत ७ टक्के कमी मतदान झाले. या निवडणुकीत पप्पू यादव यांनी पुन्हा एकदा अपक्ष म्हणून निवडणूक जिंकली.